ऑगस्ट १९७०

# माणूस

चाळीस पैसे

## भारतातील लोकयुगाचे प्रवर्तक



# टिळक स्मृती वंदन : चिखलगाव

दापोली तालुक्यातील चिखलगाव हे लोकमान्य टिळकांचे गाव म्हणून ओळखले जाते. तेथे त्यांच्या मूळ घराचा चौथरा आज उकिरड्याच्या भाराखाली लपलेला आहे, तर लोकमान्य टिळकांनी ज्याच्यासाठी आपली सर्व जमीन दान दिली आणि सुंदर व भव्य देऊळ बांधले ते केशवराज मंदिर मोडकळीस आलेल्या अवस्थेत कसे तरी उभे आहे. लो. टिळकांचा वारसा अभिमानाने सांगणाऱ्या दापोली तालुक्याला हे आवाहन आहे. निसर्गरम्य चिखलगावी या वास्तूंची पुनर्रचना करून तेथे टिळकांची स्मृती चिरंतन रहावी यासाठी काय करता येईल, याचा विचार तालुक्यातील सर्वांनीच करायला हवा आहे. येत्या टिळक पुण्यतिथीला खालीलप्रमाणे एक कार्यक्रम योजिला आहे. सर्वांनी उपस्थित राहून सहयोग द्यावा अशी विनंती आहे.

आपले नम्र

श्री. हनुमंत आदवडे सरपंच
ग्रा पं. चिखलगाव

सौ. शैलाताई मंडलीक

श्री भाऊराव दांडेकर दापोली

श्री वि. दि. गाडगीळ ता. पं. स. सदस्य

श्री. विठोबाशेट मयेकर सरपंच कोळथरे

श्री. व्यं. वा. मंडलीक अध्यक्ष
टि. स्मा. मंदिर दापोली

श्री. रा. म. बिवलकर
ता. पं. स. सदस्य

श्री. रतनलाल भंडारी दाभोळ

श्री. विनायक जगन्नाथ टिळक चिखलगाव

श्री. द. मो. घांगुर्डे सरपंच ग्रा. पं. नानटे

**कार्यक्रम**

शनिवार दिनांक १ ऑगस्ट १९७०
सकाळी ९–३० वाजता

**टिळक स्मृती वंदन**
स्थळ : चिखलगाव ग्रामपंचायत कार्यालय
अध्यक्ष : बाबासाहेब साळवी
सभापती पं. स. दापोली

सायकाळी ५ वाजता

**जाहीर सभा व समिती स्थापना**
स्थळ : लो. टि. स्मा. मंदिर दापोली
अध्यक्ष : श्री. काळुरामशेट मालू
सरपंच, ग्रा. पं. दापोली
प्रमुख वक्ते : श्री. ग. माजगावकर
संपादक माणूस, पुणे

चिखलगाव येथे जाण्यास दापोलीहून सकाळी ६ व ९–४५ वाजता व दापोलीस परतण्यासाठी चिखलगावहून दुपारी १ वाजता एस्. टी. ची गाडी आहे.

१ ऑगस्ट १९७०

# माणूस

वर्ष : दहावे
अंक : नववा

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
|---|---|---|
| चाळीस पैसे | वीस रुपये | चाळीस रुपये |


## सप्रेम नमस्कार...

◻ 'माणूस'चा १८ जुलैचा अंक वाचला. 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी॥' हा कै. ह. भ. प. निजामपूरकरबुवा यांच्यावरील श्री. दीनबंधु मुरलीधर उपासनी यांचा लेख फार आवडला. अभिनंदन पूर्वी हनुमान जयंतीचे उत्सवात, गवत्या मारुतीसमोर रात्री निजामपूरकरांची कीर्तने ऐकलेली आठवली एका बाजूला अप्पा बळवंत चौक व दुसरीकडे नूतन मराठी अशी हजारो लोकांची गर्दी असे व रात्री १–२ पर्यंत कीर्तन चाले. अशा आणखी कीर्तनकारांचा (उदा. पटवर्धनबुवा, काशीकरबुवा, शिरवळकरबुवा) चरित्रे तुम्ही छापल्यास गंमत येईल.

१६ जुलै, ७० — श्री. ज. जोशी, पुणे

◻ आपल्या 'माणूस'च्या १८ जुलैच्या अंकात ह. भ. प. मुरलीधरबुवा निजामपूरकर यांचा जो प्रत्ययकारी परिचय श्री. दीनबंधु उपासनी यांनी लिहिला आहे तो वाचून मनास विशेष समाधान वाटले. निजामपूरकर याची अनेक रसाळ कीर्तने मी तल्लीन होऊन व डोळ्यातील अश्रुधारांना वाट करून देत ऐकिली आहेत. त्याचे भगवंतावरील अविचल प्रेम व रससिद्ध वाणी केवळ अलौकिक. त्यांचे स्मरण करून

मुखपृष्ठ चित्र : सुरेश आठवले, पुणे

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

आपण धर्मऋण फेडलेत. धन्यवाद. त्यांचा आवडता श्लोक असे तो असा :—

खगेशासना, शासना दानवाच्या । जगत्पावना पाव नाथा रमेच्या ।।

तुटो नाम-ना नामलावण्यकंदा । पदी वास दे वासुदेवा मुकुंदा ।।

त्याचे स्मरण करून हे पत्र संपवतो.

१६ जुलै, ७० — वि. म. कुलकर्णी, सोलापूर

□ संदर्भ : माणूस साप्ताहिकात 'भुवन सोम'वर आलेल्या लेखासंबंधी एक किरकोळ तपशील दुरुस्ती—

भुवन सोम अविवाहित नसून विधूर आहे. आपल्या स्वतःच्या मुलाला गैरकारभार केल्याबद्दल त्याने नोकरीतून काढून टाकले आहे.

भुवन सोमच्या मनात येणारे विचार बंगालीत संवादरूपाने असल्यामुळे कदाचित् ते श्री. तेंडुलकराच्या नजरेतून सुटले असतील.

१७ जुलै, ७० — अजय पाटील, मुंबई

□ आपल्या दि. ११ जुलै १९७० च्या अंकांतील 'प्रेतयात्रा की प्रचार यात्रा' ह्या वार्तापत्रावरील श्री. सुधीर जोशी यांचे खुलासेवजा—प्रतिक्रिया व्यक्त करणारे पत्र वाचले. सच्च्या (?) शिवसैनिकाकडून अशी एखादी प्रतिक्रिया अपेक्षीत होती. कारण 'तुम्ही शेण का खाता ?' असा प्रश्न जर शिवसैनिकाना विचारला तर "तुम्हीही शेण खा !" "इतर लोक शेण खातात त्याबद्दल तुम्ही का बोलत नाही" अशा प्रकारची उत्तरे देण्याचा शिवसैनिकाचा गुण सर्वश्रुत आहे. त्यामुळे सुधीर जोशी यांच्या प्रतिक्रियेबद्दल नवल वाटण्याचे कारण नाही.

परंतु नवल वाटले ते एकाच गोष्टीचे आणि ती म्हणजे "कै. ढवण यांच्या मृत्यूनतर सर्व दुकाने बंद होऊन मुबईने श्रद्धांजली वाहिली. दुकाने बंद करण्याचा आदेश शिवसेना प्रमुखांनी दिला नव्हता."

अशा प्रकारच्या उत्स्फूर्त श्रद्धांजलीचा मान केवळ कै. लालबहादूर शास्त्री व काहीशा प्रमाणात कै. पं. जवाहरलाल नेहरू ह्या पुढाऱ्यांना मिळाला होता. त्यानंतर असा मान कै. पं. दिनदयाळ उपाध्याय व डॉ. राममनोहर लोहिया ह्या राष्ट्रवाद्यांना सुद्धा मिळाला नाही.

अशा उत्स्फूर्त श्रद्धांजलीचा मान केवळ कै. सदाकांत ढवण सारख्या साध्या शिवसैनिकाला मिळावा, यामागील इंगीत, श्री. सुधीर जोशी, 'माणूस'च्या वाचकाना सागतील काय ? की सत्य शोधण्यासाठी 'माणूस'च्या वाचकांना मुंबईतील दुकानदारांना भेटावे लागेल ? कळावे.

२३ जुलै, ७० — वामन शेणॉय, कल्याण

□ २५ जुलैच्या अंकाच्या मलपृष्ठ चारवरील श्री. वसंत सरवटे यांचे व्यंगचित्र फर्मास आहे. राजकर्त्यांनी त्यापासून धडा घ्यावा.

२२ जुलै ७० — शरद जोशी, डोंबिवली

‘ जोगकंस ’चे सौंदर्य कशात आहे हे माहित नसलेल्या जितेंद्रने त्यादिवशी बैठकीसाठी तोच राग निवडला, आणि त्याची पार मोडतोड करून टाकली. गळा फिरतो आहे मार तानाचे सट्टे असा प्रकार सुरू झाला. समोरच बसलेले एक वयस्कर गृहस्थ मात्र संतापाने लाल होऊ लागले. पोटच्या गोळयाचा त्यांच्या डोळयासमोर खून होत होता. शेवटी तर हे असह्य होऊन त्यांनी बैठक सोडली व ताडताड निघून गेले. जितेंद्रने बैठक संपल्यावर मित्राला विचारले,

“ खंय् गेलो रे तो आजो ” ?

“ जे निघून गेले त्यांचं नाव पंडित जगन्नाथबुवा पुरोहित. ज्या रागाची तू चिरफाड केलीस त्याचे जनक ”

“ माका सांगपाचे तुवें ” असे म्हणत म्हणत जितेंद्र उठला व खाली धावला ... ... ...

आघाडीचे गायक जितेंद्र अभिषेकी यांचा
वा. वा. गोखले
यांनी करून दिलेला
खुमासदार परिचय

# माणूस

## ८ ऑगस्ट विशेषांक

**पृष्ठसंख्या सुमारे १०० । किंमत ८० पैसे**

# एक पछाडलेले व्यक्तित्व आणि ताजमहाल

सौ. मंदाकिनी गोगटे

चित्र वा वास्तु का सुंदर आहे हे सांगता येईल का? नाही. कारण ती स्वतः अनुभव घेण्याची बाब आहे. अमुक एक चित्र का आवडलं? ते दुसरं का आवडलं नाही? हे फूटपट्टीनं मोजून सागण्यासारखं सोपं आहे का? आपण म्हणू ते चित्र आमच्या डोळ्यांना छान वाटलं म्हणून आवडलं बाकी काही सागता येत नाही. ते चित्र किती आवडलं, कसं आवडलं हे फार तर सांगता येईल. फार तर चित्रात रंग आणि तोल (Balance) साधला आहे म्हणून चित्र आवडलं असंही सांगू शकू. पण का आवडलं हे सांगायचं नव्हे त्याबाबत सतत बोलत रहायचं ही किमया माधव आचवल करू शकतात.

ताजमहालचे आणि माधव आचवलांचे नाते एक तपाहूनही जास्त वर्षांचे. ताजमहालने जणू त्यांना पछाडले आहे. ताजमहाल का सुंदर दिसतो त्याचे रसग्रहण दहा-पाच मिनिटे नव्हे तर चांगले एक दिड तास त्यांनी परवा साहित्यसंघात केले. वा. भ. जोशीच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने. ऐकताना श्रोते भारावून गेले, मंत्रमुग्ध झाले. चित्र आणि शब्द ह्यांच्या सीमारेषेवर उभी राहून रसग्रहण करणारी अशी ही एक असामान्य व्यक्ति. स्लाईड्स, रंगीत फिल्म व शब्द ह्या माध्यमाद्वारे त्यांनी हे साधले आहे.

प्रथम ते सांगतात ताजमहाल हा पार्थिव असला तरी तो अपार्थिव भासतो. एखाद्या चित्रासारखा वाटतो. त्यावेळीच काही वेगळे, काहीसे निराळे कानावर पडत आहे ह्याची जाणीव होते.

मग ते हळूहळू ताजमहाल कसा अपार्थिव दिसतो ते सांगायला सुरुवात करतात. ताजमहाल पहायला आपण जातो तेव्हा प्रथम प्रवेश करताना एक मोठी इमारत दिसते. त्या इमारतीची भिंत प्रचंड आहे. त्या भिंतीमुळे आपल्या दृष्टीतून बाह्य निसर्गाचा संबंध तुटतो. व त्यामुळे आतील निसर्ग पहाताना तो आपल्याला स्वच्छ स्वरूपात दिसतो. व त्याचे स्वतःचे असे निराळेपण लक्षात येते.

मग प्रवेश करताना एक मोठी कमान आहे त्यातून आपण ताजमहाल व त्याचा परिसर पहातो. एखाद्या सुंदर चित्राला चौकट घालावी तसा ह्या कमानीचा उपयोग झाला आहे. ह्या चौकटीमुळे समोर जे दिसते ते चित्र आहे असा भास होतो. ह्यावेळी ताजमहालची स्लाईड दाखवली जाते. चौकटीतून तो कसा दिसतो ते प्रत्यक्ष दाखवले जाते.

आता हा ताजमहाल घनाकार आहे. ही घनता व स्थूलता कमी कमी करण्याकरता अनेक क्लृप्त्या योजिल्या आहेत. त्यामुळे तो अपार्थिव भासतो. प्रथम-दर्शनी त्याचा रंग. तो स्वच्छ पांढरा आहे. हीच वस्तू काळी असेल तर ती जास्त घन आणि जड वाटते. पण ह्याचा रंग स्वच्छ पांढरा असल्याने तो तितका घन भासत नाही. हा पांढरा रंगसुद्धा स्वच्छ अशा संगमरवराचा आहे. त्यावर पडणारी आपली दृष्टी परावर्तित होते व त्यामुळे वस्तूचा जो स्थूलपणा असतो, जे जडत्व असते ते नाहीसे होऊन वस्तु हलकी फुलकी वाटू लागते. हेच जर विटा-दगडांच्या इमारतीला रंगसफेती फासली असती तर ताजमहाल हा इतका हलका जाणवला नसता. संगमरवरामुळे ही किमया साधलेली आहे. त्यावर पडणारी आपली दृष्टी परावर्तित होते. त्यामुळे त्या घन अशा वस्तूतही हलकेपणा आलेला आहे.

शेजारी दोन्ही बाजूला उभ्या असलेल्या मशीदींचा लालट रंग, झाडांचा निळसर हिरवा रंग व आकाशाचा निळा रंग ह्या पार्श्वभूमीवर हा तरल पांढरेपणा डोळ्याला आणखीनच सौम्य आणि हलका वाटतो.

वस्तू त्रिकोनी वा गोल असेल तर त्याचा मध्यबिंदू एकच असल्याने तिच्यात स्थूलता नि बोजडपणा येतो पण ताजमहालमध्ये हे टाळलेले आहे. त्याच्या वरच्या ज्या कमानी आहेत त्या लंबवर्तुळाकार आहेत. लंबवर्तुळाकारात मध्यबिंदू अनेक असल्याने दृष्टी एकाच ठिकाणी जखडून टाकल्यासारखी होत नाही. त्यामुळे वस्तूची घनता व स्थूलता कमी होते व वस्तू अपार्थिव असल्याचा भास होतो.

घनाकार वस्तूच्या कडा ह्या करकरीत वाटतात. डोळ्यांना खुपतात. पण ह्या कोन जसजसा विस्तृत होत जातो तेंव्हा त्याच्या कडा ह्या सौम्य होत जातात. त्या डोळ्यांना तितक्याशा खुपत नाहीत. स्लाईड दाखवून त्यात घनाकार चौकोनी व अष्टकोनी ठोकळ्याची चित्राकृती दाखवून आचवल प्रत्यक्ष प्रमाण समोर दाखवून हे पटवतात. आणि मग सांगतात, ताजमहालही अष्टकोनी असल्याने त्याच्या कडा सौम्य झाल्या आहेत. ह्या अष्टकोनामुळे कोपरे सौम्य असतातच पण अष्टकोनामुळे

भिंतीची रुंदी कमी होते. त्या जास्त उंच वाटतात व त्यांचे जडत्व कमी होते.

ज्या चौथऱ्यावर ताजमहालाची कृती उभारली आहे त्या चौथऱ्याची वरची बाजू दिसतच नाही तर ती एक रेषाच फक्त दिसते. त्याच्या पायऱ्यांची योजनासुद्धा आतल्या बाजूनं आहे. ह्यावेळीहं प्रत्यक्ष प्रमाण म्हणून समोर स्लाईड दिसत असते व आचवल म्हणतात त्याप्रमाणे ताजमहाल हे चित्र त्या चौथऱ्यावर अलगद ठेवले आहे की काय असे भासते.

कडेचे चार मनोरे जे उभे आहेत ते व ताजमहालची उंची एका कर्व्हमध्ये आहे. (हे ही स्लाईडद्वारा सप्रमाण दाखवले जाते) त्यामुळेच त्याच्या संगतीत कमनीयता व लय साधली आहे.

चौकटीतून ताजमहालकडे पाहिलें असता क्षितिज रेषेचा (आकाश व जमीन जेथे एकमेकाना मिळत आहेत असा भास होतो ती रेषा) पुढचा परिसर व मागचा परिसर ⅓ भाग आहे. ह्या क्षितीज रेषेवर (Horizontal Line) ताजमहाल उभा असल्याने त्यात आकाशाचा पुष्कळसा भाग येतो त्यामुळे ताजमहाल ही एक आकाशातीलच वस्तू वाटते.

अशाप्रकारे सुंदरतेचे एक एक कारण आचवल सांगत जातात व आपण मंत्रमुग्ध होतो. वाटले ताजमहाल पाहिला त्या वेळी आपणही मंत्रमुग्ध झालो, किती पाहिले तरी समाधान झाले नव्हते; पण अशाप्रकारे त्यात किमया दडलेल्या आहेत हे मात्र कधी लक्षातच आले नाही. कधा लक्षात आलेही नसते.

मग पिकासोचे स्लाईडद्वारा चित्र दाखवले जाते. आचवल आपली जादूची छडी त्यावर ठेवून म्हणतात हे पिकासोचे चित्र. ह्यात वस्तूची घनता दाखवण्याकरता बाजूही दाखवली गेली आहे. ताजमहालमध्ये नेमका उलट उपयोग केला आहे. ताजमहाल अष्टकोनी आहे. त्याच्या बाजू दाखवून त्याची नेमकी घनता कमी केली आहे.

आचवल आपल्या जादूभरल्या शब्दात बोलतच असतात. स्लाईडही दाखवली जाते. उडणारे कारंजे, सभोवती खेळते पाणी नि निळसर हिरवीगार तदाकार झालेली झाडे. ह्या पाण्यात स्थिर असलेली झाडे डोलतात. आणखी पुढे गेलं की पाण्याचे आणखी एक आडवं तळं, त्यात ताजमहालचं प्रतिबिंब हलत असतं. आणि आचवल सांगत असतात ह्या सभोवती खेळणाऱ्या पाण्यामुळे स्थिर वस्तू प्रतिबिंबित होतात. व स्थिर कोणते आणि अस्थिर कोणते ह्याचा संभ्रम होतो.

मग रंगीत फिल्म दाखवली जाते. कॅमेऱ्याद्वारे आचवलांनी ताजमहाल व आजूबाजूच्या परिसराचे चित्रण विलक्षण तन्मयतेने व हळूवारपणे दाखवले आहे.

अगोदर फत्तेपूर सिक्री वगैरे भाग दाखविला जातो. आचवल म्हणतात तो भाग डोळ्याला अगोदर कॅमेराची सवय होण्याकरता दाखवला आहे. पण नाही; मला वाटते ती अगोदरची दृश्ये पार्थिव स्वरूपात डोळ्यासमोर उभी रहातात म्हणूनच त्या बोजडपणासमोर ताजमहालाची अपार्थिवता मनाचा वेध घेते.

एक एक चित्र पुढे सरकतच असते. नाजुक फुलांची फांदी डोलत असते. इतकी नाजूक फुल की पेन्सीलीनं आकारबद्ध करणेच शक्य नाही. नाजूकतेला बाध येईल. चित्रित कराविशी वाटलीच तर तुलीका हातात घेऊन रंगाशी नाते जुळले पाहिजे. उमलती फुलं आहेत पण त्यात रंगाचा नेमस्तपणा नाही. त्यात निरनिराळ्या छटा आहेत. त्यामुळे त्यात चैतन्याचा भास होतो.

त्यानंतर चित्र पुढे सरकतच असते. ताजमहालाची बाह्यांगावरील नाजुक नक्षी. निरनिराळ्या आकारातले ते कुशलत्व मंत्रमुग्ध करते. नक्षीसारखी वाटणारी उर्दू लिपी वा प्रत्यक्ष नक्षी म्हणजे जणू अलगद लय घेत एकमेकांना छेदत गेलेल्या रेषा. ह्या रेषात लय आहे, कोमलता आहे व वेग आहे. मग त्या नक्षीसहीत असलेला ताजमहालही नाजुक नि तरल भासतो. हे सारे कोणीही प्रत्यक्ष ताजमहाल पहातो तेव्हा जाणवतेच. ह्यात आचवलाचे कौशल्य नाही. ते पुढेच आहे.

चित्र पुढे पुढे सरकत असतात. एक सुंदरशी खार दिसते. खार थोडा वेळ स्थिर आहे, पण तेवढ्यात ती पळू लागते. मग एक सावळा पक्षी दिसतो, तोही स्थिर आहे. पण तेवढ्यात तोही भुर्कन उडून जातो. माणस चालत आहेत. खुळावणारी त्यांच्या पावलांची ती मंद लय नेमकी टिपली गेली आहे. चालणाऱ्या बायकांचा झुळझुळता लाल रंग बोलत आहे. त्यांची पाण्यात पडलेली प्रतिबिंबे सचेतन झाली आहेत. स्थिर वाटणाऱ्या झाडांच्या लयदार फांद्या डोलत आहेत. मधून मधून ताज-महालही दाखवला जातो. त्याचे हलत्या पाण्यातले सचेतन असे प्रतिबिंब. स्थिर झाडे, त्यांची अस्थिर प्रतिबिंबे. एकामागून एक वेगाने सरकणाऱ्या चित्राकृतीत स्थिर कोण नि अस्थिर कोण ? पार्थिव कोण नि अपार्थिव कोण ? सचेतन कोणते अचेतन कोणते ? ह्याचाच दृष्टिभ्रम होतो. काहीच कळेनासे होते. स्थिर वाटणारी खार थोड्या वेळाकरता थांबली व पळून गेली. स्थिर वाटणारा पक्षीही बघता बघता उडून गेला. मग नाजूक, तरल नि चित्रमय वाटणारा हा ताजमहालही थोड्या वेळाकरता उभा आहे व तोही त्या पक्षासारखाच उडून जाणार आहे असा भास निर्माण होतो.

सारा कार्यक्रम संपतो. वाटतं, ताजमहाल पाहून आपण भारावलो. पण थोड्या-वेळान जाणवतं तेवढेच नाही, माधव आचवल ह्यांच्या कौशल्याने आपण भारा-वले गेलो.

□ □ □

मुंबई

# दिल्लीचे तिकीट काढावे का मंथली पासच बरा?

पाच मिनिटं! म्हणजे कमाल झाली. सारखं मनात सलतं आहे. आपण बाहेर काहीही सांगितलं तरी खरी गोष्ट काही लपून राहत नाही. पेपरमध्ये चक्क छापून आलं. फक्त पाचच मिनिटं! आणखी दुसरे दिवशी तर त्यावरही कडी. एका पेपरमध्ये तर खरोखरच छापून आलं की बाई आपल्याला चारच मिनिटं भेटल्या म्हणून, बर तर बरं साडेतीन मिनिटं छापून आलं नाही. हे पेपरवाले काहीही छापतात. आता हे चार मिनिटं न् पाच मिनिटं वगैरे छापण्याची काही गरज? आम्ही बाईंना भेटलो ना. त्यांना आपला सीमा प्रश्न लवकर सोडविण्याची गरज समजावून सांगितली ना– (जस काही बाईंना काही ठाऊकच नाही. आणि साडेतीन मिनिटात काय सांगणार म्हणा)– मग झालं तर. पण हे काय! चक्क टिंगल! काय तर म्हणे बाई आम्हाला पाचच मिनिटं भेटल्या. भेटल्या ना! या पेपरवाल्याच काम झालं. बाई त्याना कितीही वेळ भेटतात, त्यांच्याशी बोलतात पण आजकाल आपल्या पक्षाच्या लोकांना भेटणे किती कठीण झालं आहे हे पेपर-वाल्यांना काय ठाऊक? त्यातून आपण पडलो मुख्यमंत्री! मुख्यमंत्र्यांना भटायला पंतप्रधानाना वेळ आहे कुठे? त्याच्यावर देशाच्या केवढ्या जबाबदाऱ्या! त्यातल्या त्यात वेळात वेळ काढून आपल्याला पाच मिनिटं बाईंनी दिली हे काय कमी आहे? (साहेबांना तर म्हणे बाई तेवढाही वेळ देत नाहीत बोलायला असल्या कामासाठी. इतक्या बाई बिझी असतात.) पण या पेपरवाल्यांना काहीच नाही त्याचं. उगाचच आपले पाच मिनिटं–पाच मिनिटं म्हणून हिणवत असतात

पण खरं म्हणजे बाईंनी असं करायला नको होतं. काहीही झालं तरी आपण एका चार कोटी लोकसंख्येच्या राज्याचे मुख्यमंत्री आहोत. मुंबईत आपला केवढा दरारा. अपॉइंटमेन्ट घेऊन भेटणारांची दारासमोर रांग असते. मंत्री, व्यापारी, बडे बडे कारखानदार, नटनट्या कधीकधी तर फॉरेनर्संसुद्धा आणि प्रत्येकाला फक्त पाच–

पाच–दहा–दहा मिनिटं वेळ म्हणजे एकदम रुबाब. मुबई म्हणजे काय मिस्टर! तिथे चाहेल ते करू.

आणि आपण तिथून सगळ्या अपॉइंटमेन्टस् रद्द करून निघालो. पंढरपूर, सोलापूर, कॅबिनेट मिटिंग–वगैरे. विमानाने उडालो. मुंबईत धमाल बातम्या. म्हणे पंत-प्रधानांनी आम्हाला तातडीचे बोलावणे पाठविले इकडे आपला फुसका बार! पाचही मिनिटं भेट नाही आणि भेट म्हणजे तरी काय तर आपण आपल बडबडत बसायच. बाईंच लक्ष आहे नाही. वेळ झाली की उठायचं. पडलेल्या चेहऱ्याने बाहेर यायचं. बाईंची मात्र कमाल आहे. थांगपत्ता लागू देत नाही. आपल्याला तर काही बोलताच येत नाही.

आणि आपण तिकडून मारे आपले सगळे प्रोग्राम रद्द करून निघालो होतो. करणार काय? अगोदरच विदर्भाचा माणूस म्हणून बेळगाव आणि सीमा–भागात इंटरेस्टच नाही अशी टीका होते आहे... याला काही अर्थ? गेल्या पाच सहा महिन्यात किती दिल्लीच्या वाऱ्या केल्या आणि किती वेळ बाईंना भेटलो याचा हिशेब सागू? मारामारी करायची नाही हे आपलं धोरण. काही टिकोजीराव भलतेच उत्साही. बेळगावसाठी म्हणे बाईंचं सरकार पाडायचे. हुँ:! काही तरीच काय. काय करायचं ते चर्चा बोलणं करून करायचं. धरणं न फिरणं कशाला करायचं? असं बोललं की म्हणतात तुम्हाला तिडीकच नाही. मग तुमच्या साहेबांना तरी काय तिडीक आहे हो? आतापर्यंत काय केल त्यांनी? होम मिनिस्टर झाल्यावर कानावर हात ठेवून चतुराईनं अंग काढून घेतले पण आता फायनान्स हाती आहे. आता साहेबाना बोलायला काय हरकत आहे? पण अऽहं! साहेब तोडाला कुलुप लावू गप्प! आता बेळगावला पुसद जवळ आहे की कराड? साहेबाची मान बाई समोर आल्यावर वर उचलली जाईल तरच ते बोलतील ना. आम्ही मात्र मुबई–दिल्ली–मुबई–दिल्ली अशा वाऱ्या करीत घाम गाळायचा आणि वर शिव्या खायच्या–तिडीक नाही–इटरेस्ट नाही वगैरे! विदर्भाचा माणस ना.

परवा येणं भागच होतं सांगून ठेवलं होत ना की पंधरा दिवसात प्रश्न सुटेल म्हणून. काही तरी करण भाग होत म्हणून आपली दिल्लीला धडक मारली एवढच. पण म्हणून काय फक्त चार–पाचच मिनिट बाईंनी द्यावीत? टुरिस्टांशीसुद्धा बाई चक्क पधरा मिनिट आणि अर्धा अर्धा तास गप्पा मारत बसतात आणि आम्हाला पाचही मिनिटं नाही! तुळशीदास जाधव जाऊन केव्हाही बाईंना भेटतात. बाई तर चक्क एस् एम्. जोशींना तीन–तीनदा बोलावून घेतात. आणि आम्हाला पाचही मिनिटं नाही? छे छे! धिक्कार असो या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाचा! आपल्या जागेच एवढं अवमूल्यन कस झालं? मनात एकदा सणक आली की...पण लगेच विचार केला, डोक भडकावून प्रश्न सुटणार नाही. मस्तक थंड केलं आणि बाहेर

येऊन बातमीदारांकडे ठोकून दिलं, 'तीन ऑगस्टपर्यंत प्रश्न सुटेल अशी आशा आहे.'

अशी किती वेळ किती गाजरं पुढे केली आहेत. पण आता मात्र असं चालणार नाही असं दिसतय. लोक वैतागतील. काही तरी करायला पाहिजे आहे. काही तरी कृती पाहिजे आहे.

पण बाई महा वस्ताद. आम्ही इकडे बोलतो आहोत की तीन ऑगस्टपर्यंत काही तरी कळेलच म्हणून आणि तिकडे बाई बोलताहेत की प्रश्न सोडविण्याची घाई करता कामा नये. खूप वेळ झाला आहे. आणखी थोडा होईल धीर धरा-वगैरे. घ्या. म्हणजे ही गोष्ट आमच्याजवळ बाई बोलल्या असत्या तर काय बिघडलं असतं. आम्ही इकडे मोठ्या जोषात तीन ऑगस्ट म्हणून बोंब मारली आणि बाईंनी बरोबर आमचं विमान पाडलं. आता पुन्हा दिल्ली वारी करणं आलं की नाही ? किती वाऱ्या करायच्या ? खरं म्हणजे या वाऱ्याचा काही उपयोग नाही. दिल्लीला धडक मारली की बाई भेटतातच असं नाही. आणि भेटल्या की बोलतातच असंही नाही. मग उगाचच वेळ फुकट का घालवायचा ? वैताग येतो, पण गेलं पाहिजे. लोकांना तीन ऑगस्ट सांगितलं आहे. ती तारीख आता कमीत कमी १५ ऑगस्ट नाही तर तीन सप्टेंबरपर्यंत तरी ढकलली पाहिजे.

तीन ऑगस्टला विधानसभा आहे. भिवंडी, कृष्णा देसाई, ढवण वगैरे प्रकरणी लोक बोंबाबोंब करणार आहेत. त्यात ही भर नको. नुसते विरोधी पक्षाचे लोक आरडाओरड करणार असते तर त्यांना निपटून घेतलं असतं. पण यावेळी तर पक्षातल्या लोकांचाच भरवसा नाही. बाळासाहेब देसायांच्या राजीनाम्याचंही निमित्त आहे. भरपूर शिवराळपणा होणार. प्रसंग मोठा बाका आहे. पण बघून घेऊ. दिल्लीला मात्र गेलंच पाहिजे. यावेळी मात्र प्रोग्राम वगैरे कॅन्सल करायचे नाहीत. उगाच ड्रामा नको. नाहीतर मागच्या वेळेसारखी फजिती व्हायची.

बरं समजा, बाईंनी मनात आणलं की प्रश्न सोडवायचाच लवकर. तर उत्तर आपल्यासारखंच मिळेल याची शाश्वती नाही. बाई महा धूर्त राजकारणी आहेत. (साहेब तिच्यापुढं काहीच नाहीत.) आपल्याला आणि वीरेन्द्र पाटलांना—दोघानाही सध्या त्या खेळवताहेत. अर्थात सध्या त्यांना आपल्यापेक्षा वीरेन्द्र पाटलांचीच किंमत जास्त. आपण नाराज झालो तर जाऊन जाणार कुठे ? म्हैसूरला मात्र सांभाळायला हवे. आणि आपली नाराजी साहेबांच्या नाराजीवर अवलंबून. साहेब कधी नाराज होतात ? तेव्हा आपल्या राजी नाराजीची बाईंना तरी काय किंमत ? त्यांचं लक्ष म्हैसूरकडे. निजलिंगप्पा कितीही म्हणोत की शंभर पंतप्रधान म्हैसूरात येऊन गेले तरी संघटना काँग्रेसला धक्का बसणार नाही. पण बाईंच्या एकाच झटका-भेटीत म्हैसूर हादरला. बेळगाव महाराष्ट्राला देऊन बाई म्हैसूरला कशाला नाराज करतील ? आम्ही लाख सांगतो आहोत की मानवी दृष्टिकोनातून हा प्रश्न सोडविला

पाहिजे वगैरे. इतके वेळ सांगितलं आहे की लोक आता टिंगल करतात. पण बाई मात्र हा प्रश्न राजकीय दृष्टिकोनातूनच बघतात. आता त्याला काय करणार? पुन्हा आपली एक दिल्लीची फेरी मारून बाईंना आणि तिथल्या बातमीदारांना आपला प्रश्न समजावून सांगायचा एवढेच आपल्या हाती आहे.

आता आपल्या डोक्यावर काय फक्त बेळगावचाच प्रश्न आहे? बाईंसारखं सतरा राज्यात हिंडून राज्याराज्यातली मंत्रिमंडळं उलथण्यासारखी महान जबाबदारी जरी आमच्या अंगावर नसली तरी आमच्याही राज्याचे काही प्रश्न आहेतच की. सगळा वेळ बेळगावसाठीच द्यायचा? मुंबईचे उद्योगधंदे आहेत, मुंबईचे वाहतुकीचे प्रश्न आहेत, साखर कारखाने आहेत. पुसद, यवतमाळ वगैरे सारख्या मागासलेल्या भागांच्या विकासाचे प्रश्न आहेत, शिवसेनेवरून लोकांचं लक्ष उडवायचं आहे. वगैरे – झालंच तर भूमिहीनांचे वगैरेही प्रश्न आहेत. म्हणजे थोडे का उद्योग मागे आहेत? थोडीशीदेखील फुरसत मिळत नाही. कित्येक दिवसात शिकारीला गेलो नाही. नेपाळला गेलो होतो तेव्हापासून गेलो नाही. कधी कधी नको वाटतं मुख्यमंत्रिपद. ढीगभर कामं करायची, सगळा वेळ लोकांसाठी द्यायचा आणि भाराभर शिव्या खायच्या ही काय साली गंमत झाली.

आता शिवसेनेचंच बघा ना! सगळे लोक आम्हालाच शिव्या देताहेत. आमचा काही संबंध! त्यांनी मुंबई बंद केली आपण गडबड नको म्हणून जास्तीत जास्त काळजी घेतली. तर म्हणे की आम्हीच शिवसेनेला मदत केली. म्हणजे कमाल आहे की नाही. शिवसेना कुणी निर्माण केली हे काय लोकांना ठाऊक नाही? आता हे खरं की एकदा विमानतळावर आम्ही बाईंशी बाळ ठाकरेंची भेट घडवून आणली होती. (काय घनचक्कर फेरा आहे बघा. ठाकऱ्यांना आम्ही पाच मिनिटाची भेट मिळवून दिली. आणि बाईंनी आम्हाला दिल्लीत पाचही मिनिटं देऊ नयेत अं!) पण तेही कशासाठी को उगाच गडबड नको म्हणून. पण त्यासाठीही आमच्यावर आगपाखड. काय तर म्हणे ठाकरेला आम्ही पाठीशी घालतो. गहजब आहे

आता परवा काही नक्षलवादी टाळक्यांना पकडलं. मुंबई-पुण्याचे लोक. खरंच नक्षलवादी आहेत की नाही कुणास ठाऊक. पण पकडलं. नाहीतरी बाईंनाही ते पाहिजेच होतं. तेवढंच मुंबईत सेन्सेशन. शिवसेनेवरून तेवढ्यापुरतं तरी लोकांचं लक्ष कमी होईल. बघू या आता असेंब्लीत काय होतेय ते. पण पकडलं हे बरं झालं. प्रकरण वाढलं असतं तर उगाच डोक्याला ताप झाला असता. मुंबईत शिवसेना परवडली. पण नक्षलवादी नकोत.

जळगाव-भिवंडीबाबतही असेंब्लीत बरीच मारामारी होणार हे नक्की. आरोपी अर्थात आम्हीच. त्यातल्या त्यात बाळासाहेबांनी राजीनामा दिला हे बरं झालं.

पृष्ठ ६२ वर

ग्यानबा

## □ बहुत चिंता करू नये–ऐसी पुस्तके वाचो नये !

Reading makes a full man, conference a ready man & writing an exact man.. —समजलं ? एस्. एस्. सी. ला इंग्लीश घेतले असले तर समजेल-सुद्धा हो. म्हणजे वाचनाने मनुष्य परिपूर्ण होतो, सभात भाग घेऊन माणूस 'तयार' होतो आणि लेखन केल्याने माणूस अचूक होतो...हे फ्रान्सिस बेकन नावाच्या विद्वानाचे मत आहे. सभातून भाषणे करून माणसे 'तयार' होतात आणि 'तयार' झालेली माणसे मंत्री होतात ..आणि मग काय काय करतात ? रोज लिहिणारा प्राणी म्हणजे संपादक. संपादक किती अचूक लिहितात हे आपल्याला अनुभवाने माहितच आहे 'सघ ही एक भयकर दंगली करणारी जातीय संघटना आहे.' 'यशवंतराव अर्थमंत्री झाले हा त्याचा गौरवच होय !' 'तीन ऑगस्टपूर्वी बेळगावचा मंगल कलश वसंतराव आणतील' ...असे अचूक लिहिणारे संपादक कितीतरी आहेत. परंतु वाचनाने मनुष्य परिपूर्ण होतो की नाही ? याबद्दल आम्हाला जबर-दस्त संशय आहे ! वाचनामुळे पुष्कळवेळा देशावर आपत्ती येतात. बहुतेक वाचक हे घट्ट मनाचे नसतात. अशी माणसे वाचू लागली की पुस्तकातले विचार त्यांचा कबजा घेतात. मग 'तयार' झालेल्या आणि 'अचूक' झालेल्या माणसांनी काहीही सांगितले, वा लिहिले तरी ती माणसे त्यानी वाचलेल्या गोष्टीच खऱ्या समजून त्या इतरांना सांगू लागतात. मग 'तयार' माणसांची पंचाइत होणारच हो ! म्हणून चाचा नेहरूंनी पुस्तकांवर बंदी घालण्याचा कायदा पास करून घेतला. १६ मे १९५१ या दिवशी चाचा नेहरूनी लोकसभेला सांगितले–

'सध्या आतरराष्ट्रीय परिस्थिती अतिशय नाजुक आहे, खूप तणाव निर्माण झालेले आहेत; अशा वेळी जर आपण एखादी परदेशासबधीची चमत्कारिक गोष्ट आपल्या देशात पुन: पुन: सागितली तर त्यामुळे आपल्या देशाचे व त्या चमत्कारिक गोष्टीशी संबंध असलेल्या देशाचे सबंध बिघडतील ! एखादी गोष्ट पुन: पुन: सांगणे यातच मी पुस्तकांचा अंतर्भाव करतो...'

आपल्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय परिस्थिती वर्षानुवर्षे नाजुकच रहाणार आहे... आता २० वर्षानतर आंतरराष्ट्रीय परिस्थिती तर नाजुक आहेच पण देशातली

परिस्थिती तर फारच नाजुक झालेली आहे. निजलिंगप्पा, कामराज, अतुल्य घोष, स. का. पाटील, मोरारजी...हे सर्व थोर देशभक्त देशासाठी तूर्त काहीही करीत नाहीत. सगळा भार पडला आहे तो इंदिराजीवर, रघोबा खाडिलकरांवर आणि डांग्यांवर! 'न्यू एज' या लालभाईंच्या वृत्तपत्राने सांगून टाकले आहे—'केंद्रिय सरकारात डाव्यांना घेतल्याखेरीज ही नाजुक परिस्थिती बदलणार नाही.' म्हणजे केंद्र सरकारात रशिया-धार्ज्या करणारे लोक जायची वेळ एकीकडे आलेली आणि अशा वेळी रशियाला दुखवून कसे बरे चालेल? रशिया व भारताचे संबंध बिघडवणारे एक भयानक पुस्तक भारतात कुणीही वाचू नये असे इंदिराजींना वाटले यात नवल ते काय?

ग्रेव्हाईल वेन नावाचा एक ब्रिटिश व्यापारी खूप वर्षे रशियात होता. तो एकीकडे व्यापार करायचा आणि शिवाय ब्रिटिश हेर खात्याचे काम करायचा. या ग्रेव्हाईलने रशियन हेर खात्यातील एक अधिकारी पेंकोव्हस्की याला जाळ्यात ओढला आणि दोघांनी रशियातील गुप्त गोष्टी बाहेर पाठविल्या. एके दिवशी दोघे सापडले. १९६३ च्या मे महिन्यात सोविएट रशियाने दोघांना पकडून शिक्षा ठोठावल्या. म्हणजे पेंकोव्हस्कीला गोळ्या घातल्या आणि ग्रेव्हाईलला आठ वर्षांची शिक्षा दिली. तुम्ही म्हणाल ग्रेव्हाईलला का नाही हो गोळ्याच घातल्या? कारण रशियाचे दोन हेर इंग्लंडमध्ये पकडले गेले होते. त्यांनादेखील मग इंग्लंडमध्ये यमसदनाला पाठवले गेले असते. दुष्ट राष्ट्रे अशीच जशास तसे वागतात. आपण नाही असे वागत. आपण शेख अबदुल्लालादेखील जेवायला बोलावतो. आपला चांगुलपणा आपण मुळीच सोडायचा नाही. हां—तर म्हणून ग्रेव्हाईल काही वर्षांनी सुटला.

सुटल्याबरोबर ग्रेव्हाईलने पुस्तक लिहिले—'दि मॅन फ्रॉम मॉस्को'—हा कोण? तर पेंकोव्हस्की. या पेंकोव्हस्कीने जे जे ग्रेव्हाईलजवळ गुप्त म्हणून सांगितले त्याचा


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (वी. एन.) पो. कतरीसराय (गया)

असा का उपयोग करायचा ? ग्रेव्हाईलने पॅकोव्हस्कीचे कागदच प्रमाण दिले आहेत.' पॅकोव्हस्कीने भारीच भयंकर गोष्टी सांगून टाकल्या आहेत. तो काय म्हणतो पहा–

'देशोदेशी ज्या भारत–रशिया मैत्रीसंघासारख्या ४०–५० संस्था पसरलेल्या आहेत त्यात नेमली जाणारी रशियन माणसे ही रशियाचे गुप्तहेर खाते पुरवते. मी भारतात यायचे जवळजवळ ठरले होते. तेव्हा मला हेर खात्याने सांगितले–भारत हा आपलाच प्रदेश आहे. तिथ आपल्या उद्योगांना भरपूर वाव आहे.'

अहो हे काहीच नाही. पॅकोव्हस्की म्हणतो–

'मी जेव्हा पाकिस्तान खाते पहात होतो, तेव्हा पाकिस्तानात आपण कसे घातपात करायचे व त्याची जबाबदारी भारतावर कशी ढकलायची याच्या सर्व योजना तयार होत्या.'

आता हे पुस्तक भारतात लोकांनी वाचलें तर केंद्रात रशियावाल्या करणाऱ्यांना जनता येऊ देईल काय ? डांगे, भूपेश गुप्ता, रघोबा या सगळयांचे मग व्हायचे कसे ? ७२ च्या निवडणूकीतच पडले तर सगळे संपलेच की ! कसे ? लगेच बाईंनी ठरवले की या पुस्तकावर बंदी घालायची. कोण आहे रे तिकडे ? म्हटल्याबरोबर कायदा उपमंत्री माजी रत्नाकार, युनुस सलीम धावत आले. बाईंनी सांगितले–

'युनुसमियाँ पुस्तकावर बंदी घालायची आहे. पपांनी कुठला सेक्शन यासाठी ठेवलाय ?'

'सेक्शन दोन–कस्टम अॅक्ट १९५३...'

युनुस मियाँ समजला. ही काही तरी संघाविरुद्ध कारवाई आहे. त्याने तत्परतेने हुकूम लिहिला आणि बाईंनी धाडकन ग्रेव्हाईल वेन चे 'मॅन फ्रॉम मॉस्को' हे पुस्तक वाचायला, जवळ ठेवायला वा विकायला भारतात बंदी केली. हे पुस्तक भारतात येताच कामा नये !

जर तुमच्यापैकी कुणाला हे पुस्तक कुठे दिसले, तर ते वाचण्याचा प्रयत्न करू नका, आणि शक्य असल्यास ते जवळच्या पोलीस ठाण्यावर नेऊन द्या.

अशा वाचनाने देशावर जर आपत्ती येणार असेल, तर कुणीही देशभक्त हेच करील. रशिया व भारत यांचे संबंध बिघडतील असे आपण काहीही करता कामा नये. 'रशिया–भारत मैत्रीसंघाचा विजय असो ! ग्रेव्हाईल वेन मुर्दाबाद !' वाचायचीच लहर आली, तर 'सोविएट देश' वाचा. वेनच्या पुस्तकासारखी भयंकर पुस्तके वाचली तर उगाचच लोक 'वरी' करू लागतील. आणि वाचनाने 'परिपूर्ण' होण्याऐवजी ती 'वरीपूर्ण' होतील. इंदिराजींनी बारीक लक्ष ठेऊन हा धोका टाळला, याबद्दल कुणीही त्यांना धन्यवादच देईल, नाही का ?

□ □ □




रँड खुनाची जागा

# बाकी इतिहास !

१९३८ किंवा १९३९ साल असेल. मी त्यावेळी मुंबईला शाळेत शिकत होतो. मे महिन्याच्या सुट्टीत पुण्याला आलो असता, सायकलवरून गणेशखिंड रोडवर फिरताना रस्त्याच्या कडेला एक लहानसे दगडी थडगे केव्हातरी पाहिले. त्यावेळी तो रस्ता अगदीच अरुंद व धुळीचा होता. यामुळे रस्त्याच्या कडेला असलेले हे लहानसे दगडी बांधकाम चटकन नजरेत भरत असे. एक ४'×४' चा दगडी चौथरा. भोवती फूटभर उंचीची नक्षीदार जाड लोखंडी जाळी व मध्यभागी मोठ्या मैलाच्या दगडाच्या आकाराच्या स्मारकशिलेवर, संगमरवरी

चौकटीवर इंग्रजी भाषेत, ही शिला त्या ठिकाणी मारल्या गेलेल्या आयर्स्ट व रँड यांच्या स्मरणार्थ बसवल्याची नोद अशा स्वरूपाचे हे लहानसे बांधकाम तिथे आढळले. चाफेकरबंधूंनी रँड साहेबाचा वध केला वगैरे हकिगत माहीत होती, परंतु ही घटना नेमकी कुठे घडली, हे या स्मारकशिलेमुळेच कळत असल्याने, मी त्यावेळी मनातल्या मनात आयर्स्ट व रँड याच्या नातेवाईकांना धन्यवाद दिले.

त्यानतर जवळजवळ बीस-एकवीस वर्षांनी १९६० साली मी व्यवसायकारणाने पुण्यात आलो, तेव्हा गणेशखिंड रस्ता – चांगलाच रुंद व सुबक झालेला होता. रस्त्याच्या कडेची, आयर्स्ट-रँडची स्मारकशिला जवळजवळ आहे त्या स्थितीत होती. परंतु कठडा गंजून तुटलेला होता. सगमरवरी चौकटीवरची अक्षरे अगदी जवळ जाऊन प्रयत्न केल्याखेरीज वाचता येत नव्हती. परतु दिसत होती. फक्त या शिलेच्या आवतीभोवती रान माजले होते व कचरा फेकण्यास सुरुवात झाली होती. शिलेच्या चौथऱ्यावर बेवारशी मरतुकडी कुत्री सतत काहीना काही चघळत बसलेली वा झोपी गेलेली दिसत असत.

आता स्वातंत्र्य मिळून १४ वर्षे झालेली होती व जसजसे स्वातत्र्याचे वाढदिवस होत जातील, तसतशी या स्मारकशिलेवर व अवतीभोवती जास्त जास्त घाण होत जाईल व एकेदिवशी चाफेकरबधूनी रँड साहेबाला कुठे नेमका गाठला, ही गोष्ट इतिहासातून नाहीशी होईल, ही गोष्ट स्पष्ट दिसू लागली होती.

याबाबतीत काही हालचाल करावी असे वाटे. परंतु पुण्यात मी नवीन होतो. ओळखी-पाळखी नव्हत्या. मुख्य म्हणजे यासाठी चालना देण्यासाठी मी काही सक्रिय हालचाल करण्याची शक्यता नव्हती.

पुढली ३–४ वर्षे काहीच होण्यासारखं नव्हते. कारण पानशेत धरणफुटीने पुण्याचा भूगोल उध्वस्त झाला असताना, मेलेल्या इतिहासाची दखल नगरपालिका कशी घेईल ? ते बरे दिसले नसते.

–आणि एक दिवशी, या स्मारकाभोवती नेहमी उभ्या असणाऱ्या ट्रकपैकी एका ट्रकने – ही स्मारकशिला मुळातून उखडून ठेवली ! ट्रकवाल्याने कठडा आडवा करून शिलेला धडक दिली होती. आडवा झालेला लोखंडी कठडा अपेक्षेप्रमाणे लवकरच कुणीतरी मोडीत विकण्यासाठी उचलून नेला.

यावेळी पुण्याचे महापौर म्हणून ना. ग. गोरे निवडून आलेले होते. आता हालचाल केली तर काहीतरी निश्चित घडेल या अपेक्षेने मी २६ जाने. १९६८ या दिवशी त्यांना पत्र लिहिले. पत्र लिहिण्यापूर्वी वेरूळ मुक्कामी यासंबधी प्राथमिक माहिती मी त्यांना दिली होती. मी पुन्हा बदलीमुळे पुण्याबाहेर गेलेलो असल्यामुळे माझे मित्र प्रा. विद्याधर पुंडलीक यानी ना. ग. गोरे यांना भेटून – तोंडी माझ्या पत्रामागची भूमिका पुन: सांगितली. यासाठी लागणारे ३००–४०० रुपये मी व प्रा. पुंडलीक लेखक-मित्रांकडून उभे करणार होतो. पत्र पुढे देत आहे.

—श्री—

माननीय, महापौर ना. ग. गोरे २६ जाने. १९६८

यांसी कृ न. वि. वि

पुणे येथील गणेशखिंड रस्त्यावर ज्या ठिकाणी हुतात्मा दामोदरपंत चाफेकर यांनी रँड व आयर्स्ट या दोघा इंग्लिश अधिकाऱ्याचा वध केला त्या स्थळावर ब्रिटीश राजवटीने उभे केलेले स्मारक तूर्त अत्यत विकलावस्थेत आहे. सभोवतालचा कठडा तुटून गेला असून स्मारकशिला उखडलेल्या स्थितीत जमिनीवर टेकलेली आहे. ज्याप्रमाणे नाशिक येथील जॅक्सन् बागचे नाशिक नगरपालिकेने कान्हेरे उद्यान असे नामकरण केले, त्याप्रमाणे तूर्त रँड व आयर्स्ट याचे स्मारक म्हणन उभी असलेली ही लहानशी वास्तू दुरुस्त करून तिच्यावर हुतात्मा चाफेकराचे नाव निर्देशित करण्यात, मृताचा अपमान नसून, इतिहासातील तुटलेला दुवा साधल्यासारखेच ते होईल.

आता असलेल्या स्मारकशिलेवर खालील मजकूर आहे—

'Erected in the memory of Walturs Rand of Indian Civil Service & Lt. Charles Ayhrerst of India Staff Corps, who were killed on this spot on 22 nd June 1897.'

मूळ पाटी तशीच ठेवून त्याखाली हुतात्मा चाफेकरांचाच फक्त उल्लेख केल्याने हा हेतू सफल होईल. किंवा या स्मारकशिलेखाली मराठीत आणखी एक शिला बसवावी व यात कै. चाफेकरांचा उल्लेख स्पष्टपणे हुतात्मा असा करावा.

आपण आता स्वतत्र झालो असल्याने, या गोष्टीला कुणाचा विरोध होईलसे दिसत नाही. हे काम लवकरात लवकर करणे आवश्यक आहे, कारण ती स्मारकशिलाच तेथून आज उद्या नाहीशी झाली तर सर्वच नावनिशाणी नष्ट होईल. आपण प्रत्यक्ष ही जागा पाहताच आपल्या हे ध्यानी येईलच.

या कार्यासाठी विशेष खर्च येईल असे नाही. सर्व काम जास्तीत जास्त रु. ३००/—पर्यंत होईल असा अंदाज आहे.

आपणासारख्या स्वातंत्र्यलढयातील एका सैनिकाला महापौर पदाचा यथोचित मान लाभलेला असताना, २२ जून १९६८ पूर्वी हे काम तातडीने होऊ शकेल असे वाटल्यावरून, मी आपणाशी वेरुळ येथे प्रत्यक्ष बोललोच आहे. आपले याबाबतीत सहकार्याचे आश्वासन मिळेल अशी अपेक्षा करतो. या कामास कशी सुरुवात करावी याकरिता सोबत माझ्या कुवतीप्रमाणे आज रक्कम धाडली आहे. तिचा कृपया स्वीकार करावा. यासाठी लागणारी उर्वरीत रक्कम जसजशी जमा होईल तसतशी आपणाकडे पाठवीन. कारण बऱ्याच मडळींनी यासाठी आर्थिक सहकार्य देऊ केले आहे.

ही स्मारकदुरुस्ती करण्यात, नगरपालिकेची अनुमती देणे वगैरे ज्या कायदेशीर गोष्टी कराव्या लागतील, त्या करण्यात आपण मार्गदर्शन करावे, अशी विनंती आहे. यासाठी प्रा विद्याधर पुडलीक हे आपणास प्रत्यक्ष भेटत आहेत.

कळावे. लोभ रहावा.

या सोबत– रु. ५१/– चा चेक पाठविला आहे.

आपला

वि ग. कानिटकर

या पत्राची पोच देताना, पुणे महानगरपालिकेने दि. ११–३–६८ रोजी पत्राने कळवले–

जा. ४४०९

११–३–६८

वि. ग. कानिटकर-यांजकडे

हुतात्मा दामोदरपंत चाफेकर स्मारकासाठी रक्कम रुपये ५१/– चा पाठवलेला चेक मिळाला. आभारी आहोत.

या योजनेबाबत व्हावयाच्या पुढील कार्यवाहीबाबत आपणास यथावकाश कळवण्यात येईल.

आपला,

ना. ग. गोरे

महापौर, पुणे

बरेच दिवस गेले. काहीच होईना. यथावकाश चौथऱ्याचे दगड मात्र आता निघू लागले होते व कुणाच्यातरी घरापुढे पायऱ्या होण्यासाठी हे दगड उत्सुक आहेत, असे पहाणाऱ्याला वाटू लागावे हे सहाजिकच होते! एक महापौर मावळले. यथावकाश दुसरे उगवले. दि. शां कडू.

आता जनसंघाचे बरेच नगरपिते नगरपालिकेत गेलेले होते. यापैकी आमच्या विभागातून निवडून गेलेले श्री. मेहेंदळे यांच्याबरोबर मी महापौर दि. शां. कडू यांची दि. १८–९–६८ या दिवशी कार्यालयात भेट घेतली.

या स्मारकस्थानाची चालू अवस्था महापौरांना, तिथे प्रत्यक्ष जाण्याचा त्रास न घेता कळावी, म्हणून मी बरोबर चार छायाचित्रे नेली होती. महापौरांनी सांगितले – 'त्या ठिकाणी हु. चाफेकर याचा नामनिर्देश व्हावा याची आम्हालाही आस्था आहेच. तुम्ही सबधित लिपिकाकडे छायाचित्रे द्या म्हणजे समन्वय समितीत हा प्रश्न येईल तेव्हा पाहू.'

जरा आशा वाटली. छायाचित्रे कचेरीत संबधित लिपिकांकडे दिली.

दिवस जात होते. अधूनमधून श्री. मेहेंदळे रस्त्यात किंवा कुठेतरी भेटत.

'काय मेहेंदळे – आपल्या कामाचे काय झाले ?'

प्रथम प्रथम श्री. मेहेंदळे उत्साहाने हसत. म्हणत 'काम होते आहे.' हळू हळू ते भेटले की ओशाळे हसू लागले ! आता मी त्याना याबाबतीत काही विचारण्याचे सोडून दिले. श्री. कडू मावळले. नंतर आणखी एक महापौर उगवले-मावळले. या साध्या कामात नेमके काय अडते आहे ते हळूहळू माझ्याही लक्षात येत गेले व मी माझा उत्साहही आवरता घेतला. कभी खुषबू आँ नही सकती, कागजके फूलोंसे.

दोन महिन्यापूर्वी सहज काही कामानिमित्त पुण्याचे माजी महापौर श्री. वा. ब. गोगटे याच्या घरी गेलो असता, हा बाकी इतिहास त्यांना सांगितला.

वृत्तपत्रांतून आता असे कळते की २ ऑगस्ट १९७० ला श्री. वा. ब. गोगटे यांना ६१ वे वर्ष लागत आहे. यासाठी खासदार श्री. जयतराव टिळक यांच्या अध्यक्षतेखाली एक सत्कार समिती स्थापन झाली आहे. सत्कार समिती ज्या अनेक गोष्टी करणार आहे त्यातील एक म्हणजे, ज्या ठिकाणी रँड साहेबाचा खून चाफेकरबंधूनी गणेशखिंड रस्त्यावर केला, त्या ठिकाणी या एतिहासिक घटनेची माहिती दर्शवणारी शिळा उभारण्यात येणार आहे. या स्मारकासाठी दहा सहस्र रुपये जमवण्यात येणार आहेत.

माझ्या कल्पनेतील योजनेपेक्षा ही सहस्त्रो रुपयांची योजना खूपच धाडसी आहे. परतु सत्कार समिती हे करू शकेल काय ? समितीलाही अडचणी येण्याचा सभव आहे...म्हणून केवळ हा या प्रकरणातील 'बाकी इतिहास' सांगितला आहे. चाफेकर बधूदेखील तुम्ही आम्ही मरणार आहोत तसे 'यथावकाश' मेले असते तर हा सगळाच त्रास खरोखर वाचला नसता का ?

– वि. ग. कानिटकर


स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

**दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.**



# भारतातील लोकयुगाचे प्रवर्तक

✤

'लोकमान्य टिळक : राजकीय जीवन आणि मीमांसा' हा टिळकांच्या राजकीय चरित्राची ऐतिहासिक दृष्टिकोणातून मांडणी करणारा ग्रंथ **श्री. भा. कृ. केळकर** लिहीत आहेत. टिळकांच्या जीवनाची मीमांसा आधुनिक दृष्टिकोणातून व नव्या राजकीय परिभाषेत करण्याचा त्यांचा हा प्रयत्न आहे. त्यांनी लिहिलेल्या या खास लेखात लोकशाही नेतृत्वाचे एक विवेचन आहे.

✤

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाचे वेळी स्वातंत्र्यसैनिकांनी दिल्ली काबीज केली होती. त्या प्रसंगाचे वर्णन करताना स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या स्वातंत्र्यसमरावरील विख्यात ग्रंथात दिल्ली काबीज केली त्या दिवसासंबंधी म्हटले होते, 'हे पाच दिवस हिंदुस्थानच्या इतिहासात सदोदित चिरस्मरणीय असोत ! ... ह्या पाच दिवसात लोकशक्तीचा हिंदुस्थानात प्रथमोदय झाला ! आपल्यावर कोणी राज्य करावे ह्या प्रश्नाचा निर्णय लावण्याचे काम लोकपक्षाचे आहे ह्या संवेदनेचा जन्म हिंदुस्थानात ह्या पाच दिवसात झाला !

लोकपक्षाने फिरंग्याचे दास्य झुगारले व लोकपक्षानेच स्वसंमत अशा पुरुषार्थाची राज्यसिंहासनावर योजना केली. लोकाना पसंत असेल त्याचेच राज्य स्वदेशावर असावे ही भावना व राजकारण हे लोकपक्षाचे कर्तव्य आहे ही चेतना हिंदुस्थानच्या शरीरात ह्या पाच दिवसात उदय पावली! लोकपक्षाची ही जयंती हिंदुस्थानचे इतिहासात अविस्मरणीय असो!'

हे बंड केवळ सैनिकांचे नव्हते, त्यामागे जनतेतील असंतोषही होता हे त्यावेळचा गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंग याने ओळखले होते. त्याने आपल्या टिपणात यासंबंधी लिहिले होते, "The struggle which we have had, has been more like a national war than a local insurrection." ते बंड होते की स्वातंत्र्य-युद्ध होते याची तात्विक चर्चा इतिहासाचार्यांनी कितीही घातली तरी भारतातील लोकांची ही उठावणी आपले ऐतिहासिक कार्य करून गेली होती. यानंतरच्या काळात ब्रिटिशांनी नरमाईचे, वशीकरणाचे धोरण अवलंबले आणि भारतीय मनाच्या आंग्लीकरणास प्रारंभ झाला. या आंग्लीकरणात महाराष्ट्र व बंगाल यातील पहिली सुशिक्षितांची पिढी अग्रेसर होती आणि तेथून सामान्य जनतेची व नव्या सुशिक्षित वर्गाची फाटाफूट झाली.

## नृपांगणातील भाट व संधिसाधू

या सुशिक्षितवर्गाचे नेतृत्व करणारे त्यावेळी अनेक कर्तृत्ववान व विद्वान् पुढारी निघाले. पण ते ब्रिटिश सत्तेचे बौद्धीक समर्थन करणारे, त्यांच्या आचार–विचाराची स्तुतिस्तोत्रे गाणारे, त्यांच्या प्रभावळीत मिरविणारे पुढारी होते. ते जनतेचे पुढारीच नव्हते. कारण सामान्य जनता दारिद्र्यात पिचत होती, नोकरशाहीची अरेरावी असहाय्यपणे सहन करीत होती. अशा एका असहाय्य अवस्थेत लोकमान्य टिळक पुढे आले आणि जनतेची दुःखे, तिचे दैन्य, तिचे दैनंदिन प्रश्न तिच्याशी समरस होऊन, आहे त्या कायद्याच्या चौकटीत, कधी त्या कायद्याला धुडकावून अत्यंत उद्वेगाने, तीव्रतेने, समर्थपणे व तर्कशुद्धपणे ब्रिटिश नोकरशाहीपुढे मांडले. लोकमान्य टिळकांनी 'लोकपाल' म्हणून या काळात वठविलेली भूमिका ही भारतातील लोकयुगाची प्रारंभसूचक घटना होती. ही भूमिका परदेशी सरकार निघून गेले आणि स्वदेशी सरकार आले असतानाही राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांनी, पत्रकारांनी आणि पंडितांनी अभ्यासण्यासारखी आहे. त्यांच्या या भूमिकेचा विचार या लेखात करावयाचा आहे.

टिळकांनी नव्या लोकपक्षाची उभारणी करण्यासाठी प्रथम जो लढा दिला तो राजनिष्ठ नेतृत्वाशी होता. हे करताना त्यांना अत्यंत कठोर व्हावे लागले. कारण मवाळ व सरकारनिष्ठ पुढाऱ्यांचा आदर्श समाज ठेवत होता. त्यांच्या आधारे ब्रिटिश नोकरशाही आपली प्रभावळ वाढवीत होती. लहान लहान उपक्रमातून हे कार्य चालू

पृष्ठ ४७ वर



समीर

## ◻ भारत आणि ऑस्ट्रेलिया

निरनिराळ्या कारणांमुळे भारताचे ज्या अनेक देशांशी संबंध येत आहेत त्यात भारत–ऑस्ट्रेलिया संबंधाचा फारसा गाजावाजा होत नाही, पण हा संबंध अधिकाधिक दृढ होत असून निरनिराळ्या क्षेत्रातले ऑस्ट्रेलियन तज्ज्ञ भारत–भेटी-साठी येत असतात. नुकतेच आलेले असे तीन तज्ज्ञ म्हणजे स्थापत्यशास्त्रज्ञ प्रा. रॉल्फ जेन्सन, ऑस्ट्रेलियन सरकारच्या परदेशांना मदत देण्याच्या खात्याचे प्रमुख रॉय गॉर्डन स्प्रॅट, आणि इंग्लिशचे प्राध्यापक गुडविन.

ॲडलेड विश्वविद्यालयात स्थापत्य व नगररचनाशास्त्राचे प्राध्यापक जेन्सन यांच्या मते दिल्ली शहराची ऐतिहासिक परंपरा फार जुनी असल्याने स्थापत्यशास्त्रज्ञ व नगररचनाकार या दोघांच्याही दृष्टीने या शहराचे विशेष महत्त्व आहे. दिल्ली म्हणजे शास्त्रीय रचनेचा एक नमुना आहे. पॅरिस किंवा व्हर्साय या शहरातून दिसते तशी भव्यतेची कल्पना दिल्लीत दिसते. त्यामुळे दिल्ली शहर अनेक दृष्टींनी प्रभा-वित करते. पण एका महत्त्वाच्या बाबतीत हे शहर अपयशी ठरले आहे. शहरातील नागरिकांचे जीवन सुगम रीतीने चालायचे असेल तर ते आटोपशीर असले पाहिजे हे दिल्लीच्या लक्षात आलेले नाही. दळणवळण नीट चालायचे असेल तर नागरि-कांना पायी अधिक चालता आले पाहिजे. आता घड्याळाचा काटा मागे सरकविता येणार नाही, तेव्हा प्राप्त परिस्थितीत नगरपालकीय वाहतूक–व्यवस्था सुधारण्या-कडे लक्ष केंद्रित केले पाहिजे.

शहरातील वस्तीचा भाग व उद्योग–व्यवसायाचा भाग यांची फारकत करण्यात येऊ नये, 'सर्व जिवंत शहरांतून या दोन्ही विभागाचे मिश्रण केलेले असते. नाही-तर शहरे खंडित व रात्री निष्प्राण होतात. अर्थात् हे यशस्वीपणे साधण्यासाठी चांगली रचना व्हायला पाहिजे; म्हणजे शहराच्या केंद्रस्थानीदेखील संपूर्ण जीवनाला आवश्यक असलेली उद्याने, करमणुकीची साधने इत्यादि गोष्टी उपलब्ध असल्या पाहिजेत.' आटोपशीरपणा व जिवंतपणा यांच्या मिश्रणाचे सर्वोत्कृष्ट आधुनिक उदाहरण म्हणजे स्टॉकहोम शहर होय.

स्थापत्यशास्त्राचे महत्त्वाचे काम म्हणजे हवामानाशी सुसंगती साधणे हे होय. पण स्वतःचे वैशिष्टय राखण्याऐवजी ऑस्ट्रेलियाही इतर देशाप्रमाणे स्थापत्यशास्त्राचे आंतरराष्ट्रीय नमुने स्वीकारू लागली आहे. दुर्दैवाने बहुतेक सर्व देश आपापली परंपरा सोडून ठोकळेबाजपणाकडे वळत आहेत. दिल्लीत आधुनिक स्थापत्य-शास्त्रज्ञांनी बांधलेल्या इमारतीपेक्षा परंपरागत इमारती हवामानाशी अधिक मिळते घेणाऱ्या आहेत. हलक्या वजनाचे बांधकाम सामान, छपरे, खूप खिडक्या व काचेचा अतोनात वापर या गोष्टी दिल्लीसाठी अगदी चुकीच्या आहेत.

परदेशांना मदत देण्याच्याबाबतीत ऑस्ट्रेलियाचा सर्व जगात तिसरा क्रमांक लागतो. यातली बव्हंशी मदत दक्षिण आशियाई व पॅसिफिक क्षेत्रातील देशांना मिळते. स्प्रॅट म्हणाले, ' आम्ही स्वतःला आशियाचा एक भाग समजतो, व मदत देताना ती परपरागत संबंध असलेल्या देशांपुरती मर्यादित ठेवीत नाही.' त्यामुळे ऑस्ट्रेलियन मदत कॉमनवेल्थमध्ये नसलेल्या देशांनाही मिळते. सध्या ऑस्ट्रेलियाने इंडोनेशियाला मदत करण्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. इंडोनेशिया ऑस्ट्रेलियाचा सर्वात जवळचा शेजारी असून इंडोनेशियाला मदतीची निकडीची आवश्यकता आहे. पण एकंदर विचार केला तर मदत मिळण्याच्या बाबतीत न्यूगिनी व पापुआ याच्या खालोखाल भारताचा क्रमांक लागतो. गेल्या वीस वर्षात भारताला ऑस्ट्रेलियाकडून साडेबासष्ट कोटी रुपयाची मदत मिळाली आहे. ऑस्ट्रेलियन मदत ही आर्थिक विकासाच्या योजना, तांत्रिक मदत व परदेशीयांना ऑस्ट्रेलियात शिक्षण अशा स्वरूपात दिली जाते. हे शिक्षण प्रशासन, डेअरी व्यवसाय, मेंढयांचे पालन, वणवे विझविण्याचे तंत्र इत्यादि अनेक विषयात मिळते. या शिक्षणासाठी अनेक परदेशी विद्यार्थी ऑस्ट्रेलियात येतात व त्यामुळे ऑस्ट्रेलियन जनतेत आशियाई देशाबद्दल शेजारीपणाची भावना निर्माण झाली आहे.

क्वीन्सलँड विश्वविद्यालयातील इंग्लिशचे प्राध्यापक गुडविन यानी माहिती दिली की, ऑस्ट्रेलियातले इंग्लिश इंग्लंड, अमेरिका व भारतातल्या इंग्लिशपेक्षा बरेच वेगळे आहे. गेल्या शभर वर्षात ऑस्ट्रेलियात स्वतंत्र साहित्य निर्माण झाले आहे. तरीदेखील ऑस्ट्रेलियन विश्वविद्यालयातून शिकवले जाणारे इंग्लिश साहित्य हे बव्हंशी ब्रिटिश साहित्य असते. फक्त क्वीन्सलँड विश्वविद्यालयात ऑस्ट्रेलियन साहित्याचा शिक्षणक्रम आहे. कॉमनवेल्थ साहित्यात राजाराव, नारायण व खुशवंतसिंग या भारतीय लेखकाचे साहित्य शिकविले जाते. विसाव्या शतकात ल काही सर्वश्रेष्ठ कादंबऱ्या या लेखकांनी लिहिल्या असून त्यांच्या लिखाणात भारतीय विचार–पद्धतीचा प्रत्यय येतो.

□ □ □

भारत-रशिया यांच्यातील बदलत्या संबंधाचे अभ्यासपूर्ण विवेचन

# रशियाची भारत नीती


लेखक : डॉक्टर जे. ए नाईक

समीक्षक : अरुण निगवेकर

डॉ. जे. ए. नाईक हे मूळचे कोल्हापूरचे. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून बी. ए. झाल्यावर त्यांनी मुंबई विद्यापीठातून समाजशास्त्र व राज्यशास्त्र या विषयावर एम. ए. पदवी घेतली. नंतर ते दिल्लीच्या 'इंडियन स्कूल ऑफ इंटरनॅशनल स्टडीज' या संस्थेत दाखल झाले. याच संस्थेतून त्यांनी 'रशियन अफेअरस्' या विषयावर पी. एच्. डी. मिळविली. सध्या ते तिथे प्राध्यापक आहेत. प्रस्तुत पुस्तकाच्या लिखाणाकरिता, माहिती गोळा करावयास ते दोन वर्षे रशियामध्ये राहिले होते.

सोवियेत सरकारच्या परदेशी धोरणावर आतापर्यंत पश्चिमी व भारतीय लेखकांची बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. डॉ. जे. ए. नाईक याचे 'Soviet Policy towards India – From Stalin to Brezhnev' या नावाने क्रेमलिनच्या भारत धोरणावर प्रकाश टाकणारे पुस्तक नुकतेच प्रकाशित झालेले आहे. आतापर्यंत क्रेमलिनच्या धोरणाचे विश्लेषण, मग ते आशियायी वा युरोपीय राष्ट्राबाबत असो, पश्चिमी लेखकाकडून मुख्यत: झालेले आढळते. त्या दृष्टीने डॉ. नाईक यानी कोणत्याही मत–प्रणालीचा आग्रह न धरता, सोविएत रशियाच्या आपल्या देशाच्या धोरणाबाबत, भारतीय विचारसरणीतून केलेले लेखन विशेष महत्त्वाचे ठरते.

आक्टोबर क्रांतीच्या अगोदर झारच्या कारकीर्दीत भारताला इंग्रजांच्या मिठीतून सोडविण्याचे दोन असफल प्रयत्न करण्यात आले. १८०१ मध्ये पॉल पहिला याने



नेपोलियनच्या सहाय्याने भारतावर चढाई करण्याचे योजिले होते. परंतु अगोदरच युरोपमध्ये गुंतलेला नेपोलियन पॉलला प्रत्यक्ष अशी मदत करू शकला नाही. शेवटी पॉलने स्वतःच चढाई करायचा निर्णय घेऊन एका जनरलबरोबर बावीस हजार घोडदळ व चोवीस तोफा असलेले सैन्य भारताकडे पाठविले. परंतु भारतापर्यंत ते सैन्य पोचण्याच्या अगोदरच रशियात पॉलचा खून झाला आणि योजना वाटेतच बारगळली. पॉलच्यानंतर आलेला अलेक्झांडर पहिला याने पण नेपोलियनच्या सहाय्याने भारतावर परत चढाई करण्याची योजना आखली. परंतु ही योजनाही युरोपमध्ये त्याचवेळी घडलेल्या काही घटनांमुळे कागदावरच राहिली.

ऑक्टोबर क्रांतीनंतरच्या काळात ब्रिटिश सैन्याने रशियाच्या यादवी युद्धात भाग घेतल्याकारणाने लेनिनचा भारताबाबतचा दृष्टिकोन बदलला. ब्रिटिश साम्राज्यशाहीवर त्यांनी टीकेची झोड उठविली व भारतात त्यावेळी चालू असलेल्या स्वातंत्र्य चळवळीबाबत थोडीफार सहानुभूती व्यक्त करावयास सुरुवात केली. तरीपण लेनिनच्या विचारात भारताला विशेष स्थान नव्हते असे आढळते. साम्यवादी रशियाच्या पहिल्याच वर्षात, लेनिन आंतरराष्ट्रीय परिस्थितीवर एकंदर आठ वेळा बोलले. परंतु त्यातील एकाही भाषणात त्यांनी भारताचा किंवा तेथील परिस्थितीचा उल्लेख केला नाही. यावरून लेनिन भारतास किती कमी महत्त्व देत होते ते दिसून येते.

लेनिनपेक्षाही भारताकडे जास्त दुर्लक्ष स्टॅलिनच्या काळात झालेले आढळते. आपल्या संपूर्ण ३६ वर्षांच्या कारकीर्दीत स्टॅलिन भारतातील ब्रिटिश साम्राज्यवादाबद्दल फक्त सहा वेळा बोलले. भारताच्या पारतंत्र्याबद्दल काळजी व्यक्त करणारी व जगामध्ये साम्यवाद पसरविण्यासाठी निर्माण करण्यात आलेली ' कम्युनिस्ट

इंटरनॅशनल ' स्टॅलिनने दुसऱ्या महायुद्धाच्या कालात बंद केल्यावर तर क्रेमलिनचा भारताशी राजकीय संबंध जवळजवळ संपुष्टातच आला. उलट भारत हा ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचे एक बाहुले आहे अशी क्रेमलिनची समजूत होत गेलेली आढळते.

क्रेमलिनचे भारताबाबत इतके दुर्लक्ष होऊ लागले की १९४७ साली भारत स्वतंत्र झाला ही महत्त्वाची बातमी सोविएत रशियातील कोणत्याही वर्तमानपत्राने दिली नाही. स्वातंत्र्यानंतर जरी लगेचच भारताचे रशियाशी राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले तरी क्रेमलिनची स्वतंत्र भारतातील पहिल्या सरकारबद्दलची दृष्टी पूर्वीसारखीच राहिली. किंबहुना त्यांनी भारतातील कम्युनिस्ट पक्षास सरकार उलथून लावण्यासाठी सर्वतोपरी सहाय्य करावयास सुरुवात केली. कम्युनिस्ट पक्षाने देशात सगळीकडे संप व मोर्चांचा धुमधडाका चालू केला. सरकारने कम्युनिस्टपक्षावर बंदी घातली व तिच्या पुढाऱ्यांना तुरुंगात टाकले. प्रवदाने या सर्व बातम्यांना मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी दिली.

एकंदरीत स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या काळात तरी रशियाचे भारताबाबत कडवे धोरण होते. नेहरू सरकारवर, त्याच्या धोरणांवर, भारताच्या एकंदरीत आर्थिक परिस्थितीवर, अन्नधान्याच्या टंचाईवर, सर्वांवर क्रेमलिनमधून टीका होत होती. एवढेच नव्हे तर ५० साली चीनने तिबेटवर आक्रमण केले तेव्हा सोविएत सरकारने चीनला पाठिंबा दिला. परंतु कोरियन युद्धाच्या वेळी भारताने आपल्या अलिप्तपणाच्या धोरणाच्या सहाय्याने शांततेकरता केलेल्या प्रयत्नामुळे सोविएत सरकारच्या धोरणात थोडाफार बदल घडून आला. भारताचे आशियातील स्थान क्रेमलिनच्या लक्षात येऊ लागले. स्टॅलिनच्या कारकीर्दीच्या शेवटच्या काळात तर हा बदल अगदी दिसून येऊ लागला. एप्रिल १९५२ मध्ये त्यावेळचे भारताचे राजदूत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना स्टॅलिनची प्रथमच भेट घेऊ देण्यात आली. याशिवाय स्टॅलिनच्या मृत्यूच्या अगोदर काही दिवसच डॉ. राधाकृष्णन यांच्यानंतरचे राजदूत के. पी. एस्. मेनन यांनी स्टॅलिनची भेट घेतली.

स्टॅलिनच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसात क्रुश्चेव कम्युनिस्ट पक्षाचे मुख्य चिटणीस झाले आणि या नंतर भारत सोविएत संबंधास एक वेगळेच वळण लागले. भारताच्या कोरियन पेचप्रसंगातील कामगिरीचे महत्त्व क्रुश्चेव याच्या लक्षात आले याशिवाय नव्याने स्वतंत्र होऊ लागलेल्या आफ्रो-आशियाई देशामध्ये भारतासारख्या मोठ्या देशाचे एक वेगळेच पुढारीपण निर्माण होण्याची शक्यता होती. भारताचे धोरण जरी साम्यवादी नव्हते तरी त्याने पश्चिमी गटात सामील न होता अलिप्त राहणे क्रेमलिनच्या फायद्याचे होते. रशियाच्या बदलत्या धोरणाचा पुरावा सर्व क्षेत्रात दिसून येऊ लागला. भारत रशियाचे सांस्कृतिक संबंध एकदम सुधारले. भारतीय कलाकार, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञ यांचा रशियाकडे ओघ लागला. कित्येक सांस्कृतिक व आर्थिक करार झाले. भारतीय पंचवार्षिक

योजनाना रशियन सरकारने सढळ हाताने मदत करावयास सुरुवात केली. दोन्ही देशाचा व्यापार दुप्पटीने वाढत होऊ लागला. क्रेमलिनच्या राजकीय धोरणात पण फार फरक पडला. काश्मीरच्या प्रश्नात रशियाने भारताची बाजू घ्यावयास सुरुवात केली. यास पाकिस्तानचे सिटो (CEATO) करारात सामील होणे व अमेरिकन लष्करी तळास परवानगी देणे या घटनापण कारणीभूत आहेत. भारत-चीन मैत्री व 'पंचशील' याना रशियन सरकारने पाठिंबा दिला. एवढेच नव्हे तर चीनबरोबर याच तत्त्वावर आधारित एक करार केला. गोव्याच्या कारवाईस क्रेमलिनने एकमुखी पाठिंबा दिला.

चीनने १९६२ साली जेव्हा भारतावर आक्रमण केले तेव्हा क्रेमलिनने प्रथम मौन बाळगले. पण त्याचवेळी क्यूबाची समस्या निर्माण झाली आणि रशियास साम्यवादी गटातील राष्ट्रांच्या पाठिंब्याची गरज भासू लागली. म्हणूनच २५

## क्रेमलिन आणि महात्मा गांधी

स्टॅलिन ते क्रुश्चेवच्या काळात रशियन धोरणात कसकसा बदल घडत गेला ते महात्मा गांधींच्या बाबतीत सोविएत पुढारी व लेखकानी वेळोवेळी व्यक्त केलेल्या मतावरून स्पष्ट दिसून येते.

मे १९२५ मध्ये विद्यार्थ्यांच्यापुढे भाषण करताना स्टॅलिनने गांधीजींचा ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या हातातील एक बाहुले असा उल्लेख केला. त्यावेळे-पासून गांधीजी आणि त्यांच्या कार्याबाबत साधारणतः असेच सोविएत मत राहिलेले दिसते. इ. झुकॉव्ह या सुप्रसिद्ध रशियन तत्त्ववेत्याने भारत जेव्हा स्वतंत्र झाला, त्यावेळी एका लेखात महात्मा गांधींनी भारत स्वतंत्र होण्यास मदत न करता अडथळाच निर्माण केला, असे मत व्यक्त केले आहे. महात्मा गांधीबद्दल सोविएत सरकारचे असे मत असल्याने त्यांच्या मृत्यूची बातमी प्रवदाने फक्त दोन ओळीत प्रसिद्ध केली व ती पण लंडनहून टासने पाठविलेल्या बातमीच्या आधारावर. प्रवदाच्या त्याच पानावर 'संयुक्त डाव्या गटाच्या कार्यक्रमाबद्दल बातमी प्रसिद्ध झाली होती. या बातमीस देण्यात आलेली जागा गांधीजींच्या खुनाच्या बातमीच्या १८ पट होती.

क्रुश्चेवच्या कारकीर्दीत भारत-रशिया संबंध सुधारले. आणि महात्मा गांधीजींबद्दलचे सोविएत सरकारचे व लेखकांचे मत बदललेले दिसून येते. सोविएत तत्त्ववेता लेखक झुकोव्ह—ज्याने पूर्वी गांधीजींचा उल्लेख एक चळवळ्या (Reactionary) असा केला होता, त्याने गांधीजींच्या ऐतिहासिक कामगिरीवर पुन्हा एक लेख लिहिला. त्यात त्याने आपणास गांधीजी आणि त्यांच्या चळवळीचे महत्त्व समजले नाही अशी कबुली दिली.

# बदलते चित्र

स्टॅलिनच्या मृत्यूनंतर क्रुश्चेव कम्युनिस्ट पक्षाचे मुख्य चिटणीस झाले, आणि क्रेमलिनचा भारताबद्दलचा दृष्टिकोन बदलला. क्रुश्चेव अधिकारपदावर आल्यावर लगेच सोविएत सरकारचे भारत-प्रेम कसे वाढीस लागले हे पुढील घटनांवरून दिसून येते.

(१) जून १९५० मध्ये चिनी पंतप्रधान चौ एन लायनी भारतास भेट दिली व दोन्ही राष्ट्रांनी 'पंचशील' तत्त्वाचा पुरस्कार केला. त्यावेळी प्रवदाने भारतावर प्रथमच संपादकीय लिहिले व 'पंचशिल' तत्त्वाबद्दल भारतीय व चिनी पुढाऱ्यांचे अभिनंदन केले.

(२) सप्टेंबर १९५४ मध्ये मास्कोस पहिला भारतीय चित्रपट महोत्सव आयोजित करण्यात आला. राजकपूरचा 'आवारा' व बिमल रॉयचा 'दो बिघा जमीन' हे चित्रपट या महोत्सवात फारच गाजले. राजकपूरला वैयक्तिक प्रसिद्धी खूप मिळाली.

(३) १९५४ साली ऑक्टोबर क्रांतीच्या वर्धापन दिनानिमित्त भारताबद्दल 'जगातील शांततेचश रक्षणाकरिता भारत-रशिया मत्री व सहकार्य सतत वाढत व दृढ होत राहो' अशी घोषणा प्रथमच देण्यात आली. घोषणांच्या यादीमध्ये चीन व कोरियानंतर भारताचा क्रम लावण्यात आला होता. कोणत्याही आफ्रो-आशियायी देशास यापूर्वी इतके महत्त्व देण्यात आले नव्हते.

(४) १९५५ साली भारताच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त रशियन पुढाऱ्यांनी प्रथमच संदेश पाठविले. यापूर्वी भारतीय प्रजासत्ताक दिनाची सोविएत वृत्तपत्रे दखल पण घेत नसत. फक्त कनिष्ठ दर्जाचे अधिकारी भारतीय वकिलातीतील समारंभास हजर रहात असत. पण १९५५ साली, मास्कोतील भारतीय वकिलातीतील समारंभास मोलोटोव्ह, मिकोयान यांच्यासारखे १८ मत्री व उपमंत्री शिवाय वेगवेगळ्या खात्यातले बरेच अधिकारी, कलाकार, लेखक प्रथमच हजर राहिल. प्रवदाने 'भारतीय प्रजासत्तकाचा पाचवा वर्धापन दिन' या नावाचा एक मोठा लेख प्रसिद्ध केला.

(५) जून १९५५ मध्ये पंडित नेहरूनी रशियास पंतप्रधान या नात्याने प्रथमच भेट दिली. त्यांनी आपल्या दोन आठवड्याच्या वास्तव्यात रशियातील महत्त्वाच्या सर्व प्रजासत्ताकांना भेटी दिल्या. एवढेच नव्हे तर आत्तापर्यंत परदेशी पाहुण्यांना बघावयास परवानगी नसलेली कित्येक ठिकाणे पाहिली. रशियास एवढी मोठी भेट देणारे बिगर साम्यवादी देशातील ते पहिलेच प्रमुख होते.

आक्टोबर १९६२ च्या प्रवदात भारत-चीन संघर्षावर प्रथमच लिहिलेल्या लेखात क्रेमलिनने चीनला पाठिंबा दिला. लौकरच क्युबाची समस्या सुटली आणि रशियाने परत आपले धोरण बदलले. ५ नोव्हेंबरच्या प्रवदाच्या अंकात क्रेमलिनने चीनला युद्ध बंद करण्याची जवळ जवळ आज्ञाच दिली. चीनने आपणहून युद्ध थांबवून माघार घेतली असण्याची शक्यता आहे, परंतु रशियाच्या विमानासाठी लागणाऱ्या तेलाचा पुरवठा बंद करण्याच्या धमकीचा पण चीनवर परिणाम झाला असण्याची शक्यता आहे. रशियाचे धोरण असे जरी बदलते राहिले तरी क्रुश्चेवच्या काळात भारत रशिया मैत्रीचा भक्कम पाया घातला गेला. क्रुश्चेव व नेहरू यांच्यामध्ये एकप्रकारचे वैयक्तिक मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले होते. क्रुश्चेवची भारता-विषयीची आस्था इतक्या टोकाला पोहचली की क्रेमलिनमधून त्याची हकालपट्टी करण्यात आली त्या वेळेस, त्याच्यावर ठेवण्यात आलेल्या आरोपात, त्यानी रशिया-चीन संबधाचा विचार न करता भारताशी फार संबध जोडला, असा एक आरोप होता.

क्रुश्चेवनंतर आलेल्या ब्रेझनेव्ह-कोसिजीन जोडगोळीचे धोरण प्रथमतः तसे जैसे थे राहिले. परंतु त्यांच्या मनात क्रुश्चेवच्या काळात चीनशी दुरावलेले संबध परत प्रस्थापित करावयाचे होते. क्रुश्चेवला अर्धचंद्र मिळाल्यानंतर एक महिन्याच्या आतच चौ एन लाय कित्येक वर्षानंतर प्रथमच ऑक्टोबर क्रांतीच्या ४७ व्या वर्धापन दिनास हजर राहण्यासाठी मास्कोस गेले. रशिया-चीन मैत्रीच्या परत आणाभाका झाल्या, परंतु कोसिजिनच्या लौकरच लक्षात आले, की एकमेकांतील खोलवर असलेले मतभेद अशा वरपागी घोषणांनी मिटण्यासारखे नाहीत. यानंतर क्रेमलिनने आपली दृष्टी चीनचे शेजारी असलेल्या राष्ट्रांकडे वळविली. विशेषतः पाकिस्तानशी नव्याने संबंध प्रस्थापित करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. याच वाता-वरणात प्रेसिडेंट आयुबखान एप्रिल १९६५ मध्ये प्रथमच मॉस्कोस गेले. या भेटी-नंतर पाकिस्तानबरोबर रशियाचे संबंध इतक्या झपाट्याने वाढत गेले, की मे दिनाच्या घोषणात पाकिस्तानचा प्रथमच समावेश करण्यात आला. क्रुश्चेवच्या काळात भारताबाबतच्या घोषणेचा क्रम साम्यवादी राष्ट्रांच्या नंतर लावत असत. शिवाय क्रुश्चेवच्या पहिल्या भारत भेटीपासून तो त्यांच्या हकालपट्टीपर्यंत घोषणेचा मसुदा एकच राहिला. परंतु पाकिस्तानबद्दलच्या घोषणेचा प्रथमच समावेश केल्या-नंतर दोन वर्षाच्या आतच भारत व पाक सबंधी सारख्याच घोषणा देण्यात येऊ लागल्या. एवढेच नव्हे तर भारत-घोषणेचा क्रम खाली आणण्यात आला व पाकिस्तानच्या अगोदर ती देण्यात येऊ लागली.

रशियाच्या बदलत्या धोरणाचे खरे स्वरूप कच्छच्या रणाच्या व त्यानंतर सप्टेंबर १९६५ मध्ये झालेल्या भारत-पाक युद्धाच्या वेळी प्रगट झाले. क्रेमलिनने अलिप्तपणाचे धोरण स्वीकारून दोन्ही राष्ट्रांना ताश्कंद करारात गुंतविले. तसे

बघितले तर स्टॅलिनने पण भारत-पाकिस्तानास सारखेच लेखले होते, परंतु स्टॅलिनचा अलिप्तपणा दोन्ही राष्ट्राबाबत असलेल्या एकप्रकारच्या वैरत्वाच्या भावनेतून निर्माण झालेला होता. कोसिजीनना मात्र अलिप्तपणाच्या धोरणाखाली क्रुश्चेवसारखे भावनावश धोरण न ठेवता दोन्ही राष्ट्रांवर सारखीच पकड ठेवावयाची होती. म्हणूनच रशियाचे पाकिस्तान-प्रेम जरी वाढले तरी भारत-रशिया संबंध राजकीय, सांस्कृतिक व व्यापारी बाबतीत पूर्वीसारखेच राहिले. किंबहुना भारताचा रशियाशी व्यापार वाढतच चालला आहे. सध्या जरी भारताच्या एकदर निर्यातीपैकी १७ टक्के व्यापार रशियाशी असला तरी एक गोष्ट सत्य आहे, की भारत व्यापारात जास्तीत जास्त रशियावर अवलंबून राहू लागला आहे. या कारणाने एक काळ असा येण्याची शक्यता आहे, की आपले आर्थिक धोरण हे सर्वस्वी रशियाच्या आर्थिक धोरणावर अवलबून राहील. या शिवाय लष्करी मदत पण आहेच. क्रेमलिनमधील कुशाग्र राजकारणी आर्थिक व लष्करी मदतीच्या आधारे भारताचे धोरणावर साम्यवादाची छाया पाडू शकतील आणि एकदा का आपण आर्थिक व परराष्ट्रीय धोरणात परावलंबी झालो तर मग स्वातंत्र्य ते राहिले काय ?

लेनिनपासून ते सध्याच्या काळापर्यंत, म्हणजे गेल्या पंचवीस वर्षात रशियाचे भारताबाबतचे धोरण कसकसे बदलत गेले याचे चित्र उभे करताना डॉ. नाईक यांनी अभ्यासकाची वृत्ती ठेवली आहे. ऐतिहासिक दृष्टीने हा काळ महत्त्वाचा गणला जाईल. भारताच्या दृष्टीने महत्त्वाच्या घटनांची लेखकाने कोणताही पूर्वग्रह न बाळगता तर्कशुद्ध मांडणी केलेली आढळते. मूळ रशियन कागदपत्रे व वर्तमानपत्रे यांच्या आधारावर लेखकाने एवढा कठीण विषय इतक्या साध्या व सरळ भाषेत मांडला आहे की राजकारणाशी सबंध नसलेल्या सामान्य वाचकांना पण रशियाच्या गुंतागुंतीच्या धोरणाची कल्पना येऊ शकेल. पुस्तकाच्या शेवटी भारताच्या भवितव्याबद्दल व्यक्त केलेले मत जाणकार राजकारणी व्यक्तींना विचार करावयास लावणारे आहे. □

[ Soviet policy towards India–from Stalin to Brezhnev. by J. A. Naik : Vikas publications : P. 201 : Rs 24/– ]


हंसाबाईंच्याजवळ विद्वत्ता नाही
आपल्या जीवनकथेला गोडस रूप देण्यासाठी
आवश्यक असलेली वाङ्मयकलाही नाही.
त्यांच्याजवळ आहे ते
जे जाणतेपणे, अजाणतेपणे
डोळे उघडे ठेवून व आंधळेपणाने
अनुभवले, उपभोगले, सोसले ते ते.
त्याची ही कहाणी आहे

—वा. ल. कुलकर्णी

हंसा वाडकर **सांगत्ये ऐका**

किमत : आठ रुपये

राजहंस प्रकाशन



मोहिनी, तुझ्या अनेक पत्रांना हे एकच उत्तर आहे. माझ्या नादी लागू नकोस.

तू पुरुष असतीस तर तुझ्याबरोबर स्पर्धा करून तुला नामोहरम करण्यात मी सुख मानले असते. तुझ्याशी दोन हात करून माझे सामर्थ्य सिद्ध केले असते. पुरुषार्थ मिळविला असता. पण तू स्त्री आहेस, वय वाढलेली कुमारिका आहेस. म्हणून तुला अखेरचे सांगतो आहे. मोहिनी, पुन्हा पुन्हा सांगतो आहे. माझा नाद सोड. मी अजून तसा चिडलो नाही. तापलो नाही तोवर नाद सोड. हा पत्रव्यवहार बंद कर. कायमचा बंद कर.

तुझ्या एकेक पत्राने मी बेचैन बेचैन झालो आहे. ही बेचैनी आणखी वाढत राहिली तर...तर माझ्या हातून घडू नये ते घडेल !

तुझी पत्रे बायकोच्या हातात पडतात, ती तशी तिच्या हातात पडावित हाच तुझा खरा उद्देश आहे. तू लिहिलेल्या अनेक गोष्टी खोटया आहेत. अनेक आठवणी खोटया आहेत. अनेक शृंगारिक आठवणीचे तू वर्णन केले आहेस या सर्व आठवणी खोटया असूनही मी नाकारू शकत नाही. त्या सर्व आठवणी खोटया आहेत असे मी – एक पुरुष – आपल्या पत्नीला पटवू शकेल काय ? आणि हेच तुला साधायचे आहे. माझा सुखाचा संसार तुला पहावत नाहीय. अनेकांच्या तोडून तू माझ्या बंगल्याविषयी ऐकले असशील. वैभवाविषयी ऐकले असशील. आम्ही नवर बायको ' स्कूटर 'वरून फिरतो हेही ऐकले असशील. आणि यामुळेच तू जळू लागलो आहेस, माझ्या सुखी संसारात ठिणगी टाकू पहात आहेस. मोहिनी, काय साधणार आहेस तू ? काय मिळविणार आहेस तू ?

विचार कर. मोहिनी विचार कर. आता पत्र लिहून मला डिवचण्याची काय आवश्यकता आहे ? मागील आठवणी काढण्याची काय गरज आहे ? काय संबंध आहे तुझा-माझा ?

तुझा-माझा संबंध होता – तीन वर्षांपूर्वी होता. तुझ्या रंगीबेरंगी कपड्याने मी

# मला विसरून जा—

**सदाशिव कोंडेकर**

तुझ्याकडे ओढला गेलो होतो. तुझ्या मादक आणि खेचक आविर्भावाने मी मोहून गेलो होतो. तो काळच तसा होता. मन पाऱ्यासारखे चंचल होते. फुलपाखरासारखे या फुलावरून त्या फुलावर भुरभुर उडत होते. नेमकी त्याचवेळी तू भेटलीस. हवे ते फूल मिळाले. ताजे उमललेले फूल मिळाले. रंगाने माखलेले पाखरू मध चाखायला आले. मधुपानात पाखराला जी धुंद बहोशी लाभली – त्याक्षणी फुलालाही लाभली असेल – आणि लाभलीही होती. त्या क्षणात बंदिस्त असलेला अलौकिक आनंद फुला-पाखराला चाखायला मिळालाच होता. आता फुलाचे नि पाखराचे

नाते काय ? तेच फूल पाखराला आकर्षून घेईल ? पाकळ्यांचा रंग उडून गेल्यावर ज्या फुलाचा गंध मोहून टाकील तिकडे पाखराने धाव घेऊ नये ? ज्या मादक नयनरम्य रंगाने त्याला साद दिली असेल तिकडे झप घेऊ नये ? मोहिनी, हा निसर्ग आहे. बदलणारा निसर्ग आहे. मावळणारा आणि नित्य नव्याने उगवणारा निसर्ग आहे. आजची कळी उद्याचे फूल असते. आजचे फूल उद्याचे निर्माल्य होते. निसर्ग माणसाला बदलतो फुलांना बदलतो, पानांना बदलतो, माणूस निसर्गाला बदलू शकत नाही. काळाचा प्रत्येक क्षण एक आघात करून जातो. तो उमगत नाही. पण त्याचा परिणाम उमगतो. म्हणून तू बदलायला हवीस. तीन वर्षापूर्वीच्या दिवसाशी आजच्या काळाचा काडीचाही संबंध उरलेला नाही.

मोहिनी, अगदी उघडच सांगायला हवे काय ? पुन्हा तू पत्र लिहू नकोस. कारण ? कारण उघडच आहे. तुझा माझा संबध संपला आहे. अगदी कायमचा संपला आहे. शहाण्याला एवढे पुरे आहे.

तेव्हा – तेव्हा माझी गरिबी आणि दारिद्रय आड येत होते. आणि माझा गोंडस चेहरा, धारदार नाक, रुबाबदार शरीर तुला मोहवित होते. हे अनेक वेळा तू बोलून दाखविले होतेस. पण तुला श्रीमंतीची ओढ होती. तू मला जवळ करीत होतीस आणि माझ्या दारिद्रयाची जाणीव होताच मला दूर लोटत होतीस. मला हे जाणवले तेव्हाच मी तुझ्यापासून दूर झालो. मनाने दूर झालो. कायमचा दूर झालो. आजही दूर आहे ...माझी तुला आठवण कदाचित् येत असेल – ती माझ्यावरील प्रेमामुळे नव्हे, तुझी निवड चुकली म्हणून. तू स्वतः फसलीस म्हणून. तू जळत आहेस माझे दारिद्रय दूर झाले म्हणून. मला टुमदार बंगला मिळाला म्हणून. म्हणून तू मत्सर करीत आहेस. मी छोटयाशा कारखान्याचा मालक आहे. स्कूटरवरून जोडीने मजेत फिरतो आहे. या माझ्या वैभवाचा – माझ्या संसारसुखाचा तुला मत्सर आला आहे. म्हणूनच तू धुमसत आहेस, होईल तेवढे उध्वस्त करण्याचा आटापिटा करीत आहेस.

माझ्या संसारसुखात विरजण घालण्याचा तुझा डाव आहे. आजच्या तुझ्या पत्रातील आपण दोघांनी न अनुभवलेल्या शृंगारिक आठवणी तू अगदी रंगवून लिहिल्या आहेस. असले अश्लील चाळे ज्या नवऱ्याच्या पूर्वायुष्यात घडले आहेत त्या नवऱ्यावर कोणती साध्वी विश्वास ठेवील ? बायकोच्या अनादरास पात्र होण्यासाठीच तू हा लेखी पुरावा तिच्या हाती दिला आहेस.

मला वाटते तुझ्या सहवासात जे दिवस मी घालविले आहेत त्यातल्या प्रत्येक प्रसगात तुझी आवड तू माझ्यावर लादू पहात होतीस. तुझ्या बरोबर मला चालवित होतीस. तुला हवे तेवढे आणि हवे तस्से अतर तू कमी करीत होतीस

मोहिनी खरे साग, महाबळेश्वराला जाऊन किती दिवस राहिलो होतो ? तिथे जे घडले नाही ते तू घडल्याचा दावा केला आहेस. किती किळसवाणे शृगार तू

वर्णिले आहेस ? हेच हवे होते का तुला ? म्हणजे मला जी भासविलीस ती नीती खोटी होती ! मर्यादा मी राखली ही माझीच चूक आहे. तुला गालबोट लागू नये, तुझ्यावर संकट येऊ नये म्हणून मी अक्षरशः तारेवरून चालत आलो. तुझा तोल सांभाळित तुला चालविले. हेच तुला नको होते.

ज्या पत्रात तू शृंगारिक आठवणी लिहिल्या आहेस, त्याच पत्राच्या शेवटी तू मला 'पुरुषत्वहीन' म्हटले आहेस. पुरुषत्व नसलेला पुरुष शृंगारिक चाळे करू शकेल ?

मोहिनी, एकदा वाटते, ही तुझी पत्रे घेऊन तडक तुझ्याकडे यावे. या सर्व गोष्टींचा चारचौघात तुला जाब विचारावा. निदान तुला एकटीला गाठून... तू वर्णिलेल्या शृंगाराची तुला प्रचिती द्यावी, माझे पुरुषत्व सिद्ध करावे.

या पत्रांनी तू काय साधणार आहेस ? काय मिळविणार आहेस ? एकामागून एक येणारे लग्नाचे मुहूर्त तुला हुकत आहेत, तुझे लग्न यापुढे कधीच जुळणार नाही याची खात्री झाल्यावर तू हा उद्योग आरंभला आहेस. तुझे वय वाढत आहे. वासनेने तू किडून गेली आहेस. पोखरून गेली आहेस.


अजूनही तुला शहाणपणाने रहायचे असेल तर हा मार्ग एकदम बंद कर, मिळेल त्या पुरुषाशी लग्न करून सुखी हो, त्यातच तुझे खरे हित आहे. मनाशी बाळगलेल्या सर्वच आकांक्षा पूर्ण करणारा नवरा तुला मिळणार नाही. कधीच मिळणार नाही. मोहिनी, एक कर, मला विसरून जा. मी तुझ्या आयुष्यात आलो होतो, हे विसरून जा.

□ □ □

लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध।
डोंगरे बालामृत
के. टी. डोंगरे अँण्ड कं. प्रा. लि. मुंबई-१.

**वि. ग. वाळिंबे**

# पराभूत अपराजित



## लेखांक : नऊ

आज पॅरिस रक्ताने न्हाहून निघणार होते. फॅसिस्ट आणि कम्युनिस्ट यांची युती प्रजासत्ताक उद्‌ध्वस्त करायला उत्सुक झाली होती. प्रजासत्ताकाच्या जीवन–मरणाचा प्रश्न निर्माण झाला होता.

संध्याकाळचे साडेसहा वाजले. पॅरिसवर अंधाराच्या छाया पडू लागल्या. सिएन नदीच्या डाव्या काठावर लोकांची एकच गर्दी उसळली. तीत आज काही तरी घडवून आणायचें या जिद्दीने पेटलेले निदर्शक होते आणि जे काही घडणार आहे ते पहायला उत्सुक असलेले प्रेक्षकही होते. ही सारी गर्दी प्लेस द ला कोन्कोर्दच्या दिशेने वहात होती. हा हा म्हणता हजारो लोक तेथे गोळा झाले. एरवी, यावेळी विद्युद्दीपांनी झळाळणारा हा विशाल चौक लक्ष्मीपुत्रांच्या मोटारींना मोठ्या अगत्याने वाट करून द्यायचा. लगतच्या तुलेरिस उद्यानातून बाहेर पडणारे नागरिकही या दिमाखदार चौकात काही वेळ रेंगाळत असत. आज मात्र या चौकाचा नूर पालटला होता. वाहतूक केव्हाच बंद पडली होती. त्यातून एखादी बस पुढे आली तर तिच्यावर पेटते बोळे फेकले जात होते. रस्त्यावरचे दिव्यांचे खांब जमिनीवर निपचित पडले होते. त्यामुळे वातावरण अधिकच भयाण झाले होते.

प्लेस द ला कोन्कोर्दपासून प्रतिनिधिसभागृहाकडे जाणारा रस्ता सुरक्षित ठेवण्यासाठी, हातात लाठ्या घेतलेले पोलिस चौकाच्या दुसऱ्या बाजूस उभे होते. पोलिस-अधिकारी कमरेला लटकावलेल्या पिस्तुलांवर हात ठेवून बंदोबस्ताची पाहणी करीत होते.

एवढ्यात कोणीतरी आवाज दिला–' प्रजासत्ताक मुर्दाबाद ' आणि त्या घोषणे-सरशी सतप्त निदर्शकाचा जमाव पोलिसाच्या रोखाने झेपावू लागला. पोलिसाच्या लाठ्या निदर्शकांना अडविण्यासाठी पुढे आल्या. लागलीच पोलिसांवर दगडफेक सुरू झाली. अगदी पाठीमागे असलेले निदर्शक तुलेरिस उद्यानामध्ये घुसले आणि तेथल्या खुर्च्या आणून त्यानी त्या पोलिसांच्या दिशेने भिरकावयाला प्रारंभ केला. झाडा-भोवतालच्या लोखंडी जाळ्या उखडण्यात आल्या आणि त्या हातात घेऊन निदर्शक पोलिसाच्या लाठ्याचे वार अडवू लागले. साध्या पोलिसाना जमाव आवरत नाही असे दिसून येताच घोडेस्वार पुढं आले. निदर्शकाना त्याचीही कल्पना होती म्हणून त्यानी दाढीची पाती लावलेल्या काठ्या आपल्याबरोबर आणल्या होत्या. घोडदळ पुढे येताच या काठ्या बाहेर आल्या. घोड्याचे आणि घोडेस्वाराचे पाय पाती आत घुसताच रक्तबंबाळ होऊ लागले. घोडेस्वाराच्या हातातील काठ्या निदर्शकाच्या पाठीवर आणि डोक्यावर आपटू लागल्या. म्हणून निदर्शकांनी फटाके पेटवून घोड-दळाच्या गर्दीत फेकून द्यायचा सपाटा सुरू केला. फटाक्याच्या आवाजाने आणि प्रकाशाने घोडे बुजू लागले. याचा फायदा घेऊन निदर्शक पुढे सरकू लागले. त्याना भिवविण्यासाठी पोलिसानी हवेत बार काढले. काही निदर्शकाजवळही पिस्तुले होती. पोलिसांनी गोळीबार करताच निदर्शकाची पिस्तुलेही आवाज करू लागली.

दंगल आटोक्यात येण्याचे चिन्ह दिसेना.

इकडे लोकांनी रस्त्यावर हा असा उग्र अवतार धारण केला होता आणि तिकडे प्रतिनिधिसभेतही तीन वाजल्यापासून गोंधळ माजला होता. दलादिए–सरकारवर विश्वास व्यक्त करण्यासाठी ही बैठक बोलाविण्यात आली होती; परंतु प्रधानमंत्री दलादिए याला आपले भाषण वाचून दाखविणे विरोधी पक्षांच्या सदस्यानी अशक्य करून टाकले होते. दलादिए काही नाजुक प्रकृतीचा गृहस्थ नव्हता. त्यामुळे या हुल्लडीने तो गांगरून गेला नाही. त्याचा आवाजही भरदार होता. कॉन्झर्व्हेटिव्ह आणि कम्युनिस्ट सदस्याचा ओरडा वाढला तसा त्यानेही आपला आवाज चढविला. सरकार पक्ष आणि विरोधी पक्ष यांचे वाग्युद्ध टिपेला चढले होते

' प्रजासत्ताकाच्या शत्रूपुढे मी नमते घेणार नाही ' असे दलादिए यानी सांगताच सारे कॉन्झर्व्हेटिव्ह सदस्य उठून उभे राहिले आणि ' तुम्हा आता राजीनामा द्या, बस्स झाले हे खेळ ' असे ओरडू लागले. या मागणीला दलादिए काही उत्तर देणार तोच कॉन्झर्व्हेटिव्ह सदस्यांनी ' मर्साय ' हे राष्ट्रगीत गायला सुरवात केली. कॉन्झ-र्व्हेटिव्ह सदस्याच्या पाठोपाठ कम्युनिस्ट सदस्य मुठी उगारत दलादिएला सागू लागले, ' सारी सत्ता आमच्या सोव्हिएटच्या हाती आली पाहिजे.' नतर त्यानीही ' इंटरनॅशनल ' हे जागतिक क्रांतीचे रणगीत तारस्वरात म्हटले.

दुसरा एखादा प्रधानमंत्री असता तर तो या आरड्याओरड्याने बावचळून गेला असता, पण दलादिए जागचा हलला नाही. तो विरोधकांना सागत होता, ' उगाच

घसे का कोरडे करता ? मतदानाच्या वेळी तुमचं सामर्थ्य कळून येईल की !'

कॉञ्झर्व्हेटिव्ह आणि कम्युनिस्ट सदस्यांना नेमके तेच नको होते आणि म्हणूनच त्यानी प्रतिनिधिसभेला मासळीबाजाराचे स्वरूप आणले होते. प्रतिनिधिसभेमध्ये हा असा गोंधळ १८९९ च्या जूनमध्ये पहायला मिळाला होता. त्यावेळी ड्रेफ्यु–प्रकरण देशभर गाजत होते आणि तशा परिस्थितीत वाल्डेक–रुसोने प्रधानमंत्रीपद स्वीकारले होते. तेव्हा एकदा प्रतिनिधिसभेने हा असा गोंधळ घातला होता आणि त्याची पुनरावृत्ती स्टाव्हिस्की–प्रकरणानतर घडत होती.

सभागृहात शातता प्रस्थापित व्हावी म्हणून सभापती फर्नान्द बुझिआँ याने तीन वेळा पत्ररा-पंधरा मिनिटांकरिता बैठक स्थगित केली. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. बैठक पुन्हा सुरू झाली की पूर्वीचा गोंधळ उसळी मारायचा. एकदा तर कमालच झाली. 'मी ही बैठक पधरा मिनिटाकरिता स्थगित करीत आहे' असे बुझिआँ याने म्हणताच जॅन वार्नेगरी हा कॉञ्झर्व्हेटिव्ह पक्षाचा सदस्य इतका भडकला की तो सरळ दलादिएपाशी गेला आणि त्याच्या कोटाची बाही धरून दगामस्ती सुरू केली. बैठक तात्पुरती स्थगित ठेवण्याचा उपायही निष्फळ ठरत आहे हे पाहिल्यानतर दलादिए म्हणाला, "आता चर्चा बंद करून सरकारवर विश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव सभापतीनी मतास टाकावा अशी मी विनती करतो."

त्यामुळे तर गोंधळ आणखी वाढला आणि बुझिआँ याला पुन्हा एकदा बैठक स्थगित करावी लागली. हे असे चार तास चालले होते. सातच्या सुमारास गोळीबाराचे आवाज प्रतिनिधिसभेमध्ये ऐकू येऊ लागले. स्कापिनी हा सदस्य ओरडला, "पोलिसांनी गोळीबार सुरू केलेला दिसतोय." पुन्हा गोंधळ वाढला. विरोधी पक्षीय सदस्य बाके वाजवीत ओरडू लागले, "हे सरकार खुनी आहे. त्याला खाली खेचा."

गोळीबाराच्या पाठोपाठ लोकांच्या घोषणाही कानांवर येऊ लागल्या. या घोषणाचा आवाज वाढत होता. त्यावरून निदर्शक पोलिसांना न जुमानता प्रतिनिधिसभेजवळ येत असल्याचे लोकप्रतिनिधीना कळून आले. कॉञ्झर्व्हेटिव्ह आणि कम्युनिस्ट सदस्य निदर्शकांच्या स्वागतासाठी उतावीळ झाले होते, तर सरकार पक्षीय सदस्यात घबराट निर्माण झाली. एवढयात, थोडया वेळापूर्वी बाहेर गेलेला सदस्य घाईघाईने सभागृहात येऊन ओरडला, "निदर्शक सभागृहाच्या मुख्य प्रवेशद्वारापर्यंत येऊन पोचले असून शक्य तितक्या लवकर आत घुसण्याचा त्याचा प्रयत्न सुरू झालेला आहे."

हे शब्द ऐकताच बऱ्याच लोकप्रतिनिधीनी सभागृहाच्या मागच्या दाराने पळ काढला. काही उत्साही सदस्य गच्चीवर जाऊन निदर्शकांची आणि पोलिसांची रेटारेटी पहात होते. सभागृहाभोवती सशस्त्र पोलिसांच्या तुकडया गस्त घालत असल्यामुळे निदर्शकांना पुढे येता येत नव्हते. म्हणून त्यांनी सभागृहावर दगडफेक

आरंभिली. पोलिसानी गोळीबार करून या दगडफेकोला उत्तर दिले. घोडदळाने लाठीहल्ल्याचा जोर वाढविला. अनेक निदर्शक खाली कोसळत होते. मात्र तरीही माघार घ्यायला त्यांची तयारी नव्हती.

बाहेर हा गोंधळ चाललेला असताना सभागृहामध्ये दहाबारा मंत्री आणि पाच-सहा सदस्य एवढी मोजकीच माणसे उरली होती. तरीही बैठक चालू राहिली पाहिजे असा दलादिएचा आग्रह होता. शेवटी सभापती बुझिआँ याच्या विनती-वरून कामकाज संपवायला दलादिएने मान्यता दिली. बाहेरच्या गोंधळाने बुझिआँ इतका बावरून गेला होता की बैठक संपल्यानंतर काही वेळ तो टेबलाखाली लपून बसला होता.

बैठक संपून एक तास झाला तरीही निदर्शक तेथून हलेनात. शेवटी काही वार्ताहरानी पुढे होऊन निदर्शकाना सांगितले, –' सभागृहात आता कोणीही नाही.' परंतु या सांगण्यावर निदर्शकांचा विश्वास बसला नाही. ते तेथेच बसून राहिले. संधी मिळताच प्रतिनिधिसभागृहात घुसायचे आणि सरकारपक्षीय लोकप्रतिनिधीना चोपून काढायचे असे त्यांनी ठरविले होते. परंतु ही संधी आपण मघाशीच गमावली आहे हे त्यांना माहीत नव्हते.

लोकप्रतिनिधीवर निदर्शक किती चिडले होते याचा हेरिओसारख्या एकेकाळच्या प्रधानमंत्र्याला प्रत्यक्ष अनुभवच आला. प्रतिनिधिसभेची बैठक आटोपल्यानंतर तो पायी च घरी जायला निघाला होता. सिएनच्या काठाने तो जात असताना पन्नास एक गुंडाच्या टोळीने त्याला पाहिले. ' याला सिएनमध्ये ढकलून द्यायला पाहिजे ' असे म्हणत त्या टोळीने हेरिओला पकडले आणि जबरदस्तीने नदीच्या प्रवाहाजवळ घेऊन जाऊ लागले. परंतु हेरिओचे प्रसंगावधान वाखाणण्याजोगे होते. गुंडानी पकडल्यानंतर तो मुळीच डगमगला नाही. हेरिओ त्याना म्हणाला, " मी लिआँ शहराचा महापौर आहे हे तुम्हास माहीत आहे ना! म्हणून मला जर नदीत ढकलायचंच असेल तर सिएनमध्ये नका टाकू. माझ्या आवडत्या -होन नदीमध्ये मला फेका. कारण -होन नदी आमच्या लिआँ शहराचं भूषण आहे " ते ऐकून गुंडाना काय वाटले कोणास ठाऊक, त्यानी हेरिओला सोडून दिले.

दलादिएच्या कारकिर्दीतील प्रतिनिधिसभेची पहिली बैठक गोंधळात भरली असली तरी त्या बैठकीत आपल्यावरील विश्वासाचा प्रस्ताव संमत करून घ्यायची कामगिरी दलादिएने मोठ्या हिंमतीने पार पाडली होती. तीनशे त्रेचाळीस विरुद्ध दोनशे सदतीस मतानी प्रतिनिधिसभेने दलादिए-सरकारवर आपला विश्वास असल्याचे जाहीर केले. अर्थात् दलादिएच्या रॅडिकल-सोशॅलिस्ट सरकारला समाज-वादी पक्षाने पाठिंबा दिला म्हणूनच विश्वासाचा प्रस्ताव संमत होऊ शकला. समाजवाद्यांचे रॅडिकल-सोशॅलिस्ट पक्षावर प्रेम होते असे नव्हे. परंतु मुसोलिनी आणि हिटलर सत्तेवर आल्यानंतर इटलीमध्ये आणि जर्मनीमध्ये समाजवाद्यांची

काय गत झाली हे फ्रेंच समाजवाद्यांना ठाऊक होते आणि म्हणून, प्रजासत्ताक नष्ट करायला निघालेल्या पक्षांविरुद्ध उभं राहणे त्याना भाग होते. समाजवादी नेता लिऑं ब्लूम याने स्पष्टपण तसे म्हटलेही. विश्वासप्रदर्शक ठरावावर बोलताना तो म्हणाला, " आम्हाला हे सरकार हवं आहे असं मुळीच नाही. परतु या सरकारवर ज्या पक्षांचा राग आहे ते आम्हाला शत्रुवत असल्यामुळे आम्ही या सरकारच्या बाजूनं उभं आहोत."

पॅरिसमधले लोकमत अतिशय प्रक्षुब्ध झालेले असताना, केवळ संसदीय बहुमताच्या आधारावर दलादिएचे भागणारे नव्हते. लवकरच ते खुद्द दलादिएलाही उमगणार होते.

प्रतिनिधिसभेच्या आवारातून बाहेर पडायला निदर्शकांची तयारी नाही असे जेव्हा पोलिसांना आढळून आले तेव्हा त्यांनी पुन्हा गोळीबार केला. त्याचा परिणाम नेमका उलट झाला. निदर्शक पांगण्याऐवजी पिसाळले. प्लेस द ला कोन्कोर्दपासून प्रतिनिधिसभागृहापर्यंतचा, सिएनच्या डाव्या काठावरचा रस्ता निदर्शकानी आपल्या ताब्यात घेतला. या रस्त्याला लागून असलेला पूल तेवढा पोलिसांच्या हातात होता आणि या पुलावर निदर्शक केव्हा घुसतील याचा नेम नव्हता. पोलीसानी गोळीबार करताच निदर्शक पुलाच्या रोखाने पुढे जाऊ लागले. पुन्हा एकदा पोलिसांच्या आणि निदर्शकांच्या लाठ्या एकमेकीवर आदळू लागल्या.

प्रजासत्ताकाच्या दुबळ्या स्वरूपावर माजी सैनिकही चिडले होते. त्यामुळे, त्यानीही या निदर्शनामध्ये सहभागी होण्याचे ठरविले. रात्री नऊ वाजता दोनतीन हजार माजी सैनिक आपले जुने गणवेश अंगावर चढवून लष्करी संचलनाच्या थाटात प्लेस द ला कोन्कोर्दकडे निघाले. 'मर्साय' हे राष्ट्रगीत म्हणत शाझिलिझी या हमरस्त्यावरून हे माजी सैनिक येऊ लागले तेव्हा निदर्शकांना नवा चेव चढला. या सैनिकांची मागणी त्यांच्या हातातल्या फलकावरून चटकन समजण्यासारखी होती 'फ्रान्सने शांततेनं आणि प्रामाणिकपणानं जगावं असं आम्हाला वाटतं.' असे या फलकावर लिहिले होते. माजी सैनिकांच्या या मोर्चाचे नेतृत्व जनरल लाव्हिने-देलाव्हिल आणि कर्नल जोस याच्याकडे होते. दंगल करायची त्यांची इच्छा नव्हती. म्हणून त्यांनी पोलिस-प्रमुख मार्कन्द याला म्हटले, 'आम्हाला आमचं म्हणणं लोकप्रतिनिधींच्या कानावर घालायचं आहे. म्हणून आम्हाला प्रतिनिधिसभेपर्यंत जायची परवानगी मिळाली पाहिजे.'

'ते शक्य नाही,' मार्कन्द उत्तरला.

हे उत्तर ऐकल्यानंतर सैनिक चिडले. त्यानी राष्ट्राध्यक्ष लेब्रन याची भेट घेण्याचे ठरविले. म्हणून त्यानी आपला मोर्चा एलिसे प्रासादाकडे वळविला. तेवढ्यात त्याना पोलिसांनी रोखले. त्याना न जुमानता हे सैनिक प्रासादाच्या प्रवेशद्वारापाशी जाताच, प्रासादाचे रक्षक पुढे आले आणि त्यानी या सैनिकांना

प्लेस द ला कोन्कोर्दपर्यंत मागे रेटले. या रेटारेटीमध्ये पन्नासहून अधिक सैनिक जखमी झाले. त्यामुळे त्यांच्या संतापाचा पारा चढला. त्यातच प्लेस द ला कोन्कोर्दपाशी उभ्या असलेल्या फॅसिस्ट आणि कम्युनिस्ट निदर्शकानी या सैनिकाना चिथावले. 'असं नरमाईनं वागून निभाव लागत नाही.'

या वेळी रात्रीचे साडेदहा वाजून गेले होते. प्लेस द ला कोन्कोर्द येथे जमलेल्या सर्व गटांच्या निदर्शकाची संख्या दहा हजारावर होती. त्या सगळ्यांनी प्रतिनिधि-गृहाला लागून असलेला पूल ताब्यात घ्यायचा पुन्हा एकदा जोराचा प्रयत्न केला. त्यामुळे पुलावर तासभर निदर्शक आणि पोलिस याची धुमश्चक्री चालू होती. एकदा तर निदर्शकांनी पोलिसांना बरेच मागे रेटले. पोलिसानी गोळीबार केला तेव्हा निदर्शकांना पुनश्च मागे यावे लागले.

एवढे होऊनही निदर्शकाचा उत्साह मावळला नाही. पूल काहीही करून आपल्या ताब्यात असला पाहिजे या निर्धाराने सारी शक्ती एकवटून त्यांनी पोलिसा-वर हल्ला चढविला. दंगल सुरू होऊन आता जवळजवळ सहा तास झाले होते. निदर्शकांमध्ये नवेनवे गट येऊन मिळत होते. त्यामुळे त्याची दमशाक झालेली नव्हती. पोलिसांची अवस्था मात्र कमालीची केवीलवाणी झाली होती. सतत धावपळ करावी लागल्यामुळे ते कमालीचे थकून गेले होते. नवी कुमकही अद्याप आली नव्हती. पुलाच्या रक्षणासाठी उभे असलेले पोलिस वैतागून गेले होते. त्यामुळे निदर्शकानी साडेअकराच्या सुमाराला जो हल्ला चढविला तो रोखून धरणे पोलिसाना अवघड होत चालले होते. निदर्शकाची सरशी होऊ लागली.

एवढयात, कर्नल सिमाँसारखा तडफदार सेनाधिकारी पाचशे सशस्त्र पोलिसाचे पथक घेऊन तेथे हजर झाला. सिमाँने युद्ध पाहिले असल्यामुळे आणीबाणीच्या क्षणी आक्रमण हाच संरक्षणाचा सर्वोत्तम मार्ग होय हे त्याला अनुभवाने माहित झाले होते. म्हणून त्याने आपल्या पथकाला हुकूम दिला— 'आगे बढो. निदर्शकाना झोडपून काढा.' नुसता हुकूम देऊन सिमाँ स्वस्थ बसला नाही. तो स्वतः पथकाच्या अग्रभागी चालत निघाला होता. सिमाँचा त्वेष पाहून निदर्शक घाबरले.

रात्रीचे दोन वाजले तेव्हा प्लेस द ला कोन्कोर्दचा परिसर निर्मनुष्य झाला होता.

दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रांमध्ये दंगलीचा हिशोब प्रसिद्ध झाला तो असा— 'चाळीस हजार निदर्शकांपैकी सोळा ठार आणि सहाशे पचावन्न जखमी. पोलिसां-पैकी एक ठार आणि सोळाशे चौसष्ट जखमी'

कर्नल सिमाँ याचे पथक प्लेस द ला कोन्कोर्द येथल्या निदर्शकांना झोडपत असताना प्रधानमंत्री दलादिए याने राष्ट्राध्यक्ष लेब्रन यांची भेट घेऊन प्रजा-सत्ताकाचे रक्षण करण्याचा आपला निर्धार बोलून दाखविला. तो लोकाना कळावा म्हणून त्याने तशा आशयाचे पत्रक काढून ते वर्तमानपत्रांकडे धाडून दिले. या

पत्रकामध्ये दलदिएने म्हटलें होते–' प्रजासत्ताक राजवट उलथून पाडण्याचा काल अयशस्वी प्रयत्न झाला. लोकांच्या जोवित–वित्ताचं रक्षण करण्याच्या आणि प्रजा-सत्ताकाचं स्वातंत्र्य अबाधित राखण्याच्या कार्यात माझं सरकार उणं पडणार नाही याची लोकानी खात्री बाळगावी.'

हे पत्रक प्रसिद्धीस दिल्यानतर दलादिएने मंत्रिमडळाची तातडीची बैठक बोल-विली. या दगलीस तोंड देण्यासाठी आपण कणखर धोरण स्वीकारले पाहिजे याबद्दल सगळ्याचे एकमत झाले. आणीबाणीची परिस्थितो जाहीर करून अन्तर्गत सुरक्षितता राखण्याची जबाबदारी लष्कराकडे सोपवावी, दंगलीमध्ये पुढाकार घेतलेल्या कार्यकर्त्यांवर खटले भरावेत आणि या खटल्यांचे निकाल लागेपर्यंत या कार्यकर्त्यांना स्थानबद्धतेमध्ये ठेवावे अशा तिहेरी उपाययोजनेला मंत्रिमडळाने मंजुरी दिली.

आणीबाणीची परिस्थिती जाहीर करायला दलादिएचा विरोध नव्हता. परंतु शांतता–रक्षणाची जबाबदारी लष्करावर सोपवायला त्याची तयारी नव्हती. पूर्वीच्या चार मत्रिमडळामध्ये दलादिए युद्धमत्री होता आणि त्यामुळे तो सरसेनानी जनरल वेगान्द याला चांगला ओळखत होता. वेगान्दचा मनातून प्रजासत्ताकावर राग आहे आणि शक्य झाले तर फ्रान्समध्ये पुन्हा राजसत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करावा हे वेगान्दचे मनोगत दलादिए याला माहित होते. त्याचप्रमाणे तसे करणे कायदेशीर ठरेल किंवा नाही याबद्दलही दलादिए साशंक होता. म्हणून मंत्रि-मंडळाची बैठक आटोपल्यानंतर तो ॲटर्नी–जनरलच्या भेटीला गेला.

ॲटर्नी–जनरल उत्तरला, "या तीनही गोष्टी बेकायदेशीर आहेत."

"कसं ?"

"आणीबाणीची परिस्थिती जाहीर करण्यापूर्वी संसदेची संमती घ्यावी लागते. दुसरी गोष्ट अशी की दगलखोरांवर खटले भरण्यासाठी सरकारजवळ निश्चित स्वरूपाचा पुरावा असला पाहिजे. तसा कोणताच पुरावा आज आपल्यापाशी नाही. शेवटची गोष्ट अशी की प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याचा वापर करण्यापूर्वी प्रत्येक आरोपीच्या बाबतीत न्यायालयाची परवानगी घ्यावी लागते."

ॲटर्नी–जनरलचा हा पोक्त सल्ला दलादिएच्या तरुण सहकाऱ्यांना मान्य नव्हता. गृहमंत्री फ्रो याला तर त्यावेळी भलताच आवेश चढला होता. तो दलादिएस म्हणाला, "काय कायदेशीर आहे आणि काय नाही हे पाहण्याची ही वेळ नाही." एवढे बोलूनच तो थांबला नाही. त्याने लागलीच पोलिस.कमिशनरला फोन केला– 'दगलीला ज्यानी ज्यांनी चिथावणी दिली त्या सर्वांना अटक करा.'

रात्रभरच्या दगदगीमुळे पॅरिसमधले पोलिसखाते दमून गेले होते. त्यामळे दुसऱ्या दिवशी पुन्हा दंगल उफाळली तर पोलिसखाते टिकाव धरू शकेल किंवा नाही यासंबधी फ्रो साशक होता. त्याने आपली ही शंका दलादिएपाशी बोलून

दाखविली. म्हणून दलादिएने नाइलाजाने वेगान्दला बोलावून घेऊन सांगितले, " पॅरिसच्या वेशीवर लष्कर तयार ठेव. "

हे सगळे कामकाज आटोपल्यानंतर पहाटे तीन वाजता दलादिए आपल्या निवासस्थानी परतला. त्याची भेट घ्यायला वार्ताहर तेथे अगोदरच येऊन बसले होते. त्यांनी विचारले, " तुम्ही काय करायच ठरविलं आहे ? "

" प्रजासत्ताकाचं रक्षण, " एवढे बोलून दलादिए आत गेला.

परंतु आदल्या रात्रीचा हा आवेश दुसऱ्या दिवशी सकाळी विरघळत चालला होता. दलादिएचे एक मन त्याला विचारत होते, " प्रजासत्ताक वाचवायला तू समर्थ आहेस का ? "

दलादिएला होकारार्थी उत्तर देता येईना.

तोच काय पण आदल्या दिवशी कायदा न जुमानणारा फ्रो देखील सात


# युगान्तर

## यशवंतराव चव्हाण

स्वातंत्र्यप्राप्तीनतर अस्तित्वात आलेल्या नव्या हिंदुस्थानच्या ध्येय धोरणांचे, त्याच्या अशा आकाक्षाचे, राष्ट्रीय स्तरावर प्रतीत होणाऱ्या त्याच्या नव्या सामर्थ्याचे आणि एक नवे लोकशाही राष्ट्र म्हणून हिंदुस्थानपुढे उभ्या असलेल्या अनेक ज्वलत समस्याचे उत्कृष्ट विवरण युगान्तरात समाविष्ट करण्यात आले आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनतर भारत एका युगातून दुसऱ्या नव्या युगात जातो आहे. या सक्रमणाचे स्वरूप गृहमत्री यशवंतराव चव्हाण याना जे प्रतीत झाले ते वाणीच्या द्वारे वेळोवेळी प्रकट केलेलेच आहे. ग्रंथरूपाने ते आता वाचकांपुढे येत आहे. त्याचे हे विचार नव्या भारताला—नव्या महाराष्ट्राला मोलाचे वाटतील.

सरक्षण आणि सामर्थ्य, उद्योग आणि अर्थ, शिक्षण आणि सस्कृती, शेतीविकास आणि सहकार, संघटना आणि लोकशाही असे कितीतरी महत्त्वाचे विषय श्री. यशवतरावानी सर्वसामान्य माणसाला समजतील, पेलतील अशा शब्दात युगान्तरात ग्रथित केलेले आहेत.

सर्वांगीण सुदर असलेल्या सुमारे ३५० पृष्ठांच्या (डेमी) या ग्रंथाची किमत अवघी बारा रुपये आहे.

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

पुणे ३०

फेब्रुवारीच्या सकाळीं लटपटू लागला होता. नेहमी प्रमाणे तो आपल्या कचेरीत गेला तेव्हा गुप्त पोलिस-खात्यामार्फत आलेला अहवाल त्याच्या टेबलावर होता. या अहवालामध्ये म्हटले होते–' कालच्यापेक्षाही मोठे निदर्शन आज सध्याकाळी घडवून आणायचे असे डाव्या आणि उजव्या पक्षानी ठरविले असून त्यासाठी निदर्शकानी पिस्तुले आणि हात बाँब यांची खरेदी सुरू केली आहे, शस्त्रास्त्रांची विक्री करणाऱ्या दुकानांमध्ये दंगलखोरांची अक्षरशः रीघ लागली आहे. आजचा दिवस मावळायच्या आत गृहमंत्री फ्रो याला ठार करायचे अशीही निदर्शकानी प्रतिज्ञा केली आहे.'

हा अहवाल वाचताच फ्रोला दरदरून घाम सुटला. गुप्त पोलिस-खात्याकडून आलेला हा अहवाल प्रधानमंत्री याला कळवावा एवढे देखील भान त्याला उरले नाही. त्याने थेट राष्ट्राध्यक्ष लेब्रन याला फोन केला, ' दलादिए-मंत्रिमंडळानं ताबडतोब राजीनामा दिला पाहिजे असं मला वाटतं.'

लेब्रन तर इतका घाबरट होता की फ्रो याला धीर देण्याऐवजी तो स्वत.च रडू लागला. त्याचा स्वभावच तसा होता. लहानसहान कारणावरूनही त्याच्या डोळ्यात आसवे तरळत असत. ' रडवा राष्ट्राध्यक्ष ' म्हणूनच तो ओळखला जाई. फ्रो याचा फोन आल्यानंतर त्याचे सारेच त्राण हरपले. येत्या चोवीस तासाच्या आत या प्रजासत्ताकाचे काय होणार आहे या भीतीने त्याला काहीही सुचेनासे झाले. अशा परिस्थितीत राष्ट्राध्यक्ष म्हणून त्याने स्वत: दलादिएशी बोलणे करायला हवे होते. पण त्याऐवजी त्याने फ्रो याला सांगितले, ' तू आताच्या आता दलादिएला फोन करून त्याला हे सगळं सांग.'

फ्रो याने दलादिएला फोन करून राजीनामा देण्याचा सल्ला दिला.

दुपारी बारा वाजता मंत्रिमंडळाची तातडीची बैठक भरली. दलादिएपासून सगळे मंत्री हबकून गेले होते. फ्रो म्हणाला, ' आज सध्याकाळची दंगल थांबवायची असेल तर या मंत्रिमंडळानं राजीनामा देण्याशिवाय दुसरे गत्यंतर नाही.' इतर मंत्र्यानीही फ्रोच्या म्हणण्याला मान डोलविली, तरीदेखील दलादिएच्या मनाचा निश्चय होत नव्हता. सिनेट आणि प्रतिनिधिसभा यांच्या अध्यक्षांना तो भेटला. हेरिओ आणि फ्रोसार्द याच्याशी त्याने विचारविनिमय केला. सगळ्यांचे एकच सांगणे होते–' प्रजासत्ताक वाचवायच असेल तर आताच्या आता राजीनामा देऊन मोकळं व्हा.'

दलादिए आपल्या कचेरीत जाऊन विचार करू लागला. एवढ्यात त्याच्या टेबलावरचा फोन खणखणू लागला. लेब्रन फोनवरून दलादिएला सांगत होता, ' आता व्यर्थ विचार करीत वेळ वाया घालवू नकोस. यादवी युद्ध टाळायचं असेल तर एकच मार्ग आहे – तुझ्या मंत्रिमंडळाचा राजीनामा.'

एकट्या लिऑं ब्लूमचे मत तेवढे वेगळे होते. तो दलादिएला म्हणाला, ' प्रजा-

सत्ताकाच्या अस्तित्वाला धोका निर्माण झालेला असताना प्रधानमंत्र्यानं राजीनामा देऊन, मैदानातून पळ काढण म्हणजे निव्वळ मूर्खपणा ठरणार आहे. हे आव्हान आपण सर्वांनी स्वीकारले पाहिजे. आपण आज संध्याकाळी ससदेच्या बैठकीमध्य आणीबाणीची परिस्थिती जाहीर करू या. म्हणजे मग प्रजासत्ताकाच्या शत्रूचा बीमोड करणं आपल्याला सोपं जाईल.'

परतु, पॅरिसचे रस्ते आज पुन्हा आपल्या देशबांधवांच्या रक्ताने रंगून जावेत असे दलादिएला वाटेना.

दोन वाजता तो एलिसे प्रासादात गेला आणि लेब्रन यांच्या हाती त्याने आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा ठेवला. निदर्शकाचे आव्हान स्वीकारण्याची धमक नसल्यामुळे पंधरा दिवसाच्या आत फ्रान्समधील दुसरे मत्रिमडळ कोसळले होते.

या राजीनाम्यामुळे त्या दिवशीचे निदर्शन मागे घेण्यात आले; तरीदेखील सराईत गुडानी रात्रभर पॅरिसमध्ये धुमाकूळ घातला. परतु त्यामागे राजकीय पक्षांचा हात नव्हता.

दलादिए यांच्या राजीनाम्यानंतर, लेब्रनने गास्तॉं दुमेर्ग याला प्रधानमत्रिपद स्वीकारण्याची पुन्हा विनती केली. यावेळीही ही जबाबदारी घ्यायला त्याने नकार दिला; परंतु लेब्रनच्या आग्रहाखातर शेवटी त्याने होकार दिला. म्हातारा दुमेर्ग आणि रडवा लेब्रन अशा अकार्यक्षम जोडीकडे अतिशय बिकट काळामध्ये फ्रान्सची सूत्रे आली होती. उजव्या आणि डाव्या गटाची आव्हाने स्वीकारताना त्यांची किती त्रेधातिरपिट उडणार आहे हे सांगायला भविष्यवेत्त्याची गरज नव्हती.

दलादिएच्या राजीनाम्याने तिसऱ्या फ्रेंच प्रजासत्ताकाचे दौर्बल्य पुन्हा एकदा उघडे पडले.

आपल्या देशबांधवाचे रक्त सांडायला आपण कारणीभूत ठरू नये या भावनेने जर दलादिए बाजूला झाला असता तर ते समजण्यासारखे होते. परतु निदर्शकाच्या भीतीने तो मागे सरला होता आणि त्यामुळे फ्रान्समधल्या प्रजासत्ताक राजवटीला कणखर नेतृत्वाचा आधार नाही याचा प्रत्यय आला होता. सात फेब्रुवारीला जर दलादिएने प्लेस द ला कोन्कोर्दपासून प्रतिनिधिसभागृहापर्यंतच्या रस्त्यावर नुसते रणगाडे आणून ठेवले असते तरीदेखील निदर्शकाना पुढे जाण्याच' हिंमत झाली नसती. परतु सहा तासांच्या दंगलीने, एकेकाळी युद्धमत्री म्हणून काम केलेल्या दलादिएचाही धीर सुटला, त्याचे सहकारी मत्रीही घाबरून गेले; खुद्द राष्ट्राध्यक्षही हादरून गेला.

निर्धाराने उभे राहण्याचे त्राण तिसरे प्रजासत्ताक हरवून बसले होते.

हे पाहिले म्हणजे सहा फेब्रुवारीच्या रात्री हे प्रजासत्ताक टिकले ही दैवाचीच करामत म्हटली पाहिजे. दैव प्रजासत्ताकाच्या मदतीला येण्याची ही तिसरी वेळ होती. २७ जानेवारी १८८३ रोजी बुलाजेला नको त्यावेळी प्रेयसीची आठवण

झाली आणि प्रजासत्ताक वाचले. २३ फेब्रुवारी १८९९ रोजी देरुलेद प्रजासत्ताक उलथून टाकायला उभा होता, पण त्यावेळी त्याची गाठ पडली जनरल दोजे याच्याशी आणि त्यामुळे एलिसे प्रासाद ताब्यात येण्याऐवजी देरुलेदलाच तुरुंगाची हवा खावी लागली. ६ फेब्रुवारी १९३० लाही तसेच घडले.

ज्यावेळेला चाळीस हजार निदर्शक प्लेस द ला कोन्कोर्द येथे जमून 'प्रजासत्ताक मुर्दाबाद'च्या घोषणा करीत होते त्यावेळी या निदर्शकांचा एकही पुढारी तेथे हजर नव्हता. त्यामुळे निदर्शकानी प्रतिनिधिसभेपर्यंत कूच केली आहे हेदेखील त्याना कळले नाही. अनुयायांचे रक्त सांडत होते आणि त्याना भडकविणारे पुढारी सुरक्षित जागी बसून आराम करीत होते. या निदर्शकांसबंधी आपली काही जबाबदारी आहे. त्यानी निर्माण केलेल्या दहशतीचा फायदा कसा घ्यायचा याचा आपण तातडीने विचार करायला हवा या गोष्टीचे डाव्या आणि उजव्या गटांच्या त्या गलथान नेतृत्वाला भानच उरले नव्हते. कर्नल ला टॉकसारखा सेनानीदेखील एका अज्ञात जागी लपून बसून, तेथूनच निदर्शकाना हुकूम सोडत होता, 'घाबरता काय, पुढे व्हा.' आणि कहर म्हणजे जेव्हा हे निदर्शक प्रतिनिधिसभागृहावर प्रवेशद्वारावर धडका देऊ लागले तेव्हा ला टॉकने त्यांना माघार घेण्याचा सल्ला दिला.

'आक्सियों फ्रान्सेज' या वृत्तपत्राने हे निदर्शन पेटवले होते. परंतु ६ फेब्रुवारीच्या अंकामध्ये भडक मथळे दिल्यानतर या पत्राचा संपादक मॉरास स्त्रीसबधी एक कविता लिहायला बसला आणि रात्री जेव्हा ही कविता मनासारखी लिहून झाली तेव्हा तो मोठ्या आनदाने झोपी गेला. दुसऱ्या दिवशी दुपारी चारच्या सुमारास ही स्वारी कचेरीमध्ये परतली. उजव्या गटाचे कार्यकर्ते त्याची सकाळपासून वाट पहात होते. मॉरास कचेरीत येताच या कार्यकर्त्यांनी विचारले, 'आज आपण काय करायच याचा विचार केला पाहिजे.'

मॉरास उत्तरला, 'अजून मी आजच एकदेखील वृत्तपत्र चाळलेलं नाही. उद्या बघू.'

नादान नेतृत्व कार्यघात तर करतेच, पण आपल्या अनुयायानाही फशी पाडते ते हे असे.

तिसऱ्या प्रजासत्ताकाला तिसऱ्यादा जीवदान मिळाले यात कोणाच्याही कर्तृत्वाचा भाग नव्हता, नशीब जोरावर होते म्हणून ते वाचले इतकेच. आणि त्यानतरदेखील हे प्रजासत्ताक स्वतःला सावरू शकले नाही.

जन्मापासूनच या प्रजासत्ताकाला अस्थिरतेचा शाप भोवत होता.

(क्रमश:)

पृष्ठ २१ वरून

होते. टिळकांनी ब्रिटिश नोकरशहांचे गोडवे गाणाऱ्या या नव्या संप्रदायाच्या पुढाऱ्यांविषयी लिहिले होते, ' राष्ट्रात ज्या तऱ्हेचे पुढारी निपजतात त्यामानाने त्याची स्थिती सुधारते अगर बिघडते हे निर्विवाद आहे. आमची स्थिती सुधारणे असल्यास ती हल्लीच्या पुढाऱ्यांच्या हातून सुधारण्याची आशा नाही....सर भालचंद्र अगर ना. चंदावरकर यास त्याच्या पोचटपणाबद्दल नावे ठेवणे म्हणजे परमेश्वराने कोल्ह्यास धैर्य दिले नाही म्हणून ईश्वरास दोष देण्यासारखे आहे. आम्ही यास पुढारी म्हणतो हीच चूक आहे. बाकी सरकारास असली माणसे हवीच आहेत व अशाच माणसास त्याच्याकडून ' सर'की अथवा इतर सन्मान मिळावयाचा.' टिळकांनी अशा पुढाऱ्याचा पोचटपणा, नेभळेपणा आणि त्यांचे अनाठायी लांगूलचालन यावर कडाडून टीका केलेली आढळते. त्यांच्या मते नृपागणात सज्जनही होते आणि खलही होते. या दोघांचाही फायदा ब्रिटिश सरकार करून घेत होते. त्यांच्यातर्फे स्वतःच्या भूमिकेचे समर्थन करवून घेत होते. टिळकांना या राजपक्षीय नेत्यांची ही प्रभावळ फोडावयाची होती आणि लोकांची बाजू सरकारपुढे माडण्यासाठी नवे नेतृत्व प्रस्थापित करावयाचे होते. गव्हर्नरला मानपत्रे देणे, त्याचे सत्कारसमारंभ योजणे, त्याला समाजात प्रतिष्ठा मिळवून देणे, सरकारी वर्तुळात स्वतः मिरविणे, अशा अनेक क्लृप्त्या हे पुढारी त्यावेळी योजून ब्रिटिश नोकरशाहीस खूष करण्याचे प्रयत्न करीत होते. याचे एक उदाहरण म्हणजे दुष्काळ व प्लेग या दोन्ही प्रसगी मुंबई इलाख्यात जुलूमशाही सुरू करणारे लॉर्ड सँढर्स्ट याचे स्मारक करण्याबाबत मवाळानी घेतलेला पुढाकार हे होय. यात ना. फेरोजशहा मेथा, न्या. चंदावरकर, न्या. रानडे यांनी घेतलेला पुढाकार पाहून टिळकांनी लिहिले, 'नामदार मेथा यांच्यासारख्यानी इकडे लॉर्ड सँढर्स्ट यास मानपत्रे द्यावी आणि तिकडे कांग्रेसमध्ये मोठा सूर काढून अभिनययुक्त आवेशाने लॉर्ड सँढर्स्ट यांच्यापासून सुरुवात झालेल्या कृत्याचे दोषाविष्करण करावे हे आमच्या मते अगदी परस्परविरुद्ध होय.' सारांश, हे नेतृत्व लोकांच्या भावना व मते सरकारपुढे ते दुखावेल म्हणून माडत नव्हते हे स्पष्ट आहे.

टिळक–आगरकर यानी कोल्हापूर प्रकरणी जी टीका केली ती त्यांची लोकांचा कैवार घेण्यासाठी केलेली पहिली चढाई होती. टिळक–आगरकरांनी त्यासाठी कारावासही भोगला आणि नव्या लोकाभिमुख नेतृत्वाचा आरंभ केला. पुढे टिळक ' केसरी 'चे संपादक झाले आणि अनेक चळवळी करून आपले ' लोकाचा कैवारी ' हे स्थान दृढ केले. त्यामुळेच नोकरशाही व मवाळ पक्ष अस्वस्थ झाले. टिळकांनी ' केसरी 'ची दिशा कोणती आहे हे सांगताना म्हटले होते, " इंग्रजी पत्रांचे महत्त्व,

इंग्रजीवरच सारे बुद्धिमान् लोकांचे लक्ष केंद्रित झाल्यामुळे वाढते. त्यामुळे समाजात दोन वर्ग निर्माण होऊन त्यात अंतरही निर्माण झाले. " 'केसरी'चा जन्म सामान्य जनतेसाठी होता. या स्वयमन्य वर्गाचे ते मुखपत्र नव्हते. हा मार्गही कठीण होता. कारण त्यात जनतेची सत्य बाजू सरकारची गैरमर्जी पत्करुनही मांडावयाची होती. टिळकांनी अशा तऱ्हेची मोहीम सुरू केल्याबरोबर त्यांना राजद्रोही म्हणून ठरविण्याचा प्रयत्न सुरू झाला १८९६ च्या दुष्काळात बडोदा येथे व्हाइसरॉय गेले असता तेथे एक बडा खाना होता. त्यावेळी युरोपियन अमलदारांनी जे वर्तन केले त्यावर टिळकांनी कडाडून टीका केली. तेव्हा 'टाइम्स'ने त्या टीकेला राजद्रोही म्हटले. त्याला उत्तर देताना टिळक म्हणतात, " युरोपियन म्हटला की तो उदार, धीट, बुद्धिवान्, शहाणा, व दयाळू असावयाचाच अशी आमची जोपर्यंत कल्पना नाही तोपर्यंत आमच्या हातून असले 'राजद्रोह' रोज घडावयाचेच ! " हे ठणठणीत उत्तर दिल्यामुळेच पुढे टिळकांवर १८९७ मध्ये काहीतरी निमित्त करून खटला भरण्यात आला. अशी ही एका बाजूने जुने पोचट पुढारी व दुसऱ्या बाजूस अरेरावी नोकरशहा यांच्याविरुद्ध टिळकांनी आघाडी उघडली आणि आपले तेजस्वी लोकांचा कैवार घेऊन झगडणारे, त्यासाठी हालअपेष्टा भोगण्याची सिद्धता असलेले नेतृत्व १८९० ते १८९७ या काळात उभे केले.

## मध्यम वर्गाच्या पलीकडे...

दुष्काळ व प्लेग या काळात टिळकांनी केलेल्या कार्याचे महत्त्व ब्रिटिश सरकारलाही त्याकाळी मान्य करावे लागले. पण टिळकांनी या काळात जे लेख लिहिले, जी भाषणे केली त्यातून त्यांनी आपले नेतृत्व केवळ मध्यमवर्गीय नसून दलितांच्या, दुःखाकडे पहाणारे आहे हे सिद्ध केले. ही मोठी क्रांतीच समजली पाहिजे. कारण ज्या वर्गात एकादा नेता जन्मतो, त्याच्या विचारसरणीचा, आर्थिक हिताचा पगडा त्याच्या कार्यावर व विचार पद्धतीवर अपरिहार्यपणे पडत असतो. त्याकाळच्या दृष्टीने पाहिले तर टिळकांनी ही मोठी क्रांतीच केली असे मानले पाहिजे किंबहुना त्यांनी अशी परंपराच महाराष्ट्रात निर्माण केली आणि त्याचा आदर्श इतर प्रांतांनी पुढे ठेवला. टिळकांची सारी पिढी त्यामुळे प्रभावित झाली. प्राचार्य म. शि. गोळे यांनी १८९५ मध्ये 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' नावाचे ब्राह्मणवर्गाने केलेल्या बौद्धिक चळवळीची समीक्षा करणारे व त्या काळच्या भावनांचे प्रतिबिंब असलेले पुस्तक लिहिले होते. त्यात त्यांनी ब्राह्मणांचे त्यांच्या रयतेसंबंधीच्या कर्तव्यासंबधी विवेचन करताना लिहिले होते, " ब्राह्मणांनी रयतेविषयी बंधुभाव धरावा, रयतेच्या हरघडी उपयोगी पडावे, तिची पीडा व दैन्य वारावे, सत्कार्यांत व सदाचारात आयुष्य घालवावे, व रयतेच्या अंतर्यामी पूज्य व्हावे. स्वहिताचा व परहिताचा हा मार्ग सर्वांस सुलभ व स्वाधीनचा आहे. " टिळकांच्या नेतृत्वात ही रयतेची कणव होती. म्हणूनच त्यांना तेल्यातांबोळ्यांचे पुढारी ही पदवी त्यावेळच्या मवाळांनी

दिली. ब्राह्मणांनी कोणत्या प्रकारचे नेतृत्व करावे याचा आदर्शच टिळकांनी घालून दिला होता.

## शेतकरी–कामकऱ्यांची दुःखे

टिळक हे कसे करू शकले ? पहिली गोष्ट म्हणजे हे परिवर्तन टिळकांनी स्वतःच्या व्यक्तित्वात प्रयत्नपूर्वक केले. केवळ पांडित्य करण्याऐवजी देशसेवेच्या अदम्य प्रेरणेने ते राजकारणात पडले. आणि ते राजकारणही आरामखुर्चीचे न करता टिळकांनी सामुदायिक असंतोषात्मक उठावाचे, व समुदायाचे राजकारण (Revolutionary mass politcs) सुरू केले. ही वाटते तेवढी सामान्य गोष्ट नाही. केवळ बौद्धिक दृष्टचा मन लोकशाहीवादी किंवा समाजवादी होणे कठीण नाही. पण स्वतःचे आचरण, स्वतःचे जीवन त्या विचारसरणीला आवश्यक अशा रीतीने घडविणे हे कठीण असते. टिळकांच्या व्यक्तित्वातील हे परिवर्तन बुद्धिपूर्वक झालेले आहे. हिंदुस्थानच्या दारिद्र्याचे मूळ कारण शेतकऱ्याची दैन्यावस्था हे आहे. तेव्हा त्याच्या आकांक्षांशी, दुःखांशी समरस होता आले तरच त्याचे नेतृत्व करता येईल हे टिळकानी जाणले होते. तसेच कामगारांचे आहे. मुंबईतील कापड गिरणी कामगारांपुढे दि. १५ डिसेंबर १९०७ रोजी चिंचपोकळी येथे बोलताना टिळक म्हणाले होते, "मला तुमची काळजी वाटते; कारण मी तुमचा आहे अथवा तुम्ही माझे आहा. तुमचे माझे नाते असल्यामुळे मला तुमची काळजी वाटते." ही जवळीक उद्योगधंद्यांतल्या लोकांविषयी, होतकरू तरुणाविषयी टिळकांना होती. समाजाच्या सर्व थरात टिळकांचे संबंध होते. खऱ्या अर्थाने त्यांच्या नेतृत्वाला समाजव्यापी आधार होता.

## लोकशाही व्यक्तित्व

टिळकांना असे नेतृत्व निर्माण करता आले याचे कारण स्वतःचे व्यक्तिमत्त्व लोकशाहीला अनुरूप असेच त्यांनी घडविले. टिळकानी मवाळांना कडवा विरोध केला, त्याचे मार्ग झुंडशाहीचे होते असा त्यांच्यावर त्यावेळी व आताही आडून आडून आरोप केला जातो. टिळकाचे मार्ग शिष्टाचारास धरून नसत असे म्हटले जाते. जेव्हा सामान्य जनांच्या मनात कोंडलेल्या भावनांना वाट करून द्यावयाची असते त्यावेळी अनेकदा सभ्यतेच्या किंवा सौजन्याच्या पुढ्यात त्या भावना ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. खरे म्हणजे ते सौजन्य किंवा ती सभ्यता ही एक भेकडपणाची झूल म्हणून वापरण्यात येते. तिच्या आधारे प्रस्थापित नेतृत्व आपल्याला सोयिस्कर असे धोरण चालू ठेवते. सुरत येथे टिळकानी केलेला समर प्रसंग किंवा न्यायालयापुढे त्यांनी १९०८ साली केलेली गंभीर घोषणा किंवा अनेकदा नोकरशाहीशी घेतलेली झुंज ही त्यांच्या अदम्य नेतृत्वाची वैशिष्ट्येच होती. त्या घटना प्रतीकात्मक होत्या. बंगालच्या फाळणीनंतर प्रबळ झालेल्या राष्ट्रवादातून ज्या युयुत्सु, आग्रही, जिद्दी, लढाऊ प्रवृत्ती व शक्ती भारतीय जनतेत दिसू लागल्या त्या सर्वांचे ज्वलंत, चैतन्यशाली प्रतीक म्हणजे टिळक होते. नव्या लोकशक्तीची ती गंगोत्री

होती. तिचे स्वरूप प्रलयंकर होणार हे दिसत होते. प्रलयाचा किंवा वणव्याचा हा काळ सामोरा येत होता. टिळक त्या लोकतेजाचे उग्र प्रतीक होते. तेव्हा टिळकांच्या जीवनातील या सर्व संघर्षाचा अर्थ रूढ शिष्टाचाराचे नियम लक्षात घेऊन मुळीच समजणार नाही. राष्ट्राच्या कोंडलेल्या भावनांना वाट करून देणाऱ्या चळवळीचे नेतृत्व करण्यास जे पुढारी पुढे येतात त्यांच्या जीवनातील संघर्ष हे त्या राष्ट्राच्या जीवनातील संघर्ष असतात. टिळकांचे नेतृत्व अशापैकी होते. टिळकांनी विलायती कपड्यांच्या पुण्यात १९०६ साली झालेल्या होळीचे समर्थन करताना केसरीत म्हटले होते, "शिवाय 'पूरात्पीडे तडागस्य परिवाहः प्रतिक्रिया' या न्यायाने मनातल्या मनात धुमसणाऱ्या दुःखांचा व निराशेचा प्रत्यक्ष कृतीने बाहेर उद्गार निघाल्याशिवाय मन कार्यक्षम होत नाही. अतिशय दुःख झाले तर सर्वांच्या देखत नाही तर एकांतात तरी मनमुराद रडून घ्यावे लागते." यावरून राष्ट्राच्या भयानक निराश अवस्थेची टिळकांना कल्पना आली होती आणि त्या निराशेतून आशा उत्पन्न करणाऱ्या चळवळी त्यांनी आरंभिल्या होत्या हे स्पष्ट दिसते. ही निराशा त्यांनी स्वत. लोकांच्या दैन्यात पाहिली होती. त्यांच्या असहाय्यतेत त्यांना ती दिसली आणि त्यातूनच त्यांचे प्रक्षोभक, वादळी नेतृत्व जन्मले. म्हणूनच ते लोकशाहीचा आधार जे 'लोक' त्याच्याशी ते समरस होऊ शकले. टिळकाच्या १९०८ च्या तुरुंगवासात मुंबईत जो अभूतपूर्व राजकीय संप झाला ते टिळकांच्या लोकांवरील प्रभुत्वाचे उदाहरण म्हणून मानता येईल. तो संप म्हणजे त्यांच्या जनतेतून निर्माण झालेल्या, जनतेसाठी झुरणाऱ्या व झुंजणाऱ्या नेतृत्वास जनतेने केलेला मानाचा मुजरा होता आणि ती सहसंवेदनाही होती.

## आदर्श लोकशाही नेतृत्व

टिळकांच्या जीवनाचे पुण्यस्मरण आज पन्नास वर्षांनी आपण करीत आहोत तेव्हा स्वाभाविकच त्यातले शाश्वत काय आहे याचा आपण शोध घेतो. आपण लोकशाही स्वीकारली आहे. लोकशाहीने आणलेली राजकीय संस्कृती आपल्या राष्ट्रीय जीवनात अवतीर्ण झाली आहे. स्वराज्याचे सरकार आले आहे. राजकीय पक्ष काम करीत आहेत. राष्ट्राचा राजकीय संसार चालू झाला आहे. अशा वेळी टिळकांचे स्मरण करताना त्यांची लोकांवरील निस्सीम भक्ती व श्रद्धा यांचे अनुकरण आपल्याला करावेसे वाटेल. आता अपरिहार्यपणे नवा बहुजनसमाज पुढे येणार आहे. संख्येच्या बळावर कदाचित् कमी पात्रता असलेल्या लोकांचे राज्य काही काळ राहाणे अपरिहार्य आहे. अशा वेळी लोकमान्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वात जे रूपांतर केले आणि लोकसमूहाला रुचेल असे वर्तन केले ते बुद्धिमंतांनी आठवावे. लोकमान्यांचे ते रूप, त्यांचे बोलणे, त्यांचे चालणे हे सारे आजही बुद्धिमंतांनी अनुकरणीय वाटेल. कारण या बहुजनसमाजाच्या निर्मितीमुळे अस्वस्थ झालेला बुद्धिमंत निष्क्रिय होत आहे. तो काठावर उभा राहून मजा पाहतो आहे.

टिळकांनी स्वतः प्रकांडपंडित असूनही ही बौद्धिक व मानसिक अलगपणाची प्रवृत्ती दाखविली नाही. त्यांनी सामान्य जनता व बुद्धिमंत याचयातील सामाजिक व मानसिक अतर प्रयत्नपूर्वक तोडले होते. त्या लोकगंगेत त्यानी उडी घेतली होती. त्याबद्दल तत्कालीन विद्वानानंही त्याची चेष्टा केली होती. पण टिळक मागे हटले नाहीत. लोकांबरोबरच राहिले आणि लोकानाच ते पुढे घेऊन गेले.

टिळकाच्या लोकशाही व्यक्तित्वात आणखी एक भाग आजही आपल्याला अनुकरणीय वाटेल. तो म्हणजे विरोधी पक्षाचे नेते म्हणून त्यांनी उठविलेली वादळे आणि केलेले अमोल कार्य! 'स्वराज्यांतही विरोधी पक्षात राहून मला काम करावे लागेल' असे टिळक एकदा म्हणाले होते. जनतेची गाऱ्हाणी लक्षपूर्वक ऐकणे, त्यांचा अभ्यास करणे, ती नेटाने, धरसोड न करता मांडणे, त्यासाठी तुरुंगवास, छळ सोसूनही सरकारशी झुंजत राहाणे, जनतेच्या चळवळी योग्य वेळी आपले सामर्थ्य जोखून करीत राहाणे, त्यासाठी सतत लोकसंग्रह करणे, नव्या पिढीकडे व्यक्तिशः लक्ष देणे अशी अनेक वैशिष्ट्ये विरोधी नेते म्हणून त्यानी दाखविली. प्रखर विरोध केला पण आपल्याला प्रतिकूल असलेल्या नेत्यांचा गुणगौरवही मोकळ्या मनाने केला. वाक्शस्त्रे वापरली, पण मन मोकळे ठेवले. या सर्वांमुळे टिळकाची प्रखर विरोधकाची भूमिका ही वादळी

## राष्ट्रगुरु लोकमान्य टिळक विशेषांक

श्री महाराणी चिमणाबाई हायस्कूल, बडोदे ह्या शाळेचा लोकमान्य-टिळक-पुण्यतिथी-अर्धशताब्दीनिमित्त काढलेला राष्ट्रगुरु लोकमान्य टिळक विशेषांक (१९६९-७०) वाचनीय आहे.

संपादकीयात दुसऱ्याच परिच्छेदात "गत वर्ष गुजरातके विख्यात वृत्त-पत्रकार श्री. नीरुभाईने बडे दुःखसे लिखा था – ' १ अगस्त! स्वराज्य-मार्गदर्शक लो. टिळकका मृत्युदिन! किन्तु गुजरातमे न किसीको उनका स्मरण हुआ...' बात सच थी।"

ह्या पार्श्वभूमीवर शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनीनी ग्रंथ व वृत्तपत्र पाहून, त्या पुण्यपुरुषाच्या इतक्या हृद्य आठवणी लिहिल्या आहेत की त्याने आशा पल्लवित होतात, भविष्य उज्वल होईल असा दिलासा वाटतो.

गुजराथी ६, मराठी ४२, संस्कृत १, हिंदी १ व इंग्रजी १ अशी ५२ पाने अतरंगात व ५३ ते ६७ पाने १९६९-७० शालेय वर्ष का सिंहावलोकन.

यातील 'अष्टपैलू टिळक', नुपेक्षी कुदा बाळ मिस्त्रिमानी आणि टिळकाची अभ्यासूवृत्ति एवढे तीन लेख विद्यार्थी-विद्यार्थिनींनी जीवनात उतरविण्याचा प्रयत्न केला, तर त्यात त्यांचेच व पर्यायाने राष्ट्राचे कल्याण आहे

आजी व माजी विद्यार्थी-विद्यार्थिनीनी काढलेली तीनही चित्रे कौतुकास्पद.

–रा. पु. गोडबोले

ठरली, विवाद्य ठरली, निष्ठाभंजक झाली तरी आदरणीय झाली. त्यामुळे राष्ट्रीय जीवनात चैतन्य आले. कृतिशीलता आली, देशभक्ती उचंबळून आली.

आजही भारतातील लोकयुगाचे प्रवर्तक म्हणून केलेल्या लोकमान्यांच्या या महान कार्याचे स्मरण करताना त्या दिव्य तेजाचा एक अंश तरी आपल्या देशाला मिळू दे, त्या लोकसामर्थ्याच्या निर्मात्याचे ते अलौकिक निःस्वार्थी, बडखोर, मुसंडी मारणारे नेतृत्व नव्या स्वरूपात पुन्हा एकदा या प्रचंड लोकसत्ताक राष्ट्राला मिळू दे अशी भावना अंतःकरणात स्वाभाविकपणे निर्माण होते. उदासीनतेच्या, निराशेच्या, बौद्धिक संभ्रमाच्या या काळात टिळकांची ही मूर्तीच भारताने पुनः पुन्हा आठवावी इतकी ती अक्षय्य स्फूर्तिदात्री आहे.

◻ ◻ ◻

---

## बळीराजा

शेती व शेतकऱ्यांच्या प्रगतीस वाहिलेल्या ह्या मासिकातील बहुतेक लेख शेतकऱ्यांना जिव्हाळ्याचे व माहितीपूर्ण आहेत.

कृषिपंडित सीतारामपंत एकनाथपंत घुमाळ ह्यांचा खुद्द संपादकांनी करून दिलेला परिचय, जमीन कधीच 'अवपरकाती' (अपेश देणारी) नसते आणि शास्त्रीय शेती निश्चित उत्पन्न वाढविते ह्याची खात्री पटवितात.

सिने परीक्षण, रहस्यकथा, कादंबरी इ. सदरांचे प्रयोजन अशा एका विशिष्ट विषयास वाहिलेल्या मासिकात खटकते. व्यापारी दृष्टिकोनातून त्याचे समर्थन होऊ शकते.

मुखपृष्ठासंबंधी संपादकीय खुलासा क्रूर, करुणाजनक वास्तवतेचे दर्शन घडवित असला तरी ध्येयासाठी झगडणाऱ्याने विजिगिषु आशावाद प्रकट होईल असा रांगडा शेतकरी व मस्त बैलजोडी मुखपृष्ठावर घातली असली तर अधिक बरे वाटले असते.

भारत हा अजूनही शेतीप्रधान देशच आहे आणि शेती-शेतकरी प्रगतीस वाहिलेले 'बळीराजा'सारखे अभ्यासू मासिक ही एक काळाची निकडच आहे.

[ अंक ६ : जून १९७० : किंमत अडीच रुपये : पाने १२८ ]

---

विज्ञानखबरी

श्रीकांत आंबेकर

# भविष्यात हे शक्य आहे !

शास्त्र हा विषय काव्याच्या मुळावरच जन्मला आहे की काय देव जाणे; पण या शास्त्राने काव्याचा भलताच विरस करून ठेवला आहे हे मात्र खरे! आता हेच पहा ना, या कर्मठ शास्त्रीबुवांनी सध्या कुणालाही 'चाँदका टुकडा' म्हणून पुकारायची सोय ठेवलेली नाही. आणि आता तर 'तेरे होट क्या है गुलाबी कमल है' चे दिवससुद्धा संपत आलेत. उद्या परवा तुम्ही कुणाला भावनेच्या भरात असं काहीतरी म्हणायला गलात आणि त्या व्यक्तीने नुकतंच कुठतरी 'कमलांपासून शुद्ध लोखंड मिळू शकेल असा विश्वास शास्त्रज्ञांनी व्यक्त केला आहे' असं काही वाचलेलं वा ऐकलेलं असेल तर? – तर तुमची कम्बख्ती भरलीच म्हणून समजा!

अर्थात कमलाचा आणि लोखंडाचा हा असा संबंध पाहून तुमच्या अंगावर शहारे आल्यावाचून रहायचे नाहीत. पण ही गोष्ट आता अशक्य कोटीतील काही राहिलेली नाही. कारण गेली काहीं वर्षे 'छुपनेवाले सामने आ' असा शास्त्रज्ञांनी दुर्मिळ धातूच्या नावाने जो पुकारा चालवला होता त्याचे उत्तर म्हणून हे धातू फुलांतून टपकू लागलेत. आणि म्हणूनच फुलांचा नाजूकपणा कोमेजलाय......छे! तुम्ही तर आणखीनच संभ्रमात पडलेले दिसताय – तेव्हा नीट सुरुवातीपासूनच सारं काही सांगण बरं, नाही का?

त्याचं असं आहे. पृथ्वीवर विपुल प्रमाणात उपलब्ध असलेल्या धातूच्या खाणी शोधण्यात, त्यांना शद्ध स्वरूपात मिळविण्यात शास्त्रज्ञ मंडळी यशस्वी झालेली असली तरी दुर्मिळ धातूचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. हे दुर्मिळ धातू स्वतःच्या खाणी निर्माण करू शकलेले नाहीत. त्याना त्याची अशा खास खनिजेही नाहीत. ही मडळी सापडते दुसऱ्या खडकातून अन् ती ही अल्पशा प्रमाणात याचे अणु परमाणू हे इतर धातू–अधातूच्या स्फटिक–खनिजातून विखुरलेले असतात या प्रकारच्या धातूत मुख्यत्वेकरून स्कँडियम, गॅलियम, रुबिडियम थॅलियम, निओबियम, इंडियम, सिझियम, टँटालम, जर्म्यानियम, सेलेनियम, टेल्युरियम, हाफनियम आणि ऱ्हेनियम यांचा समावेश होतो.

यापैकी बहुतेक जण भेटतात ते फक्त पिरीऑडिक टेबलमध्येच! काहीजणांचा उपयोग मात्र नुकताच करून घेण्यात आला आहे. १९३० ते १९४० च्या दरम्यान इंडियम आणि नियोबियम यांचा प्रथमच वापर करण्यात आला तर १९४० ते

१९५० या दशकात गॅलियम आणि जर्म्यानियम यांचे भाग्य खुलले. यट्रीयम आणि रुबिडियमसारखे इतरजण मात्र अजूनही उपेक्षेच्या अंधारात आहेत. त्यांचा उपयोग अजून कुठेही आणि कुठल्याच स्वरूपात करून घेण्यात आलेला नाही. शुद्ध धातू म्हणून नाही, मिश्रधातू म्हणून नाही की, रासायनिक सयुगं म्हणूनसुद्धा नाहीच! पण अर्थातच त्यामुळ ते माणसाच्या दृष्टीने निरुपयोगी आहेत असं नाही आपण म्हणू शकत. त्याच्या गुणधर्मांचं मानवाला असलेलं अपुरं ज्ञान त्या धातूंना व्यवहारात उपयोगात आणू देत नाही. हे असच काहीसं घडलं होतं टिटॅनियमच्या बाबतीत. आज आघाडीवर असलेल्या ह्या धातूला तो ठिसूळ आणि कमजोर असल्याच्या भ्रमात शास्त्रज्ञांनी आणि तंत्रज्ञांनी आपल्या जवळपाससुद्धा कितीतरी वर्षं फिरकू दिलं नव्हतं. आज सेमिकंडक्टर इंजिनियरिंगला पायाभूत ठरलेल्या जर्म्यानियमलाही अशी उपेक्षा सहन करावी लागली होतीच. पण याचे भाग्य जसं पालटलं तसं न जाणो, आज ज्या धातूबद्दल अगदी अल्पशी माहिती आहे तेच उद्या आपणच इंजिनियरिंगला अधिक उपयुक्त असल्याच सिद्ध करून आपलं भाग्य पालटून घेतील – नावलौकिक मिळवतील.

## समुद्र-संपत्ती

अर्थात या गोष्टी फार पुढच्या आहेत. सध्या तरी शास्त्रज्ञांचे प्रयत्न केंद्रित झाले आहेत ते दुर्मिळ धातू दुसऱ्या धातूंच्या खनिजातून – ज्यामध्ये हे अल्पशा प्रमाणात उपलब्ध असतात – मिळविण्यात. आणि अजूनही, शास्त्रज्ञ मंडळी या धातूंचा विपुल साठा कोठे सापडतोय का, ते शोधण्यात गर्क आहेत. असा लक्ष आकर्षून घेणारा एक साठा शास्त्रज्ञाच्या नजरेसमोर आहे. तो म्हणजे समुद्र.

समुद्राच्या पाण्यात अगदी दुर्मिळ धातूसकट बहुतेक सर्व धातू विरघळलेल्या स्थितीत उपलब्ध आहेत. अर्थातच हे नाकारण्यात अर्थ नाही की त्याचा सचय (कॉन्स्ट्रेशन) फारच कमी आहे. वजनाच्या दृष्टीने पहाता समुद्राच्या पाण्यात हजारात एक भाग सोडियम असते. विपुलतेच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकावर असलेले मॅग्नेशियम दहा हजारात चौदा भाग, तर कॅल्शियम व पोटॅशियम हे दहा हजारात प्रत्येकी चार भाग इतक्या अल्प प्रमाणात समुद्रजलात विरघळलेले असते. दुर्मिळ धातूचा हिस्सा याहून अल्प असतो. अधिकृत अहवाल असं सागतात की, प्रत्येक घनमीटर समुद्रजलात दोन ग्रम रुबिडियम, दीड ग्रॅम लिथीयम, चार शतांश ग्रॅम सेलेनियम आणि एक शतांश ग्रॅम जर्म्यानियम असते.

आता हे आकडे पाहून छद्मीपणानं तुम्ही म्हणाल, 'अबब! हेच का ते प्रचंड साठे?' – पण असा प्रश्न कुणीही विचारू नये म्हणूनच बिलंदर शास्त्रज्ञ, समुद्रात किती धातू लपलेत याचे आकडे देताना पृथ्वीवरील एकूण पाण्यातले त्याचे प्रमाण देतात. अगदी गंभीर चेहरा ठेवून सांगितलेल्या त्या आकड्यांमुळे भाबडी माणसं मात्र चटकन् फसतात. कारण ते आकडेच मुळी छाती दडपून टाकणारे असतात.

हेच पहा ना आता – तज्ज्ञांच्या अंदाजानुसार ५,५०० दशलक्ष टन स्कॅंडियम आणि आणखी मोठ्या प्रमाणात जर्म्यानियम, सिझियम, सेलेनियम समुद्रजलात विरघळलेले आहेत अडचण फक्त एकच आहे – हे सारं स्कॅंडियम मिळवायच असेल तर त्यासाठी पृथ्वीवरचं सारं पाणी 'गाळून' घेणे आवश्यक आहे. पण ही विचित्र योजना पुढील अनेक शतकासाठीही जिथे 'कल्पनारम्यच' आहे तिथे तो आज कार्यवाहीत येणे कसे शक्य आहे? हो, पण समुद्रजलातल्या धातूचा उपयोग करून घेण्याची कल्पना वाऱ्यावर सोडून देणे शहाणपणाच नाही. समुद्राच्या पाण्यातील धातू पाण्यातच काही ठिकाणी संग्रहित वा एकत्रित करता आले तर हे कार्य निश्चितपणे शक्य होईल.

## रक्त...हिमोग्लोबीन...लोखंड

"पण हे सुद्धा घडवून आणणं कस शक्य आहे? विरघळलेल सारं सोनं आपल्या बंगालच्या उपसागरात किंवा सगळं जर्म्यानियम सौराष्ट्राच्या आखातात खेचून आणता येईल? छट्, विश्वास नाही बसत. या शास्त्रज्ञांपाशी काय जादूच जाळं-बिळं आहे की काय? – की आपल फेकलं पाण्यात आणि जमा केला इच्छित धातू?"

तुमच्या मनात उद्भवलेल्या इतक्या साऱ्या शकांना माझ्यापाशी उत्तर आहे. 'अं हं! जादूची जाळीबिळी नाहीत कुणाकडे. पण तरीही अशक्य काहीच नाही. हे असं काही तरी समुद्र–वनस्पती आणि प्राणी यांच्या सहाय्यान अगदी आधुनिक-रीत्या करता येईल. कारण धातू हे त्यांच्या रचनेत अपरिहार्यपणे येतात आणि त्यांच्या जीवनात ते महत्त्वपूर्ण कार्य करतात.'

आपल्याला ठाऊकच आहे, आपल्या रक्तात प्राणवायू वाहून नेण्याचे कार्य करणारा हिमोग्लोबिन नावाचा एक पदार्थ आहे. तोच आपल्या रक्ताला कम्युनिस्टी रंग पुरवितो. या, अगदी महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या हिमोग्लोबिनचा प्रमुख घटक आहे लोह. हा, बाय द वे, तुम्हाला जरासा रिलीफ मिळावा म्हणून याच संदर्भात आठवलेली एक गोष्ट सांगतो बर का! – सुमारे दीडशे वर्षांपूर्वी, ज्यावेळेस रक्ताचे रासायनिक पृथःकरण करण्यात आले त्याच काळातील ही गोष्ट आहे. एक तरुण रोमिओ, मजनूच्या पावलावर पाऊल ठेवून एका तरुणीच्या प्रेमात अगदी पार आणि ठार बुडाला होता. आता इतकं अवाढव्य प्रमाणात प्रेम करीत असताना या महाशयांना केव्हा फुरसत झाली देव जाणे, पण एकदा चुकून यांच्या कानावर 'रक्त...हिमोग्लोबिन...लोखंड' इत्यादी इत्यादी शब्द आले. अन् बस्स! लगोलग त्यांच्या 'प्रेमळ' मनाने एकच ध्यास घेतला – आपल्या प्रेयसीला विवाह-समयी अर्पायला जी अंगठी करायची ती सोन्याची न करता चक्क लोखंडाची करायची! स्वतःच्या रक्तातील लोखंडाची!! या हृदयस्पर्शी कहाणीची अखेर मला ठाऊक नाही. माहित आहे ते इतकंच की, अंगठीला पुरेल इतकं लोखंड

कुणाच्याच रक्तात असत नाही. उगाच कुठे थोडेसे ग्रॅम एवढेसेच असते ते !

मानवी शरीरात जस्त, तांबे आणि कोबाल्ट हे धातूसुद्धा विविध कामांत व्यग्र झालेले असतात. इतकेच कशाला, केसाच्या निरनिराळ्या रंगामागे निरनिराळे धातू लपलेले असतात. आपल्या निळेल साहेबामुळे केस पिकतात (आय मीन पांढरे होतात. हो, नाहीतर कुणीतरी 'निळेल हेअर ऑईल' काढायचा); टिटॅनियम त्यांना सोनेरी बनवू शकतो तर लाल रंग हे केसाना मॉलिब्डेनमचे वरदान लाभल्याचे चिन्ह मानण्यात येते अगदी युरेनियम आणि रेडियमसुद्धा मानवी शरीरात न चुकता उपस्थित असतात.

प्राणी, भू-वनस्पती येथपासून तो थेट एकपेशीय सजीवांपर्यंत प्रत्येकात धातु सापडतात. विशेष महत्त्वाची गोष्ट ही की, यापैकी प्रत्येक गट काही निवडक धातूचा संग्रह करणे अधिक पसंत करतो. कोलाच्या आखातातील सी-स्क्वर्टस्मध्ये हजारात पाच भाग व्हॅनेडियम असते. आणि हे सांगितल तर तुम्हाला आश्चर्यच वाटेल की, तेथल्या समुद्रजलांत दहा कोटीत फक्त पाच भाग एवढ्या अल्प प्रमाणात हा धातू विरघळलेला आहे. दलदलीच्या भागात वाढणाऱ्या हॉर्सटेल (अश्वपुच्छ) नामक वनस्पतीला सुवर्ण-संग्राहकच मानावी लागेल. कारण जेव्हा या वनस्पतीची जाळून राख करण्यात येते तेव्हा त्या राखेच्या प्रत्येक टनामागे सहाशे ग्रॅम सोन मिळू शकतं—त्या दलदलीत प्रत्येक टनामागे 0·1 (एक दशांश) ग्रॅम सोने उपलब्ध असताना ! काही समुद्र-वनस्पतींनी त्याच्या भोवतालच्या पाण्याच्या शभर पट अधिक रेडियम धारण केल्याचे आढळून येते.

हीच गोष्ट भू-वनस्तीसाठीसुद्धा तितकीच खरी आहे. पफ्बॉल नावाची एक बुरशीच्या जातीची वनस्पती आहे. या एक ग्रॅम, कोरड्या पफ्बॉल वनस्पतीत चक्क पाव ग्रॅम जस्त असते. जस्त भरपूर प्रमाणात असलेल्या जमिनीत वाढणाऱ्या काही वनस्पतीच्या राखेत प्रत्येक किलोग्रॅममागे २१४ ग्रॅम एवढे जस्त असते. हे इतक्या शुद्ध स्वरूपात असते की, शुद्धीकरणाचो कोणतीही प्रक्रिया करावी लागत नाही. हा जस्त संग्रह सरळ सरळ वितळवला की शुद्ध धातु प्राप्त होतो.

काही विशिष्ट प्रकारच्या गवताच्या आणि पानाच्या राखेत एक लाखात एक भाग जर्म्यानियम असते; अन् ते सुद्धा जर्म्यानियमचं तिथल्या जमिनीतल सरासरी प्रमाण शभर कोटीत एक भाग—याहून अधिक नसताना !

लॉरेल हा सदाहरित वनस्पतीचा एक गट आहे. पैकी एका विशिष्ट लॉरेलच्या राखेत शभरात पधरा भाग मँगेनोज असल्याचे आढळून आले आहे.

भू-रसायन शास्त्रज्ञाना धातूचे असे अनेक साठे माहित आहेत, जे, काही विशिष्ट धातूंचा संग्रह करण्याच्या सजीवाच्या प्रवृत्तीमुळे निर्माण झाले आहेत. 'भू-जीव रसायन' या नव्या चित्तवेधक शास्त्राचे दालन खुले करणारे सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ व्हर्नाडस्की म्हणतात, 'सजीवाच्या आयुष्यात लोखड, मँगेनीज आणि ॲल्युमिनीयम

हे धातू मोठ्ठं, कदाचित मुख्य कार्य करण्यात रत झालेले असतात. या सजीवांनीच फॉस्फरस, सॉल्टपीटर, आणि शुद्ध गंधक यांच्या साठ्यांना जन्म दिला आहे. आणि हे सजीव थोड्या फार प्रमाणात तांबे, व्हॅनॅडियम, रूपे, शिसे यांच्याही संयुगांचे साठे जमवून असतील असं मानायला मुळीच हरकत नाही..." थोडक्यात म्हणजे सजीव सृष्टी ही काही विशिष्ट धातूंची अगदी कार्यक्षम संग्राहक आहे.

मग सजीवांची ही प्रवृत्ती सागरापासून, महासागरांपासून धातू मिळवण्यासाठी का बरं उपयोगात आणू नाही ?

नाही तरी मानवाला अशक्य असं काय आहे ? साध सफरचंदाचंच उदाहरण घ्या ना ! वर्षानुवर्षापासून या वृक्षामध्ये तो अगदी मन मानेल तसा बदल घडवून आणीत आला आहे. पूर्वी जंगलात रानटी झुडूपांप्रमाणे उगवणाऱ्या या झाडाला छोटीशी, बोराएवढी अन् तोंडातसुद्धा न घालवतील इतकी आंबट फळे लटकलेली असत, असं सांगूनसुद्धा खरं वाटणार नाही इतकं सौंदर्य आणि गोडवा मानवाने त्या फळाला आणून दिला आहे. परस्परांपासून अगदी वेगवेगळे असणारे कितीतरी प्रकार आपण आज पाहतो–गोड लुसलुशीत, न नासणारी अन् आंबट, टणकसुद्धा ! मनुष्याने गव्हात तर इतका बदल घडवून आणला आहे की, नक्की कोणत्या रोपांपासून तो तयार झाला हे शास्त्रज्ञांसुद्धा सांगता यायचं नाही.

रातांब्याची सालं वाळवून आमसुल तयार करताना, आतल्या गराच्या आंबट कर्कट रसाची पुटं चढवून ती अधिकाधिक आंबट करण्याची प्रथा आहे. पण आज कोकणात कोकंब्याची अशीही झाडं उभी आहेत, ज्यांच्या फळांच्या साली आंबट अन् गर मात्र मधुर असतो.

लांबसडक शरीराचे अन् छोटया छोटया पायाचे डॅक्सहूंट किंवा शक्तिमान बुलडॉग यांचे पूर्वज लांडगे होत हे सांगावे लागेल इतके ते लांडग्यापासून दूर जाऊन पोहोचलेले आहेत. हे सारं घडलं ते मानवाच्या प्रयत्नांतून !

तथापि, फक्त जर्म्यानियम किंवा लिथीयम गोळा करील असा कोबीचा नवा प्रकार वा ज्यांची हाडं टेल्युरियम किंवा ॲक्टिनियमचा संग्रह करू शकतील अशी एक नवीनच डुकरांची जमात निर्माण करण्याचा कोणत्याच जेनेटिसिस्ट (उत्पत्ति-शास्त्रज्ञ)चा विचार नाही. तरी पण धातू मिळविण्याचे कार्य पूर्ण करता येईल असा शास्त्रज्ञांचा विश्वास आहे.

सर्व दृष्टींनी विचार करता बॅक्टेरिया, बुरशी, शेवाळ यासारखे साधी शरीर-रचना असलेले एकपेशीय सजीवच या कार्यपूर्तीसाठी उपयुक्त 'कच्चा माल' ठरतील. कारण एक तर यांची संख्या अतिशय वेगाने वाढते आणि दुसरे म्हणजे आज विसाव्या शतकाच्या दालनात अभिमानाने उभे असलेले उत्पत्तिशास्त्रज्ञ, विविध पदार्थांचा सुयोग्य वापर करून त्यांच्यात हवे तसे बदल घडवून आणू शकतात. ज्या बुरशीपासून पेनिसिलिनची निर्मिती नैसर्गिकरित्या होतं त्या बुरशीचा उत्पादन

सहगुणक Production factor ४० ते ८० एवढा असतो. पण जेव्हा विशिष्टपणे नियंत्रित केलेले क्ष किरण आणि अति-नीलकिरण त्याच्यावर केंद्रित केले जातात तेव्हा ह्या बुरशीचा पेनिसिलीनचा उत्पादन-सहगुणक १००० पर्यंत चढू शकतो. अगदी याच प्रमाणे या पेशीची दुर्मिळ धातूंचा संग्रह करण्याची क्षमता, आधुनिक तंत्र-विज्ञानाचा मुक्त वापर करून, शतपटीने वाढविणे काही फारसे अवघड नाही. सध्या सोव्हिएट युनियन, युनायटेड स्टेटस्, कॅनडा आणि ब्रिटन येथे, कॉपर सल्फाईडसारख्या काही खनिजाचे ऑक्सिडेशन करून त्याना विद्राव्य स्वरूपात मिळविण्यासाठी बॅक्टेरियाचा कितपत उपयोग होऊ शकेल, यावर संशोधन चालू आहे.

बाबीस्का आणि नेमन या झेकोस्लोवाक रसायनशास्त्रज्ञांना इसवी सन १९३४ मध्ये असे आढळून आले की, ऑसलॉनी शहराच्या आसपास उगवणाऱ्या काही वनस्पतीच्या राखेत प्रत्येक टनामागे दश ग्रॅम सोने असते. विशेष म्हणजे ऑसलॉनीच्या आस-पासच्या जमिनीतील सोन्याचे प्रमाण आहे प्रत्येक टनामागे ०·२ (दोन दशांश) ग्रॅम !

"वा ! मग तर या ठिकाणी चरणाऱ्या प्राण्यांच्या शरीरात अधिक मोठा सुवर्णसंग्रह झालेला असणार !" त्या रसायन शास्त्रज्ञांच्या मनात विचार चमकला.

त्यांचा होरा शंभर टक्के खरा ठरला. कॉकचॉफराच्या राखेत प्रत्येक टनामागे तब्बल पंचवीस ग्रॅम सोने असल्याचे सिद्ध झाले.

या साऱ्या संशोधनामुळे दुर्मिळ मूलद्रव्यांच्या कृत्रिम संग्रहनाचा मार्ग खुला झाला आहे. हे धातू मिळविण्याचे कार्य आता दोन मार्गांनी साध्य होईल. पहिला वनस्पती आणि बॅक्टेरिया यांच्या सहाय्याने व दुसरा म्हणजे सूक्ष्म जंतू व मासे यांच्या सहाय्याने !

इथं नमूद करावं असं एक मनोरंजक संशोधन पुढं आलं आहे. याची सुरुवात झाली ती जर्मन रसायनशास्त्रज्ञ फोगेल याच्या काही प्रयोगातून. हा शास्त्रज्ञ एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेला. त्याचे प्रयोग खरंच विलक्षण होते; पण त्याहून त्याचे निष्कर्ष अधिक विचित्र होते.

त्याने चक्क काचेच्या चुऱ्यात काही बिया 'पेरल्या'. या चुऱ्यात गंधकाचा किंवा गंधकाच्या कोणत्याही संयुगाचा अवशेषही त्याने शिल्लक राहू दिला नाही. बियांना ऊर्ध्वपातित (distilled) पाणी पुरवले. शिवाय हवेतल्या गंधकाचा संपर्कही या बियाना लागू नये म्हणून त्याना कांचेच्या हंडीने झाकून ठेवले. या 'वातावरणा'तही बिया रुजल्या. नंतर फोगेलने त्या जाळल्या अन् राखेतले गंधकाचे प्रमाण मोजले अहो आश्चर्यम् ! जेवढ गंधक सुरुवातीला बियांमध्ये होतं त्याच्या दुप्पट गंधक राखेत असल्याचे त्याला दिसून आले. कोठून आले हे ?

बर्लिनमधल्या एका जीवशास्त्रज्ञाने १८७६-१८८३ मध्ये हेच पुन: प्रयोग करून पाहिले. त्याही पुढे जाऊन हे प्रयोग फक्त गंधकाच्याच बाबतीत मर्यादित न ठेवता, पोटॅशियम, फॉस्फरस, कॅल्शियम, सोडियम आणि मॅग्नेशियम यांच्यासाठी सुद्धा त्याने करून पाहिले. अन् या मूलद्रव्यांच नव प्रमाण पहिल्या प्रमाणाशी जुळत नाही हे पुनश्च एकवार सिद्ध झाले.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात अजून एकवार तेच प्रयोग दोघा फ्रेंच शास्त्रज्ञांनी करून पाहिले. एखाद्या विशिष्ट रोपट्याला आवश्यक भासणाऱ्या मूलद्रव्यांपैकी एखादं मूलद्रव्य त्याला सुरवातीपासूनच न मिळू देण्यासाठी त्यांनी विलक्षण प्रगत पावलेल्या तंत्र-विज्ञानाचा पुरेपूर उपयोग करून घेतला खरा; पण त्या मूलद्रव्याच, रोपट्यातलं वाढतं प्रमाण त्यांनाही रोखता आलं नाही.

असे हे प्रयोग! जे फक्त निरीक्षणापर्यंतच पोचत होते. पुढचे हिशेब चुकत होते अन् निष्कर्षाचा तर थांगपत्ताच नव्हता. किंबहुना निष्कर्षाची धूसर कल्पना तज्ज्ञांच्या नजरेसमोर असूनही ती कल्पना त्यांनाच वेडगळपणाची वाटत असावी.

अखेरीस, जे धैर्य त्यापूर्वी कुणीही दाखविले नव्हते ते या दोघा शास्त्रज्ञांनी दाखविले. अन् एक विलक्षण धाडशी निष्कर्ष त्यांनी जगासमोर मांडला. त्यांचं म्हणण असं,

'एखाद्या रोपट्याला हवी असणारी सारी मूलद्रव्यं सरळसरळ मिळाली तर ठीक. नाहीतर त्या रोपट्यांची पानं सौरशक्तीच्या मदतीनं, उपलब्ध असलेल्या इतर मूलद्रव्यांच रूपान्तर हव्या असलेल्या मूलद्रव्यात करून घेतात.'

याचा अर्थ भलताच स्पष्ट आहे. पानाच नुसते चित्रविचित्र आकार पाहून 'करांत्‌ी कातरी' नसूनही केलेल्या या कलाकुसरीबद्दल आश्चर्य व्यक्त करतो आपण — अन् इथे तर या शास्त्रज्ञद्वयीच्या म्हणण्यानुसार प्रत्येक पान ही एक स्वतंत्र अणुभट्टी असते. खरंच काय व्यक्त करायच आता?

'एका मूलद्रव्याचं दुसऱ्या मूलद्रव्यात रूपांतर?...'

-मानवाला त्याच्या प्रचंड अणुभट्ट्याच्या सहाय्याने अल्प प्रमाणातही जे करणं जमत नाही तेच कार्य छोटी छोटी पानं, म्हणे, मोठ्या प्रमाणात करून जातात — नव्हे, कोट्यावधी वर्षांपासून करत आली आहेत. काय हे?

पण अखेरीस हा सुद्धा एक निष्कर्षच आहे — मानवानेच काढलेला! ज्याच्या सत्यतेविषयी सामान्यांना सोडाच पण नामवंत शास्त्रज्ञांनाही शंका आहे.

आपल्याला मात्र या प्रयोगातून एक वेगळा पण बहुतेकांना पटणारा निष्कर्ष काढता येईल. फोगेलच्या प्रयोगांचा पुन्हा एकवार नीट विचार केल्यास एक प्रश्न जरूर मनात उभा राहील. त्याने गंधकांचा अंशसुद्धा बियांपर्यंत पोचणार नाही अशी व्यवस्था केली होती खरी, पण अगदी गंधकाचा अणुपरमाणुसुद्धा बियांपर्यंत पोचू न देण्यात ती व्यवस्था यशस्वी झाली असेल का? नाही! शक्यच नाही!!

म्हणजे गंधक अत्यल्प, सूक्ष्म, अतिसूक्ष्म प्रमाणात का होईना पण बियांपर्यंत पोचलं असणार आणि वाढत्या अंकुरानं ते अचूकपण ग्रहण केलं असणार. यात अशक्य काहीच नाही.

त्याचप्रमाणे विसाव्या शतकात तंत्र-विज्ञानानं कितीही आघाडी मारलेली असली तरी जोपर्यंत अणु-परमाणु 'धुऊन' टाकणं त्याला शक्य होत नाही तोपर्यंत प्रयोगाच्या काळात वाढत्या अंकुराला अति सूक्ष्म प्रमाणात तरी त्याला हव्या असलेल्या मूलद्रव्याचा पुरवठा होत रहाणारच आहे.

हे पटणारं आहे. पटायला हवं आहे. कारण एकदा का ते पटलं की, तत्काळ या प्रयोगाकडे बोट दाखवून मी म्हणणार आहे,

'मग समुद्रजलात दुर्मिळ धातू कितीही अल्पस्वल्प प्रमाणात विरघळलेले असले तरी घाबरायचे कारण नाही. कारण वनस्पती त्यांना अचूकपणे शोषून स्वत:मध्ये संग्रहित करणार हे निश्चित. नाही का ?'

□

छे, इथे बसून नुसतंच शास्त्रीय चर्चांचा काथ्याकूट करण्यापेक्षा आपण सरळ भविष्यात घुसून पाहू या ना, काय घडतय ते !...

वा !...काय मंडळी ? येऊन पोहोचलात ना सुखरूपपणे ? ठीक आहे. अरेच्चा ? पण आहात कुठं तुम्ही ते पाहिलत का ? हां ! पेट्रोल-बिट्रोलला बऱ्याच वर्षांपूर्वी रामराम ठोकला गेलाय बरं का ! अन् सध्या तुम्ही तुमच्या विद्युत-मोटारीतून प्लॅस्टिकच्या रस्त्यावरून अगदी आरामात प्रवास करीत आहात... ओ हो ! इकडे डाव्या बाजूला बघितलंत का – विसाव्या शतकातल्या त्या पॉपीजसारखी सुन्दर निळ्या रंगाची फुलं किती छान फुलली आहेत नाही ?

अंहं ! जीवशास्त्रीय 'नकाशात' यांची नावं शोधण्याचा प्रयत्न करू नका. कारण तुम्हाला मुळी ती तिथे सापडायचीच नाहीत. नुकतीच तर कुठे निर्माण करण्यात आली आहेत ती – गमत म्हणजे, मानवाला त्यांच्यातलं सौंदर्य नको आहे; त्यापासून मजबूत दोरखंड वगैरे त्याला नको आहेत; चवदार, सुरेख फळांचीही त्यांच्यापासून अपेक्षा नाही आहे. ही रोपं लावली आहेत ती अगदी वेगळ्या उद्देशाने. गेल्या काही वर्षातच सेमिकंडक्टर इंजिनियरिंगच्या क्षेत्रात अतिशय उपयुक्त ठरलेल्या ऱ्हेनियम या धातूचा संग्रह करण्याची कामगिरी या इवल्याशा रोपांवर सोपविली गेली आहे.

अन् हे उजव्या बाजूला पहा तरी – अहाऽ ! काय सुरेख द्राक्षांचे मळे पसरले आहेत ! ही द्राक्षं पण नेहमीची नाहीत हो. त्या अवजड, नारिंगी रंगाच्या द्राक्षांच्या मोठमोठाल्या घोसात तेथल्या जमिनीहून दहा हजार पटीनी अधिक रूबिडियम साठवलेले आहे. ही द्राक्षं, जी फळं म्हणून खाता येत नाहीत अन् त्यांच्यापासून दारूही बनविता येत नाही ती सुद्धा उत्पत्तिशास्त्रज्ञांनीच (जेनेटिसिस्टस्)


मेहनतपूर्वक तयार केली आहेत. ही विलक्षण द्राक्षं प्रत्येक हेक्टरमागे शेकडो किलोग्रॅम्स दुर्मिळ धातू कसे मिळवितात, साठवतात, ते एक रहस्यच आहे. पण त्याबाबत विशेष विचार करायचे कारणच काय ? जोवर हे द्राक्षवेल अगदी इमानी नोकरांप्रमाणे दुर्मिळ मूलद्रव्य गोळा करताहेत तोवर हव्यात कशाला या नसत्या पंचायती ?

या साऱ्या वनस्पती पुढे विविध अन्नपदार्थ तयार करणाऱ्या कारखान्यात न नेता धातू बनविणाऱ्या कारखान्याकडे नेल्या जाणार आहेत. ह्या निळया पॉपीज काय किंवा नारिंगी रंगाची द्राक्षं काय, दोन्ही खनिजंच आहेत – खनिजं, जी कृत्रिमरित्या शेतातून वाढविली आहेत; जिवंत खनिजं !

किंवा कदाचित सारं काही वेगळंच दिसेल. तुमचा रस्ता तुम्हाला समुद्र-किनाऱ्यावरच्या मोठ्या थोरल्या कारखान्याकडे घेऊन जाईल. तिथला प्रमुख इंजिनियर ते इथं काय करतात अन् कसं करतात ते सांगेल. तो कारखाना म्हणजे 'बायोकेमिकल मेटॅलर्जिकल प्लॅण्ट' आहे, जिथे अत्यंत दुर्मिळ आणि महत्त्वाचे धातू मिळवले जातात. मोठमोठ्या पम्पांनी समुद्राचं पाणी खेचून ते उंच टॉवर्स-मध्ये आणलं जातं. या टॉवर्समध्ये अतिसूक्ष्म, खालच्या जातीच्या, बुरशी सदृश वनस्पतींची वाढ कृत्रिमरित्या, मुद्दामहून केलेली आहे. ही वनस्पती पाण्यातून हवी असलेली दुर्मिळ मूलद्रव्ये शोषून घेऊ शकते. या कार्याच्या शेवटच्या टप्प्यात ही वनस्पती एखाद्या खनिजासारखी वितळवून धातू मिळवण्यात येतात – अगदी शुद्ध स्वरूपात !

किंवा तुम्ही कदाचित् संपूर्णपणे पाण्याखाली वाढवलेला शेवाळ्याचा 'बगीचा' पहाल, ज्यामुळे दुर्मिळ धातू मिळविण्याची सारी योजना फक्त दोन टप्प्यात सामावलेली असेल. पहिला टप्पा म्हणजे यांची (शेवाळाची) कृत्रिमरित्या वाढ व दुसरा म्हणजे हे शेवाळ जाळून त्याच्यापासून सरळसरळ धातू मिळवणं, आज आयोडिन मिळवलं जातं तसं ! ...

...तथापि ही काही महत्त्वाची माहिती नाही. मुख्य गोष्ट जर काय असेल तर ती ही की, दुर्मिळ धातूचे हे जीवशास्त्रीय संग्राहक, मनुष्य निःसंशयपणे वापर-णार आहे. तो दिवस आता फार दूर नाही.



कायमचो कटकट गेली. आता काय करायचं ते मंत्रिमंडळाच्या बाहेर राहून करा म्हणावे. आतून सुरुंग नको. त्यांना काय गरज होती भिवंडीत जाऊन आपल्याला शिव्या देण्याचा आणि दिल्लीत आपल्याविरुद्ध प्रचार करण्याची? आता भोगा म्हणावं फळ. नाहीतरी फारच झालं होतं. छुपा प्रचार करता काय? उघड बोला ना काय म्हणायचंय ते. मुख्यमंत्री व्हायचंय का? बहात्तरला ट्राय करून बघा. आपल्याला इंटरेस्ट नाही. पण ही आतून सुरुंग लावण्याची वृत्ती नको. आता बसलेत उपनेतेपद घालवून. असेंब्लीत काय करतात ते बघायचं. कॅबिनेटबाहेर माणूस पडला तरी डोक्याला ताप आहेच म्हणा. आता तर चक्क वाटायला लागलं की राज्यसभेच्या निवडणुकीच्या वेळी आपल्याला तोंडघशी पाडणारे बहुत करून हेच साहेब असावेत. गेलेत हे बरं झालं. पण ते काही स्वस्थ बसणार नाहीत. काहीतरी उपद्व्याप चालू असतीलच. जरा काळजी घेतली पाहिजे.

तेव्हा एवढ्या चिंता डोक्यावर असतात. त्यात आणखी बेळगाव. वैताग आहे. बाई मैसूरात भलतेच बोलून बसल्या आहेत. आता पुन्हा दिल्लीला भेट देणं आलं. इलाज नाही. अरे कोण आहे रे तिकडे. एक दिल्लीच्या विमानाचं तिकीट काढून आण बघू. की मंथली पासच आणायचा? ◻

## एक हीरो....एक गुंड

शिवसेनेला सध्या काय झालं आहे? शिवसेनेत सध्या झपाट्याने काही तरी घडते आहे हे खरे. ती एक ओर्ताव संघटना कधीच नव्हती. मागेच अनेक वेळ सांगितल्याप्रमाणे शिवसेना ही चळवळ आहे. चळवळीची सगळी लक्षणं तिला लागू पडतात. चळवळ जेव्हा जोरात असते, चळवळीचे लक्ष जेव्हा स्थिर असते तेव्हा ती शिस्तबद्ध असते, तिला लोकप्रियता लाभते. आणि लोकप्रियतेच्या वाऱ्याने चळवळीची ज्वाला अधिकच भडकते. परतु चळवळीचे उद्दिष्ट साध्य झाले किंवा बाजूला सारले गेले की तिच्यामध्ये अस्ताव्यस्तपणा येऊ लागतो. स्वार्थाने प्रेरित झालेले लोक तिच्यात घुसतात आणि चळवळीला केवळ कोलाहलाचे स्वरूप निर्माण होते.

शिवसेनेला सध्या काय झाले आहे? मराठी माणसासाठी नोकऱ्या मिळवण्याचे उद्दिष्ट केव्हाच बाजूला गेले आहे आणि बेळगाव, कम्युनिस्ट, हिंदू–मुस्लीम संबंध असे विषय शिवसेना हाताळू लागली. असे विषय योग्य रीतीने हाताळायला बळकट शिस्तबद्ध संघटना पाहिजे असते. अशी संघटना शिवसेनेजवळ नाही. म्हणून ही गडबड, आपापसात आरोप–प्रत्यारोप, भाडणे.

परवाच शिवसेनेचे एक माजी कार्यकर्ते सुधाकर लोणे आपल्या तीनशे अनुयायांसह शिवसेनेला रामराम ठोकून सत्ता–कांग्रेसमध्ये पदार्पण करते झाले. शिवसेनेतला

एक मोठा गट फुटून जाहीरपणे बाहेर पडण्याचा हा पहिलाच प्रसंग. अर्थातच या प्रसंगाचे मुंबईत गोळीबार आणि लाठीहल्ल्याने स्वागत झाले. सदाकांत ढवणचा खून झाल्यावर दुसरे दिवशी शिवसेनेने त्याला हिरो बनवला. पण सुधाकर लोणे कॉंग्रेसमध्ये गेल्या गेल्या गुंड बनला. खुद्द बाळासाहेबांनी पत्रक काढून लोणेला शिव्या दिल्या.

ठाकरे म्हणाले, लोणे एक कुप्रसिद्ध गुंड आहे, पोलिस त्याला तडीपार करणार होते म्हणून तो कॉंग्रेसमध्ये गेला. शिवसेनेतून त्याला केव्हाच काढून टाकले होते. (लोणे म्हणतात केव्हा ते सांगा आणि पुरावा दाखवा.) ठाकरे म्हणाले, लोणेच्या मागे अकरा शिवसैनिकदेखील नसतील. त्याला उगाच महत्त्व देऊ नका. (लोणे : मग ठाकरे उगाच स्वतःच बोंबाबोंब का करतात? सभेत तर साडेतीनशेच्यावर शिवसैनिक आहेत.)

शिवसेनेचे नगरपिते वामनराव महाडिक यांनी तर चक्क आरोपच केला की लोणेंनी शिवसेनेच्या नावावर दहा हजार रुपये जमवले आणि त्यांचा गैरवापर केला.

सत्कारप्रसंगी लोणेंनी या आरोपांना उत्तर देण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, 'आज मी तीनशेच आणले, उद्या हजारांनी आणीन. शिवसेनेत छळवाद चालू होता. त्याला आम्ही कंटाळलो होतो. चाकू-तलवारीची नीच पातळी शिवसेनेने गाठली त्याला कटाळलो. आम्हाला भगव्या झेंड्याबद्दल आदरच आहे. पण त्या दहशतवादाला आम्ही कटाळलो आमची आज बदनामी चालू आहे. दमदाटी चालू आहे. पण ठाकरेंनी हे लक्षात ठेवावं की तुमची मूठ झाकलेलीच ठेवा. नाहीतर तुमची सगळी लफडी बाहेर काढीन. 'मराठी माणूस-मराठी माणूस' या ठाकरेंच्या बोलण्याला बळी पडलो. डोळे उघडून भूलथापा कळल्या तेव्हा बाहेर आलो. महाडीक म्हणतात मी दहा हजार रुपये खाल्ले. मी काय खाल्लं ते तर आपण ठरवूच; पण महाडिकांनी स्वतःच्या सत्कारासाठी दोन दोन रुपयांच्या पावत्या सक्तीने फाडायला लावल्या होत्या हे कोणी विसरू नये.

आपणाला गुंड म्हणून तडीपार करणार होते या ठाकरेंच्या आरोपाचे तर लोणे यांनी हसेच केले. ते म्हणाले, मी सरकारी नोकरीत आहे. एखादा माणूस सरकारी नोकरीत असल्यावर त्याला गुंड म्हणून तडीपार करायचे असेल तर आधी त्याला नोकरीतून काढून टाकतात एवढी साधी गोष्ट तरी ठाकऱ्यांना ठाऊक हवी.

लोणे-सत्काराची सभा शिवडीला झाली. सभा तुफान झाली. हशा-टाळ्या वगैरे. कडक पोलिस बंदोबस्त होता. पण सभेत स्पिरीट होते. लोणेंनी सांगितलेल्या [redacted] सहकाऱ्यांव्यतिरिक्त इतर अनेक शिवसैनिक या सभेत हजर होते. बाहेर दगडफेक वगैरे झाली. पण सभेत काही गडबड झाली नाही. लोणे यांचा कॉंग्रेसप्रवेश हा नुसता एकुलता एक प्रसंग की त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मोठा ओघ ठरतो ते काही दिवसात कळेल.

—वार्ताहर

# माणूस

८ ऑगस्ट विशेषांक

## सत्तेचाळीस सालातील
## सत्तेचाळीस दिवस

शत्रूने केलेल्या वचनभंगाची
आपल्या जवानांच्या धीरोदात्त प्रतिकाराची
एक सजीव सत्यकथा–

लेखक
कर्नल जाधव

## भंडारदऱ्याचे युद्ध

भारतीय तंत्रज्ञांचा एक शर्थीचा प्रयत्न

विलास पतकी, यशवंत पटवर्धन

याशिवाय

रातराणी, मुक्ताफळे, विचारवारे,
तुंबड्या, ही नेहमीची सदरे...

**पृष्ठसंख्या सुमारे १०० । किंमत ८० पैसे**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.

सवलतीची मुदत १५ ऑगस्टपर्यंत ॥

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

किंमत : प्रसिद्धीनंतर रुपये पंचवीस सुमारे
प्रसिद्धीपूर्व सवलतीची किंमत रुपये चौदा

रजिस्टर पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास रुपये दोन अधिक.

सवलतीची मुदत १५ ऑगस्टपर्यंत ॥

# अग्निपुत्र

वसंत पोतदार

किंमत : प्रसिद्धीनंतर रुपये पंधरा सुमारे
प्रसिद्धीपूर्व सवलतीची किंमत रुपये आठ

रजिस्टर पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास एक रुपया अधिक.

रक्कम मनिऑर्डरने पाठवावी. कार्यालयातही स्वीकारली जाईल.

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M–H 649




"आमच्या उत्पादनातील अधोगतीला एक जमेचीही बाजू आहे, विसरू नका. परवाच्या "बंद"मध्ये सर्वात कमी उत्पादन आमचं बुडालं..."